॥ श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ॥

बारा गावांचे स्वयंभू जागृत देवस्थान


# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी - ४१६७०२

(ट्रस्ट रजि. नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

# वार्षिक अहवाल

(वर्ष सन २०२०-२१)








कार्तिकी उत्सवामध्ये 'दो गज दूरी,... मास्क जरूरी'चे पालन करणारे भाविक भक्त...






लघुरुद्र स्वाहाकारामधील हवन व पूर्णाहुतीचे क्षण...





कार्तिकोत्सवातील ह.भ.प. श्री. बडवेबुवांची कीर्तनसेवा व त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्रीची नवसाची लोटांगणे अन् माताभगिनी यांचा दरबार झाडण्याचा कार्यक्रम...



।। श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ।।

बारा गावांचे जागृत देवस्थान



# श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

(ट्रस्ट रजिस्ट्रेशन नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

## -निमंत्रण -

स.न.वि.वि.

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीदेव अंजनेश्वरचा वार्षिक कार्तिकोत्सव मिती कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक पौर्णिमा **रविवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२१ ते गुरुवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२१** असा पाच दिवसांचा आहे. उत्सव काळातील पाच दिवसामध्ये आरती, भोवती, कीर्तन हे प्रथेप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण सर्वांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व यथाशक्ती देणगी पाठवावी, ही विनंती.

आपले नम्र,

**विश्वस्त,**
**श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

संपर्कासाठी मोबा नं. 9823277326 (WhatsApp)***
7038785001
ई-मेल आयडी- shridevanjaneshwar@gmail.com

# -कार्तिकोत्सवातील कार्यक्रम-

रोज रात्री ठीक ९.०० वाजता धुपारती... आरती व पालखी प्रदक्षिणा व ठीक १० वाजता ह.भ.प.श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय पोखरणकर यांचे कीर्तन..

- **सोमवार दि. १५.११.२०२१ रोजी रात्री ८.०० वा. तुळशी विवाह...**

- **बुधवार दि. १७.११.२०२१ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी १२ पर्यंत लघुरूद्र** स्वाहाकार ... पूर्णाहुती... त्यानंतर दुपारी १.०० वाजेपर्यंत यज्ञप्रसादाचे वाटप...

- **गुरुवार दि. १८.११.२०२१ रोजी सकाळी १० वाजता बलीपूजन..**
  दुपारी १२.०० वाजता श्री देवाला महाप्रसाद...
  दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसाद वाटप. .
  संध्याकाळी ७.०० वाजता त्रिपूर पूजन.. रात्री १२.०० आरती, भोवती, लोटांगण, दरबार झाडणे आदी कार्यक्रम..लळीताचे कीर्तन..

कोरोना रोगाच्या सावटामुळे उत्सवाच्या कार्यक्रमाची रूपरेषा सामान्यपणे दिली आहे... उत्सवामधील कार्यक्रम नेहमीप्रमाणेच करण्याचा प्रयत्न राहील. तरी कार्यक्रमाबाबत किरकोळ बदल झाल्यास फेसबुक व व्हॉटस्‌ ॲप व स्थानिक वर्तमानपत्राच्या माध्यमातून प्रसिद्धी केली जाईल व सर्व भाविक भक्तांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न राहील. आपणही संपर्कात रहावे.

## –महत्त्वाच्या सूचना–

- देणगीदारांना आपली देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात थेटपणे जमा करता येईल.

**–बँक खात्याचा तपशील –**

**श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे**

**A/c No-143710100000001**

**IFSC code-BKID0001437**

**बँक ऑफ इंडिया, मिठगवाणे शाखा**

भीमअॅप, पेटीएम आदी मोबाईलअॅप द्वारा वरील तपशील घालून देणगी रक्कम पाठवता येईल. तसेच कोणत्याही बँकेतून एनईएफटी /आरटीजीएस करता येईल. देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात जमा केल्यावर पेमेंट-स्क्रीनशॉट व आपला पूर्ण पत्ता (पिनकोड व मोबाईल नंबर सह) WhatsApp No. ९८२३२७७३२६ वर मेसेज करून किंवा shridevanjaneshwar@gmail.com या मेल वर पाठवता येईल. भाविक भक्तांनी आपली देणगी थेट श्रीदेवाच्या बँक खात्यात पाठवण्यास प्राधान्य द्यावे... आपला पूर्ण पत्ता आम्हाला मेसेज करून पाठवल्यावर देणगी पावती बनवून आपल्याला पोस्टाद्वारे पाठविणे, प्रसाद/अंगारा पाठविणे आम्हाला सोयीचे होईल. कृपया बँकेत जमा केलेल्या देणगीचा तपशील न विसरता पाठवावा.

- मनीऑर्डर द्वारा देणगी रक्कम पाठवताना मनीऑर्डर फॉर्मवर संपूर्ण पत्ता पिनकोडसह लिहावा. मनीऑर्डर रिसीटचा फोटो WhatsApp No. ९८२३२७७३२६ वर मेसेज करून अथवा ई-मेलवर पाठवता येईल. मनीऑर्डर द्वारा देणगी रक्कम पाठवताना कमिशन लागते व मनीऑर्डर आमचे पर्यंत पोहोचायला विलंब होतो. तसेच अशी पाठवलेली रक्कम आमचेकडे काही दिवसांसाठी तरी हाती जमा रहातेच. आपण देणगीची रक्कम थेट बँक खात्याला भरणा केली की कमिशन लागत नाही, रक्कम हाती जमा रहात नाही तरी आमची विनंती आहे की आपण शक्यतोवर आपली देणगी थेट श्रीदेवाच्या बँक खात्याला जमा करण्यासाठी प्राधान्य द्यावे.

- चेकद्वारा देणगी पाठविणाऱ्या देणगीदारांनी आपला पूर्ण पत्ता द्यावा. तथापि चेकद्वारे देणगी दिल्यानंतर पोस्टेज, वटाव कमिशन, चेक क्लिअरिंग, चेक बाउंस होणे आदी समस्या येतात. त्यामुळे देणगीदारांना आमची विनंती आहे की, सदरचा चेक आपणच श्रीदेवाच्या खात्याला ट्रान्स्फर केला तर ते अधिक सुलभ होईल. आपण शक्यतोवर आपल्या देणगीचा चेक थेट श्रीदेवाच्या बँक खात्याला जमा करण्याला प्राधान्य द्यावे.

- देणगीदारांना कोणत्याही बँकेत स्वत:च्या नावाने मुदत ठेव ठेवून त्याचे तिमाही अथवा वार्षिक व्याज श्रीदेवाच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल. आपल्या व्याजाची रक्कम वर्षभर होणाऱ्या सर्व धार्मिकांसाठी व देवस्थान सुधारणेसाठी खर्च होईल. अशी मुदत ठेव किमान रु. १० हजार किंवा समान पटीत असावी, अशी विनंती आहे. या देणगीदारांची नावे कायम देणगीदार या सदराखाली येतील. व्याज जमा झाल्यावर देणगी पावती/प्रसाद पाठवणे ही देवस्थानची जबाबदारी राहील.

- भाविक भक्तांना आपले गुप्त दान, निनावी देणगी दानपेटीत अर्पण करता येईल... दानपेटीत जमा झालेल्या दानाचा विनियोग भोजन प्रसाद, स्वाहाकार सारखे धार्मिक विधी आदीसाठी खर्च केला जाणार आहे. लखोटाबंद देणगी रक्कम संपूर्ण नाव, गांव, पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक आदी तपशील नमूद करून दानपेटीत अर्पण झाल्यास यथावकाश देणगीपावती अंगारा-प्रसादासह पाठवली जाईल...

- श्रीदेवाला 'वस्तुरूप देणगी' देताना देवस्थानशी संपर्क साधून दिल्यास योग्य होईल. मंदिरातील गरजा लक्षात घेऊन वस्तुरूप देणगी दिली जावी, अशी नम्र सूचना आहे.

- देवस्थान संबंधातील अनेक तऱ्हेची माहिती/फोटो/व्हिडीओ व सर्व काही 'Shri Dev Anjaneshvar Devasthan' या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आली आहे. तरी आपणही या फेसबुक पेजला आवर्जून भेट द्यावी.

- देवस्थान भक्तनिवासामध्ये निवास व भोजन, नाश्ता, चहापानाची सोय होण्यासाठी श्री. सदानंद तुकाराम तथा राजा लिंगायत यांचेशी मोबा. नं. ७२६२९१९५१४ या द्वारे आगाऊ संपर्क साधावा. निवासव्यवस्थेच्या नोंदणीसाठी आपले आधारकार्ड अनिवार्य आहे.

- श्रीदेवावर आवर्तन, अभिषेक, एकादशणी आदी धार्मिक विधींसाठी श्री. विजय भुस्कुटे मोबा. नं.९८२०६७५०८५ (व्हॉटस अॅप), श्री. शेखर फडके मोबा नं. ९३२६६२१४०४(व्हॉटसअॅप)/८५५२९७६२३२ अथवा श्री. प्रकाश परांजपे ९४२१४४१६४४ / ८४१२८७९३२२ यांचेशी आगाऊ संपर्क साधावा.

- श्री देवाच्या पिंडीवर धान्याची पूजा बांधायची असल्यास श्री. विजय वामन लिंगायत ९४२३३७४५९१ अथवा संतोष वामन लिंगायत ९५४५२७१९५० यांचेशी संपर्क साधावा...

## दोन शब्द...

सप्रेम नमस्कार...

प्रतिवर्षाप्रमाणे आजरोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सन २०२०/२१ सालचा वार्षिक अहवाल श्रीदेव अंजनेश्वर महाराजांच्या पुढ्यात वाचण्यासाठी ठेवताना खूप आनंद होत आहे... देवाच्याच हुकुमानंतर ह्या अहवालाची प्रत आपणा सर्वांना पोहोचविण्याचा अगदी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे... फेसबुक, व्हाटस अप, इमेल, पोस्टाद्वारे आणि शक्य तिथे हस्तदेय पद्धतीने हा 'वार्षिक अहवाल' आपल्यापर्यंत पोहोचवून वर्षभरातील एकूण कारोभाराचा लेखाजोखा आपल्यापुढे सादर केला आहे... वर्षभरातील सारे सारे कामकाज तुमच्यापर्यंत पोहोचावे, हा त्यातील अंतस्थ हेतू आहे... वार्षिक जमाखर्च, वर्षभरातील उत्सवांचे समालोचन, वर्षभरात मंदिर परिसरात झालेल्या सोयीसुधारणांचा गोषवारा आपणासर्वांना प्रतिवर्षी समजावा म्हणून या वार्षिक अहवालाचे प्रयोजन... अहवाल म्हणजे 'सत्य उजेडी ठेवण्यासाठीचा एक प्रामाणिक प्रयत्न होय'... कोरोना महामारीच्या वैश्विक संकटाने सर्व जग हतबल झालेले आहे... कोरोनासुरामुळे मंदिरे भाविकांसाठी बंद झाली आहेत... शासनाच्या आदेशानुसार रविवार दि. २२ मार्च २०२० रोजी पासून श्री देवाचे मंदिर बंद करावे लागले. मात्र मंदिर बंद असले तरी रोजच्या नित्य पूजाअर्चा अगदी वेळेवर व यथासांग चालू होत्या. दि. १६ नोव्हेंबर २०२० रोजी शासनाने मंदिरबंदी उठवली. कोरोनाचे सर्व नियम नियमावली पाळून दसरा उत्सव, काकडारती, कार्तिकी उत्सव, शिवरात्री उत्सव, होळी उत्सव कोणतेही गालबोट न लागता पार पडले. कोरोनाकाळातील हे सर्व उत्सव भरपूर काही शिकवून गेले. नियोजन व सर्वांची घट्ट साथ असली की सर्व काही शक्य होते, याचा वस्तुपाठ या वर्षीच्या सर्व उत्सव सोहळ्यातून मिळाला. कोरोनामुळे सर्व नवीन नवीन शिकता आले..नवीन नवीन सारे अनुभवता आले.

मंगळवार दि.०२ मार्च २०२१ रोजी मंदिरात दोन दानपेट्या सर्व आवश्यक सोपस्कार पूर्ण करून बसविण्यात आल्या आहेत. भक्तांनी देवासाठी अर्पण केलेल्या रोजच्या दानाचा/पैशांचा हिशोब ठेवला गेला पाहिजे व भक्तांनी देवासाठी अर्पण केलेल्या दानाचा उपयोग देवाच्याच धार्मिक कार्यासाठी, उत्सवांसाठी व मंदिराच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी खर्च झाला पाहिजे. अर्पणदानासाठी देवतेच्या 'नजीक व पुढ्यात' दानपेटी बसविली गेली पाहिजे, अशी कायद्याची अपेक्षा आहे.. दानपेटी बसवणे म्हणजे पुजारी लोकांचा आकस ओढवून घेणे असे एक सर्वमान्य समीकरणच असते.. परंतु कायद्याची मार्गदर्शक तत्वे, शासन परिपत्रके लक्षात घेता देवाला रोज अर्पण होणारे दान दानपेटीत गोळा करून तो जमानिधी वार्षिक हिशोबात दाखविणे अनिवार्य झाले होते. गुप्त दान, निनावीदेणगी, अर्पणदानासाठी भाविकांना दानपेटीचा पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक होते व बंधनकारक होते. दानपेटी बसवणे म्हणजे गुप्तपणे आणि निनावीपणे देणगी देणाऱ्या भक्ताची सोय करणे होय. तसेच एखाद्या गरीबाचा एक रुपया धार्मिक कार्यासाठी स्वीकारायचा असेल तर दानपेटी शिवाय अन्य पर्याय नाही. दानपेटी हा अर्पणदानासाठीचा एकमेव पर्याय आहे. सर्व कायदेशीर संदर्भ, सुरक्षिततेचे उपाय व सोयीस्कर जागा लक्षात घेऊन दोन दानपेट्या मंदिरातील मूकशालेमध्ये बसविण्यात आल्या आहेत.

मित्रांनो...पालखीतल्या देवाला सोन्याची रुद्राक्ष माळा करायची, असा विचार बरेच दिवस मनामध्ये होता. त्यासाठी एक मुदतठेव सर्टिफिकेट स्वतंत्रपणे ठेवलेले होते. विचारविमर्श करून कोल्हापूरच्या गोखले सराफांकडून २२० ग्रॅम सोने खरेदी केले. देवाचे सोनार श्री. दत्ताराम जगन्नाथ तथा बाळू पाटणकर यांनी सोनारकामाची मजुरी न घेता सोन्याची रूद्राक्ष माळा घडवून दिली आहे. साडे अकरा लाख रुपये किंमतीचा सोन्याचा ऐवज तयार झाल्याने श्रीदेवाच्या संपत्तीमध्ये भर पडली आहे तसेच महसूल विभागाने सर्व लेखन दोष दुरुस्त करुन श्री देव अंजनेश्वरच्या मालकीच्या एकूण ३२७ जमीनजागा ( सुमारे ११२/११३ एकर ) श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टच्या मुख्य कब्जेदारीखाली आणल्या आहेत. यामुळे देवस्थान ट्रस्टच्या स्थावर संपत्ती मध्ये मोठी भर पडली आहे...

देवस्थान मधील सोयीसुधारणा, उत्सवांची माहिती, महत्त्वाच्या घटनांचा आढावा, शासकीय निधीतील सोयीसुधारणा, ट्रस्ट बाबतची माहिती, सन २००८ सालापासूनचे ऑडिट रिपोर्ट आणि अहवाल, अन्य कागदीदस्त आदींची परिपूर्ण माहिती सार्वजनिक व लोकाभिमुख करण्याच्या उददेशाने श्री देवाच्या नावाने फेसबुक पेज चालू केले आहे... ऑगस्ट २०२० पासून 'Shri Dev Anjaneshvar Devsthan' या फेसबुक पेजच्या माध्यमातून सुमारे १३० छोट्या मोठ्या पोस्ट लिहून देवस्थान संबंधातील सर्व माहिती दस्तऐवज, फोटो, व्हीडीओ लिंक करून आपल्यापर्यंत पोहोचवली आहे... ही सर्व माहिती भविष्यात संदर्भ म्हणून उपयोगी येईल, यात शंका नाही. प्रत्येक पोस्टला संदर्भाचे दस्त लिंक देऊन जोडले आहेत. या देवस्थान बाबतचे सारे सारे देणगीदारांना, भाविक भक्तांना, हितसंबंधी लोकांना संदर्भ दस्तऐवजांसह सुलभपणे व विस्ताराने कळावे, या स्वच्छ हेतूने सर्व पोस्ट लिहिल्या आहेत. पोस्ट व त्यावरील अभिप्राय लक्षात घेता यापुढेही अशी माहिती देत राहणे सोयीचे वाटते आहे..या पोस्टच्या लिखाणाचा फायदा देणगी मिळवण्यासाठी सद्धा झाला आहे, हे नम्रपणे सांगावेसे वाटते..

मित्रांनो, या ट्रस्टचा कारभार धर्मादाय आदेशामधील कार्यकक्षेमध्ये चालू आहे. बँकखात्याचे प्रचालन, दास्तान/ दप्तर सांभाळणी व सर्व साधारण कारभार (General Affairs) दि.१७.११.१९५२ रोजीच्या मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्या आदेशाच्या प्रकाशात चालू आहे. ट्रस्टची नोंदणी करणारे कै.सदाशिव लक्ष्मण तथा बाबुराव देसाई व कै.गणेश बाळकृष्ण तथा आबा देसाई यांना अपेक्षित होते तसे कामकाज करण्याचा प्रयत्न आहे. देवस्थान मधील सर्व जमा व सर्व खर्च एका स्वाक्षरीने होत असल्यामुळे सर्व जमाखर्चाला जबाबदार आपणच आहोत, याची पक्की जाणीव ठेवून जास्तीत जास्त पारदर्शी कारभार कसा ठेवता येईल यासाठी मनस्वी प्रयत्न करीत आहे. असो.

या वर्षीचा वार्षिक अहवाल म्हणजे वर्षभराच्या कामकाजाचे इतिवृत्त, प्रोसिडिंग लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे...उत्सव व महत्त्वाच्या सुधारणांची माहिती विस्ताराने दिली आहे. सर्व घटनाक्रमाचे धावते वर्णन करता करता या अहवालात थोडासा शब्द विस्तार झाला आहे. परंतु कोरोना काळातील सर्व उत्सव शब्दबद्ध करून ठेवले नाहीत तर पुढील येणाऱ्या पिढीला ते कळणार नाही. त्यामुळे ह्या वर्षीचा अहवाल थोडासा विस्ताराने लिहिला आहे. यामुळे अनुपस्थित भाविकांना, प्रत्यक्ष सहभागी नसलेल्या देणगीदारांना सर्व कार्यक्रमांचे आकलन सामान्यपणे होईल....इतिवृत्त लिहिले, घटनाक्रम लिहिला की ते संदर्भ भविष्यात दिशादर्शक ठरू शकतील..वार्षिक अहवालाच्या निमित्ताने देवस्थानची आर्थिक स्थिती, आर्थिक व्यवहार वर्षाचे वर्षाला समजतील व एकूण सर्वसाधारण कारभाराचा अवाका सर्वाच्या लक्षात येईल.

सन २००८ पासून कामकाज पहात असताना अनेक चांगले चांगले अनुभव आले. एक विद्यार्थी म्हणून अनेक गोष्टी नव्याने शिकता आल्या. कोणतेही कामकाज करताना पाठीमागे भक्कम साथ मिळते म्हणून उत्साह वाढतो. धाडसी निर्णय घेण्याचे मानसिक बळ मिळते. सहकारी मंडळी एकजिनसीपणे व एकदिलाने सर्व कामकाजात भाग घेतात, त्यामुळे आत्तापर्यंतच्या कामाचे कधीही ओझे वाटले नाही.

अहवाल म्हणजे वर्षभरातील एकूण कामकाजाचे समालोचन असते. अहवालात काहीतरी उणीवा राहू शकतात. लेखनदोष असू शकतात. अभावित चुका होऊ शकतात. कारभारात काहीना काही दोष राहू शकतात. आपण अधिकारवाणीने सांगितल्यास त्यात जरूर ती सुधारणा करता येईल. आपले अभिप्राय अवश्य कळवा.

आपला नम्र,
विश्वस्त,
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

संपर्कासाठी मोबा.९८२३२७७३२६ (WhatsApp)/७०३८७८५००१
ई-मेल आय डी-shridevanjaneshwar@gmail.com

## महत्त्वाच्या घटनांचा, कामकाजाचा गोषवारा...

- **कोरोना संकट... मंदिर बंदी..** रविवार दि. २२ मार्च २०२० ते नोव्हेंबर २०२० पर्यंत मंदिर बंदी होती. नगारखान्याच्या सरकत्या गेटला कुलूप लावावे लागले.. पोलिस यंत्रणेच्या मार्गदर्शनानुसार सर्व नियम पाळावे लागले...पोलिसांची पूर्व परवानगी घेऊन, काकडारतीला कुलूप तात्पुरते उघडले..सोमवार दि.१६ नोव्हेंबर २०२० रोजी मंदिर बंदी उठली...त्यानंतर दि. ०५ एप्रिल २०२१ रोजी पासून पुन्हा मंदिर बंदीचे आदेश झाले. मात्र आदेशाची बजावणी न झाल्यामुळे मंदिराच्या प्रवेशद्वाराला कुलूप लावण्यात आले नाही. परिणामी मंदिर व मंदिर परिसर खुला राहिला.

- **'मुहूर्ताईचा नवरात्री उत्सव'....'अन् कोरोनातला दसरा'**

सन २०२० चा नवरात्र उत्सव चिरंतन स्मरणात रहावा, असा झाला. कोरोनामुळे जमावबंदी लागू होती. नवरात्र उत्सवासाठीची सरकारी गाईडलाईन SOP चे पालन बंधनकारक होते. श्री देवीचा उत्सव होणार कसा.??. झाला तर कसा होणार..?? कशा पध्दतीने??? अंजनेश्वर मंदिर तर कुलूपबंद होते. सोने लुटणे होणार कसे?? अनेक प्रश्न, अनेक शंका होत्या.अनेक तर्क अन् त्यावरचे वितर्क सुरु होते. शंका कुशंका चालू होत्या. आपण अकारण चिंता, चर्चा अन् चक् चक् करीत बसतो. श्री देवी मुहूर्ताई बारापाचाची मालकीण.. अंजनेश्वर बारावाड्यांचा..घेतील बघून...हो ते घेतील निर्णय.. मी कोण..?? कुणीही नाही...'मी' ला मी फार महत्त्व देत नाही. मुहूर्ताईच्या उत्सवापूर्वीची सफाई झाडलोटीची कामे झाली होती... सौ. रेश्मा मेस्त्री, सौ. सुजाता गडगेकर, सौ. संगीता गडगेकर, सौ. नमिता प्रिंदावणकर व सौ. प्रमिला काजवे यांनी मंदिराचा परिसर झाडलोट करून स्वच्छ केला होता. शेवाळ घासून घासून काढली होती.. मंडप ताणून झाला होता. अंजनेश्वर दरबारीचा मंडप येथे लागला होता. खुद्द अंजनेश्वराला बहिणीच्या उत्सवाची काळजी होती. ..नरेश कांबळी, संतोष शिंदे, प्रदीप शिंदे, रामदास रायकर संतोष मसूरकर व जोडीला सय्यद हसोळकर आदींनी मंडप उभारणीचे काम केले. हँडवॉश डिस्पेंसर अंजनेश्वरकडून पाठवून दिलेला होता... हातपाय धुऊन भक्तांना मंदिरात जाता यावे म्हणून पाय धुण्याची सोय केलेली होती. मास्क वापरण्या बाबतचे बोर्ड लावले होते...लाईटींगची तोरणे लागली... गिरीश धनावडेने ते लाईटींगचे काम कधी केले कळलेही नाही... स्पीकर लागला 'लाऊड स्पीकर' नाही...'लाऊड' आवाजाचा नाही.....सनई साठीचा स्पीकर. केवळ देवीला ऐकण्यासाठी... देवीचे सर्व दास्तान ताब्यात देणे आदी झाले. श्री.दत्ताराम जगन्नाथ उर्फ बाळू पाटणकरांनी देवीच्या दागिन्यांचे, मुखवट्याचे घासकाम केले. विश्वनाथ कांबळी, अंकुश कांबळी, कैलास कांबळी, सचिन कांबळी, गोकुळ काजवे, महेश कांबळी मनोज परमार यांनी देवीची सजावट केली.. 'घटस्थापना झाली'... नटूनथटून साजशृंगार करून देवी भक्तांना दर्शन द्यायला सज्ज झाली.. प्रदीप कणेरी, संजय कांबळीने दुपारचा इशारतीचा धुपारतीचा ढोल बडवला. शनिवार दि.१७ ऑक्टोबर २०२० रोजीचा सकाळच्या सत्रातला हा कार्यक्रम यथासांग झाला... दुपारी साडेअकराला दर्शनासाठी गेलो तेव्हा ही सर्व मंडळी सर्व कामकाज आवरून निवांत सुखेनैव बसली होती. मनात म्हटले ''देवीने आपले कार्य करून घेतले''... कोरोना तिच्या दरबारी फिरकला सुध्दा नाही. रोजचे आरतीला जाणे चालूच होते.. रोज रात्रीची धुपारत पंचारत नरेश कांबळीने केली. इशारत धुपारत ठीक साडेनऊ वाजता झाली. आरतीचे पुढारीपण गंगाधर भोगले, पखवाजवादक सौरभ भोगले तर कधी संतोष लिंगायत...बाकी सर्व उपस्थिती सोशल डिस्टंसींग ठेवून...७०/८० ची कमी-जास्त उपस्थिती...रोजची आरती फक्त ५/६... सारे नेमस्त... महेश कांबळी कडून रोजचे गाऱ्हाणे... श्रीबांदोबाला, श्रीपुरकेश्वराला..व मुहूर्ताईला. ''मोडतोड रेघेवर ठेव...'' हे ते गाऱ्हाणे,...''हातापायाखाली संभाळ कर..'' हे ते सांगणे... ''काही चुकभूल झाली असेल तर माफ कर..'', ही ती आर्जव... शेवटी ''मुहूर्ताई माते की जय..!!!!!..'' हे सर्वांचे... रात्री १० वाजता जो तो घराकडे... प्रसाद वाटप जवळपास नाहीच नाही... रोजचा कार्यक्रम असाच. एक दिवस पॅकींगची खडीसाखर प्लास्टीक पॅक होती म्हणून वाटप... दिवसभरात येणारे, ओटी भरायला येणारे मास्क लावून... रविवार २५ ऑक्टोबर २०२०... दसऱ्याचा दिवस... अंजनेश्वर मंदिर कुलुपबंद असल्याने 'सोने लुटणे' हा प्रकार नाही.. पर्यायी व्यवस्था म्हणून

'सोने वहाणे'... घरून आणून वहाणे... नगारखान्याच्या बाहेर...'श्रीदेवाच्या फोटोला'... 'अंजनेश्वर दर्शन' नगारखान्याच्या बाहेरून...'सोने पूजा' मंदिरात... ब्राह्मण श्री. प्रकाश परांजपे... जोशीपणाच्या जोश्यांना सूतक आडवे आले म्हणून... अन्यथा ते काम तिवरांबीच्या जोश्यांचे. जयंत जोशींनी परभारी ती व्यवस्था करून प्रकाश परांजपे यांना जोश्यांचे वतीने म्हणून धाडले होते... नेहमी प्रमाणे वाजंत्री वाजती झाली... रायकरांना सुवेर पडला म्हणून गिरीश धनावडे, राजा भातडे यांनी तासे वाजंत्री वाजवली... ठीक संध्याकाळी साडेचार वाजता... सर्व अंतर ठेवून जमले होते. पाच वाजले. मंदिरात फक्त पुजारी होते... लिंगायत पुजारी... बाकी कुणी नाही... आतून बोलावणे झाले... ठीक ५ वाजता... माथ्यावर टोपी चढवून हातपाय धुऊन आत मंदिरात एकट्याला प्रवेश मिळाला. सोने पूजा करण्याचे सौभाग्य मिळाले...

'पूजा झाली.'... लिंगायत गुरवांनी पंचारती पाजळून ''आवडी गंगाजळ'' चालू केले.. ''हर हर महादेव'' झाले. आम्ही सर्वांनी बाहेरूनच ''महादेव'' केले. पुन्हा तासे वाजंत्री चालू झाली...आता सर्वांची पावले मुहूर्ताईकडे वळली. काहीशी गतीने... सोने देणेघेणे नव्हते. आलिंगन नव्हते,... हस्तांदोलन नव्हते... श्री देवी मुहूर्ताईला सर्वांचे दर्शनाला जाणे... यावर्षी तीर्थ प्रसाद नाही. रात्रीच्या आरतीने उत्सवाची सांगता झाली... त्यावेळी थोडे आभार मानणे झाले...रात्री ठीक १० च्या ठोक्याला कार्यक्रम पूर्ण झाला... कोरोनाकाळातील नवरात्रउत्सव कायम स्मरणात राहिला...

- **'काकडारती'**

शनिवार १४ नोव्हेंबर २०२०... नरक चतुर्दशी. प्रतिवर्षीची काकडारती होणार की होणार नाही, अशी शंका होती... सरकारने मंदिर बंदी उठवलेली नव्हती... त्यामुळे काकडारतीचे जाहीर निमंत्रण कुठेही झळकलेले नव्हते... परंतु वाडी वाडीमध्ये तोंडी निरोप पोहोचले होते... भगिनी वर्गाला निरांजन, वाती, काडीपेटी, तेलाची बाटली व ताटली/ताम्हन घेऊन मंदिरात मोठ्या संख्येने उपस्थित रहा, असा तोंडी निरोप पोहोचलेला होता... ''मास्क लावून या''. ''मंदिरात दो गज दूरी चे पालन करा.''..आदि सर्व सांगणे तोंडी सांगितलेले होते. मंदिरात सर्व ठिकाणी 'दो गज दूरी', 'मास्क' आणि 'कोविड सूचनांचे फलक' लावण्यात आलेले होते... 'काकडारती' मनामनात पेटलेली होती. शनिवारी पहाटे पाच वाजता एक एक करून सर्व जमू लागले. नेमणुकीचा गुरव सुधाकर लिंगायत असल्यामुळे नित्यपूजा धुपारत अगदी पहाटे पाच वाजता झाली होती... सनईचे मंगलवाद्य अगदी लहान आवाजात सुरू होते... राजा लिंगायत, संतोष लिंगायत, सुधाकर लिंगायत, दिनकर लिंगायत आदींच्या घरकुटुंबातील प्रत्येक घटक उपस्थित होता... बाकी पाठून पुढून आले होते. सभामंडपात सर्व माताभगीनी जमू लागलेल्या होत्या... समस्त पुरुष मंडळी, लहान लहान मुले मंदिराच्या आवारात उभी ठाकली होती... सुमारे २२५/२५० उपस्थिती झाली. सर्व मास्क बांधून होते...

दो गज दूरी पाळून पहाटे पहाटे हजर होते. समस्त लिंगायत पुजारी लोकांना गाभाऱ्यात, मूकशाळेत स्थान होते. हाती निरांजने पाजळलेल्या माताभगीनी सभामंडपात होत्या... दो गज दूरी मुळे मंदिर परिसर भरून गेला... लिंगायतांनी काकडे पाजळले... मोहन परांजपे यांनी ''ॐ नमः शिवाय'' जपायला सुरूवात केली... नेहमीच्या चार आरती झाल्या... सर्वांच्या हातावर प्लास्टीक पिशवीत पॅक केलेला बुंदी लाडू पडला... सर्वांना कागदी ग्लासातून कडकडीत चहा मिळाला... देवाला गाऱ्हाणे झाले... दोन शब्द आभाराचे झाले. 'काकडारती' झाली... पहाटेच्या पणत्या तासभर तेवून निमूटपणे विझाल्या होत्या... पाजळलेले काकडे विसावले होते... उपस्थित भाविक भक्तांमधील, विशेषतः माताभगीनींमधील मनामनातली 'काकडारती' उत्सवापर्यंत चालू राहिली... प्रशांत भडेकरांनी काकडारतीचे माफक चित्रीकरण केलेले होते...२४ वर्षा पासूनची काकडारती संपन्न झाली, खंड पडला नाही, ही भावना सर्वांच्या ठायी होती... काकडारती श्री देव अंजनेश्वरच्या कार्तिकी उत्सवाचा 'ट्रेलर' होती... काकडारतीमुळे उत्सवाची 'रंगीत तालीम' होऊन गेली.... मनातला विश्वास घट्ट होत गेला..... ''तू पुढे हो, मी तुझ्या पाठीशी आहे'', ''हो पुढे'', हा सुप्त संदेश मिळाला...

- **'जनरल मिटिंग' कार्तिकी उत्सवाच्या पूर्वनियोजनाची...**

सोमवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२०... कार्तिकी उत्सवाची जनरल मिटिंग... संध्याकाळी ७.०० वाजताची जनरल मिटिंग... या मिटिंगची नोटीस सर्व बारा वाड्यांच्या बारा खोतांना दिलेली होती... सर्व सेवेकरी मानकरी विश्वस्त, पोलिस पाटील, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी यांचेसह एकूण ५४ लोकांना जनरल मिटिंगची नोटीस बजावणी नरेश प्रिंदावणकर यांचे करवी केलेली होती... अंजनेश्वरच्या फेसबुकवर जनरल मिटिंगची नोटीस शेअर केलेली होती... शिवाय व्हॉट्सअॅप द्वारा मिटिंगची नोटीस सर्वांपर्यंत पोहोचती केलेली होती... अंजनेश्वरच्या नोटीस बोर्डावर सुध्दा जनरल मिटिंगची नोटीस लावण्यात आली होती... यावर्षीची जनरल मिटिंग श्री देव अंजनेश्वरच्या सभामंडपात न घेता सभामंडपाच्या बाहेरील कलामंचासमोरील मंडपात घेतलेली होती.. 'बैठकीच्या खुर्चीवर' बसून मिटिंग होती. डायस/पोडीयम लावून मिटिंग होती. स्पीकर सिस्टीम जोडून व व्हिडिओ शुटिंग करून मिटिंग घेण्यात आली होती... मास्क लावून, सॅनीटाझर लावून मिटिंग झाली हे सर्वात महत्त्वाचे... मिटिंगमध्ये एकूण उपस्थिती ८० व माझी उपस्थिती ८१ वी. मिटिंगमध्ये पाच मुद्दे महत्त्वाचे... उत्सव नियोजन, कोविड बाबत सूचना, वर्षभरातील कामकाज आढावा, जमाखर्च, वर्षभरातील पत्रव्यवहाराचे वाचन व त्या वरील स्पष्टीकरण, अन्य विषयांमध्ये देवस्थान ट्रस्टबाबत माहिती... सन १९५२ सालातील ट्रस्टबाबतच्या नोंदणीचे दस्त, त्यावर झालेली चॅरीटी कमीशनची ऑर्डर याचे वाचन... महसूल विभागाने वर्षभरात केलेल्या महत्त्वाच्या ऑर्डर... बचत खात्याची माहिती, बचत खाते कसे चालवले जाते याची माहिती... अर्बन बँकेतील मुदत ठेवींबाबत माहिती. मुदत ठेवीतून मिळणारे एकूण व्याज.... सन २०२० मधील वार्षिक अहवालाचे थोडक्यात वाचन... उत्सव नियोजनामध्ये वाजंत्री, प्रकाश व्यवस्था, ध्वनी व्यवस्था आदीसह पाणीपुरवठा यासह बारीक सारीक माहिती... उत्सव कार्यक्रम पत्रिकेचे वाचन...कोरोनाबाबतच्या मंदिरबंदी मध्ये मंदिर कामकाज कसे चालले, याची तपशीलवार माहिती... 'कोरोना सहाय्यता निधी' राज्य सरकार व केंद्र शासनाला दिलेला असल्याची माहिती दिली... मंदिर बंदी उठवली तरी जमावबंदी आदेश जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी लावलेलाच होता. त्यामुळे उत्सवाबाबत रीतसर परवानगी मागण्यासाठीचा अर्ज करण्याची तयारी केलेली आहे, असेही सर्वांना सांगितले... स्वाहाकार व समाराधनेचा महाप्रसाद सिल्व्हर फॉईल मधून देण्याचे नियोजन सांगितले. अंगारा खडीसाखर प्रसाद प्लास्टीक पिशवीतून पॅकींग करून देण्याचे नियोजन सांगितले... तीर्थ वाटपाचे नियोजन सांगितले... मास्क, फेसशील्ड, सॅनीटायझर मशीन, हँडवॉश डिस्पेंन्सर मशीन, मुबलक सॅनीटाझर आदीचे झालेले नियोजन सर्वांना सांगितले... दोन ठिकाणी हातपाय धुण्याची सोय असल्यामुळे जातायेता हातपाय धुतले पाहिजेत, हे जरा आग्रहाने सांगितले... सर्व भाविक भक्तांची ये-जा वन् वे ने व्हावी म्हणून नगारखान्यापासून मार्गिका करण्यात आली होती... त्याचे महत्त्व, त्याचे पालन सर्वांनी कटाक्षाने करावे म्हणून त्या ठिकाणी स्वयंसेवकांची निवड करण्यात आल्याचे सांगितले. उत्सवातील चहापान मंदिराच्या पाठीमागे देण्यासाठी मंदिराच्या भिंतीला असणाऱ्या 'एका गोला'तून चहा सर्व्हिस देण्याची सूचना केली... लोटांगण, दरबार झाडणाऱ्या स्त्रिया व पालखीला खांदा मारण्याचा नवस केलेल्यांना ओळखीचे बिल्ले करण्याबाबत सांगणे झाले... सर्व स्वयंसेवक, सेवेकरी मानकरी यांना देवस्थानचे बिल्ले, या बाबतची माहिती सांगितली... सर्व सूचनांसाठी मोठे दोन-तीन बोर्ड करून घेतल्याचे सांगितले... लिंगायत गुरवांसाठी पाचसहा लाकडी पेट्या... जेणे करून तांदूळ पैसे वेगळे वेगळे साठतील व त्याला हस्तसंपर्क होणार नाही... दो गज दूरी साठीची सर्कल मार्किंग कशी करायची ते सांगितले. ऑक्सिमिटर चेक अप व थर्मल स्कॅनिंग करण्यासाठीचे सर्व नियोजन सर्वांना सांगितले. सर्व भाविक भक्तांच्या हातांचे सॅनिटायझेशन करण्यासाठीचे नियोजन सांगितले... गाडी पार्किंगचे नियोजन ग्रामपंचायतीच्या सरपंच, सदस्य व कर्मचारी लोकांना सांगितले... यात्रेतील दुकान व्यवस्थापनेबाबतचे नियोजन सांगितले...जनरेटरची सुविधा पहिल्या दिवसापासून करण्याबाबतचे सर्व काही

ठरले होते ते सांगितले... शेवटच्या दिवसाच्या कॅश काऊंटरचे नियोजन सांगितले... तेथे ड्रॉपबॉक्स मध्ये देणगी रक्कम कशी साठवावी, हे समजावून सांगितले... देणगीदार भाविकांना प्लास्टीक पिशवीतून बुंदी लाडू देण्याचे व समारोपाला बुंदी लाडू वाटपाचे नियोजन सांगितले... सतरंजी घालायची नाही, ही सूचना स्पेसिफिक सांगितली होती... मिटिंग समाप्ती नंतर शेवटी सर्व उपस्थितांना चहापान देण्यात आले होते... अहवालाच्या प्रतींचे वितरण करण्यात आले होते... श्री देवाच्या कार्तिकी उत्सवाची जनरल सभा अशी संपन्न झाली होती... श्रीदेव अंजनेश्वर ट्रस्टच्या ट्रस्ट इंस्ट्रूमेंटमध्ये मिटिंग घेण्याची प्रोव्हीजन केलेली नसली तरी गेली १३ वर्ष सातत्याने कार्तिकी उत्सवापूर्वी व शिवरात्री उत्सवापूर्वी जनरल मिटिंग घेण्याचा जो पायंडा पाडला आहे तो अगदी मनापासून व कटाक्षाने पाळण्याचा प्रयत्न असतो... जनरल मिटिंग घेऊन सर्व काही तपशीलवार सांगणे होते म्हणून 'मिटिंग' महत्त्वाची वाटते... कामकाजात सर्वसमावेशकता रहाते, पारदर्शकता रहाते, म्हणून 'मिटिंग' आवश्यक वाटते... सेवेकरी मानकरी खोत मंडळींच्या सूचना मिळतात म्हणून 'मिटिंग' गरजेची असते... उत्सवाची यशस्विता या मिटिंगमध्ये दडलेली असते म्हणून आग्रहाने मिटिंग घेण्याचा खटाटोप असतो... 'मी माझे मावळो सर्व..' मीपण शिल्लक राहू नये म्हणून 'मिटिंग' अतिमहत्वाची...

- **'एकत्रिकरण'... तथा आढावा बैठक...**

सोमवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२० रोजीचे 'एकत्रिकरण'... मिटिंग नाही तर केवळ 'आढावा बैठक' झाली. केवळ तोंडी निरोपाने बोलवून झालेले 'एकत्रिकरण' होते... मानकरी सेवेकरी खोत, ग्रामपंचायत, लिंगायत या सर्वांचे 'एकत्रिकरण'... उपस्थिती माझ्यासह ११२ होती... सर्व मास्क बांधून उपस्थित होते... सभामंडपाच्या बाहेर कलामंदिरा समोर बैठकीच्या खुर्चीवर सर्वांना बसवून घेतलेला 'आढावा'.... उत्सवाच्या एक दिवस अगोदर झालेले 'एकत्रिकरण'... उत्सवाबद्दल मनस्वी आत्मियता असलेली मंडळी सर्वच्या सर्व हजर होती... तत्कालीन मे. उपविभागीय अधिकारी राजापूर श्री. प्रविण खाडे साहेब यांनी संध्याकाळी साडेपाच वाजता उत्सवाच्या परवानगीची लेखी ऑर्डर दिली होती. ती ऑर्डर श्रीदेवाच्या पुढ्यात ठेवली होती... या एकत्रिकरणात त्या ऑर्डरचे सामान्यपणे वाचन झाले. ऑर्डरमधील मार्गदर्शन (SOP) लक्षात घेतले तर आपण त्याहून जास्त तयारी केलेली आहे, हे उपस्थित सर्वांच्या लक्षात आले. लेखी ऑर्डर देणारे तालुक्याचे सर्वोच्च अधिकारी श्री. प्रविण खाडे साहेब यांचे सर्वांच्या समोर जाहीर आभार मानले. पुन्हा कोविड बाबतची माहिती व त्यासाठी पाळायचे नियम याची उजळणी केली 'मास्क कंपल्सरी, दो गज दूरी, हात धोना जरूरी संयम-श्रध्दा-सबुरी ये सबकी जिम्मेदारी हे उत्सवाचे घोष वाक्य तयार केले... मंदिराच्या तीनही बाजूंना मंडप थाटलेला होता, दो गज दूरी ची 'वर्तुळे' मंदिर परिसरात व मंदिराच्या बाहेर आखून झाली होती. नगारखान्यापासूनची मार्गिका सय्यद हसोळकर याने अतिशय परिश्रम घेऊन पूर्ण केली होती... यज्ञमंडपावरचा फोल्डींग मंडप (गॅल्व्हनाईज सामान वापरून) सुध्दा सय्यद हसोळकरने अगदी मेहनतीने पूर्ण केला होता... भगवान पावसकरने सुध्दा दिवसरात्र मेहनत करून मंडपाचे ग्रीन शेडनेटचे कापड झालरसह शिवून दिले होते... हे सर्व या एकत्रिकरणाचे वेळी सर्वांच्या नजरेसमोर होते. नरेश कांबळी व अभि कुळकर्णी या दोघांनी मंदिर परिसरामधील सर्व प्रकाशाची 'प्रकाश व्यवस्था' पूर्ण केली होती. मंदिर परिसर व मंदिराच्या बाहेरचा परिसर लखख प्रकाशित झालेला, या सर्व उपस्थितांनी पाहिलेला होता...कोविड सूचनांचे / कागदी बोर्ड गावाच्या सर्व रस्त्यांवर ठळकपणे लावले गेले होते... हे सर्व काम लिंगायतांच्या लहान लहान मुलांनी केले... स्वयंस्फूर्तीने केले... जनरेटरची व्यवस्था केलेली होती. यात्रेतील दुकानदारांना ह्या वर्षी मोफत प्रकाश व्यवस्था देवस्थान मार्फत करून द्यायची, हे ठरवून टाकले होते. या वर्षी ग्रामपंचायतीने यात्रेबाबत कुणाशीही तसा लेखी पत्रव्यवहार केलेला नव्हता. त्यामुळे सर्व यात्रेतील दुकानदारांनी वैयक्तिक संपर्क साधला होता. ''तुम्ही या.. पाहूया'' एवढेच तोंडी आश्वासन दिले होते. हे सर्व एकत्रिकरणामध्ये सर्व उपस्थितांना सांगितले होते.. उद्देश स्पष्ट होता, की यात्रा व्यवस्था खंडित होऊ नये...भाविकांना या निमित्ताने काही ना काही साहित्य मिळावे. कासार, खेळणीवाले, आयस्क्रिमवाले,

भेळपुरीवाले, हॉटेलवाले आदींनी आगाऊ संपर्क साधला होता. अनेक प्रकारच्या सूचना देऊन हे एकत्रिकरण रात्री पावणे नऊ वाजता संपले होते...

- <u>**'कार्तिकी उत्सव'... '२०२० सालचा'...**</u>

मित्रांनो, कायम स्वरुपी स्मरणात राहील असा 'कार्तिकी उत्सव'... उत्सव होईल की नाही, उत्सव झाला तर तो कसा होईल, अशी सगळी अस्थिर परिस्थिती असताना उत्सव निर्विघ्नपणे पार पडला.

दि.१६ नोव्हेंबर २०२० रोजी शासनाने मंदिर बंदी उठवली... देवाचा दरवाजा उघडला...

दि.२३ नोव्हेंबर२०२० रोजी देवस्थान प्रस्तावाला मान्यता देऊन राजापूरचे प्रान्ताधिकारी श्री. प्रविण खाडे यांनी उत्सवाला सशर्त परवानगी दिली... शासनाच्या मार्गदर्शक सूचना (SOP) चे पालन करून उत्सव करण्यासाठी सर्व जण सज्ज झाले... दो गज दूरी चा नियम... मंदिर परिसरात मार्किंगचे गोल काढण्यात आले होते... डेटॉल हँडवॉश डिस्पेंन्सर बसवण्यात आले होते... दोन ठिकाणी हातपाय धुण्यासाठीची सोय करण्यात आली होती सॅनिटायझर मशीन बसवण्यात आली होती...

सोडियम हायपोक्लोराईडने सॅनीटायझेशन करण्यासाठी स्प्रेपंप घेऊन दिवसात तीन वेळा सॅनीटाझेशन सुरू करण्यात आले होते. संदीप लिंगायत याने हे काम पुढाकाराने केले होते... ऑक्सिमिटर, थर्मल स्कॅनर देवस्थानकडून उपलब्ध करण्यात आले होते. त्यासाठी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशानर्स, ग्रामपंचायत कर्मचारी यांची मदत घेतली गेली होती... सौ. नपिसा मिर, सौ.मणचेकर, सौ.मेस्त्री, सौ.राजापकर, विनायक पावसकर, कैलास कांबळी यांनी ते कोविड चेक अपचे कामकाज पाहिले होते.... मार्गिका करण्यात आली होती, जेणेकरून मंदिरात प्रवेश एकाच मार्गाने झाला. मंदिराचे तीनही बाजूंना मंडप उभारण्यात आला होता...सय्यद हसोळकरने तीनही मंडपाचे वेल्डिंग काम केलेले होते व त्या मंडपाचे ग्रीन शेडनेटचे शिवण, झालर शिवण भगवान पावसकर यांनी केली होती... 'मास्क नाही प्रवेश नाही', 'दो गज दूरी मास्क जरूरी' असे बोर्ड लावण्यात आले होते... औरंगाबादच्या नित्यानंद भोगले देसाई यांनी पंधरा लिटर हँड सॅनिटायझर पाठवून दिले होते. राजा वारीक यांनी पाच लिटर हँड सॅनिटायझर दिले होते.

नरक चतुर्दशीच्या दिवशी रंगीत तालीम झाली होती... उपस्थित भाविक मास्क लावून अंतरा अंतरावर उभे राहून आरती करून गेले होते. सकाळी काकडारतीला २००/२२५ ची उपस्थिती... तो दिवस उत्साह भरून गेला होता... सोमवार दि.१६ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता सर्व मानकरी सेवेकरी खोत मंडळींची मिर्टिंग घेतली होती... तशीच मिर्टिंग कोणतीही नोटीस न काढता केवळ तोंडी निरोपाने बोलवून दि. २३ रोजी पुन्हा घेतली होती... सारे सज्ज झाले होते.... ग्रामपंचायत सदस्य सुध्दा यात सामावलेले होते... सज्जता त्यांचीही झाली होती. अक्षय तिवरांबकरने केलेली प्रकाशझोतांची रोषणाई व गिरीश धनावडे याची ध्वनी प्रकाश व्यवस्था नेत्रदीपक होती... विजय वामन लिंगायत याने संपूर्ण मंदिर परिसरातून कलाकुसरीने व मेहनतीने घातलेली रांगोळी होती... बुधवार दि. २५ नोव्हेंबर... इशारतीचे ढोल वाजले... उत्सवाचा पहिला दिवस सुरू झाला... तुळशी विवाहाने उत्सवाची सुरुवात झाली... तासे-ढोल-टिमकीचे लग्नवाद्य वाजू लागले.... जोशीपणाला जयंत जोशी उपस्थित होते... सोबत प्रकाश परांजपे हजर होते... रात्रौ ठीक ८.३० वा. दो गज दूरी मध्ये सर्व भाविक उभे होते. सारे सारे अनोखे होते. मंत्राक्षतांचे वाटप न होता केवळ तोंडी ''शुभमंगल सावधान'' म्हणायचे होते...त्यामुळे तुळशी विवाहाला 'अक्षता' नाही... केवळ ''शुभ मंगल सावधान''...

सारे मजेशीर होते... हे सर्वांना पचनी पडले आणि हजम सुद्धा झाले.. ☺ रात्रौ ठीक ९.०० वा.धुपारतीची घंटा हलली... स्वागताचे दोन शब्द झाले... स्वामी स्वरूपानंदांच्या संजीवनी गाथेतला अभंग.'' सांगशील तैसा वर्तेन अनंता''... या अभंगाच्या छायेखाली सर्व सांगणे... मास्क, दो गज दूरी, हस्तप्रक्षालन ह्या त्रिसूत्रीचे सर्वांना पुन्हा पुन्हा सांगणे झाले. आरती झाली... ''मेहरबान सलाम'' झाले... पालखी मंदिर प्रदक्षिणेसाठी बाहेर पडली...

भोई... पालखीसोबत नेमस्त मंडळी... नगारखान्यावरून वाजंत्री वाजत होती. उपस्थित बाकी महिला-पुरूष दो गज दूरी मधील आखलेल्या गोलांमध्ये... गाभाऱ्यातला देव मूकशाळेतूनच दर्शन देत होता... तर पालखीतला देव सर्व भक्तांपाशी येऊन दर्शन देत होता... मास्क बांधलेल्या भक्तांसाठी देवदर्शन. असा योग पुन्हा येणार नाही... कधीच नाही... पुण्याच्या श्रेयस बडवेबुवांचे कीर्तन... 'रंगीत संगीत कीर्तन' ऑर्गनसाथीला उदय गोखले, नाणारचे अन् तबला साथीला अमेय हर्डीकर सोलगांवचे... रात्रौ ठीक १० वा कीर्तनाला सुरुवात अन् रात्रौ ठीक १२.३० वाजता वेळेवर कीर्तनाची समाप्ती...

**'कार्तिकी उत्सवातला दुसरा दिवस'**

उत्सवाची सुरुवात इशारतीने झाली... धुपारतीने झाली. ठीक रात्रौ ९.०० वाजता... सर्व भक्तगण डेटॉल हँडवॉशने हातपाय धुऊन, ऑक्सिमिटरने चेक अप करून... थर्मल स्कॅनरने तपासणी करून वेळेवर उपस्थित होते... हात सॅनीटाईझरने सॅनीटाईझ करून प्रवेशित झालेले होते.. मंदिर परिसरात आखलेल्या वर्तुळात स्थिरावलेले भाविक, माता भगिनी, भक्त मंडळी. सभामंडपात मोजक्याच मंडळींची उपस्थिती होती... मुकशाळेत मोजक्याच महिला हजर होत्या... बाकी सर्व मंदिराच्या सभामंडपाबाहेर... मंदिराच्या बाहेर... वर्तुळात उभे राहिलेले सर्व भाविक भक्त... ईशारतीचे ढोल अबोल झाल्यावर दुसरे दिवशीचे सांगणे. स्वामी स्वरूपानंदाच्या संजीवनी गाथेतल्या अभंगाचा आधार घेऊन बोलणे... ११३ वा अभंग...'खेळविसी तैसा खेळेन साचार । तूचि सुत्रधार बाहूलें मी ।।'

देवा तूचि धनी मी तुझा चाकर । तुझाची आधार मज लागी ।
बोलविसी तैसे बोलेन वचन । मज अभिमान कासयाचा ।।
काया वाचा मन तुझ्याचि आधीन । तुझ्या पायी लीन स्वामी म्हणे ।।

स्वामींच्या अभंगाच्या आडोशाने काही अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील अश्या मोजक्या मुर्दाडाना सांगणे असायचे की,''बाबारे सभामंडपात गर्दी करू नका, पालखी बरोबर या वर्षी फिरण्याची गरज नाही... नियम पाळण्यासाठी असतात... नियम पाळा''... मित्रांनो... साधी साधी माणसे ऐकतात,.. निरक्षर तत्काळ ऐकतात,.. पण मूढ, अभिमानी यांना सांगणे कठीण जाते, ... समजावणे त्याहून कठीण होते... मग अश्या मूढांना स्वामींच्या अभंगाचे थोडे थोडे डोस देणेसाठी हा सारा प्रपंच होता... परिणाम चांगला झाला.... सभामंडपातील संख्या कमी होऊन मर्यादित करणे शक्य झाले... पालखी प्रदक्षिणा सुध्दा नेमस्त सेवेकरी मानकरींमध्ये झाली... अगदी सर्व वेळेवर पार पडले...पालखी नंतरचे चहापान मंदिराच्या मागच्या बाजूला पार पडले... माडबनचे कै. मुरलीधर राऊत हे अनेक वर्षे जिथून चहाचा कप स्वीकारायचे 'ती जागा'... अनेकांना त्यांची आठवण यावी म्हणून ही 'खास व्यवस्था'... सर्वांनी हा बदल मनापासून स्वीकारला.... कोणीही कुरकुर केली नाही... ह. भ. प. श्री. बडवेबुवांच्या कीर्तनाची सुरुवात रात्रौ ठीक १० वाजता... सभामंडपाच्या दोन्ही बाजूला खुर्चीवर आसनस्थ झालेला श्रोतावर्ग... कधी नव्हे इतकी उपस्थिती... शेवटचे 'हेचि दान देगा देवा' ठीक रात्रौ १२.३० वा. दुसऱ्या दिवसाचा सामान्य कार्यक्रम असा झाला.

**उत्सवातील 'तिसरा दिवस'...** शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २०२० रोजीचा... सकाळी गांवखडीच्या लिंगायत बंधूंनी श्रीदेवाच्या पिंडीवर अकरा खांबी पूजा बांधण्याची सुरुवात केली होती. त्यासाठी सुमारे ऐंशी किलो तांदूळ लागला होता. त्यांची धांदल चालू होती...'लघुरूद्र स्वाहाकाराचा दिवस' होता...

यज्ञमंडपाची उभारणी उत्सवापूर्वीच झालेली होती. यज्ञकुंड बांधून झालेले होते... यज्ञ समारंभाला यजमान म्हणून श्री.गजानन त्र्यंबक देसाई सपत्नीक पुण्याहून आलेले होते. सकाळी ठीक ८.०० वाजता तासे-ढोल-टिमकीचे मंगल वाद्य सुरू झाले. मुख्य गुरुजींनी श्रीदेवासमोर लघुरूद्र स्वाहाकारासाठीचा संकल्प सोडला... पुण्याहवाचन सुरू झाले. यावर्षी मंदिराच्या मूकशाळेच्या भागात पुण्याहवाचन कार्यक्रम पार पडला... देवता पूजन, नवग्रह पूजन, आदी सर्व झाले... लघुरुद्राचे पठण सुरू झाले. सर्व भाविक भक्तांना सर्व आखलेल्या वर्तुळामध्ये

खुर्च्या ठेवून बैठक व्यवस्था केलेली होती. मास्क, दो गज दूरी, हस्तप्रक्षालन, ऑक्सिमिटर चेक अप, थर्मल स्कॅनीग आदी कोरोनाची सर्व पथ्य पाळून सर्व भाविक भक्त, माता भगिनी, लहान लहान मुले उपस्थित होती. जवळपास २५०/३०० भाविकांची उपस्थिती होती. दुपारी १२.०० वाजता राजापूरचे प्रांताधिकारी श्री. प्रविण खाडे हे स्वतः या कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. श्री देव अंजनेश्वर देवस्थान मार्फत धोतर, उपरणे, शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. ते स्वतः यज्ञमंडपामध्ये आसनस्थ झाले. पूर्णाहुतीचा कार्यक्रम सुरू झाला... गुरुजी श्री. जयंत अभ्यंकर यांनी उपस्थित प्रांताधिकारी श्री. खाडे साहेब यांचे स्वागत केले... यज्ञसमारंभ कशा पद्धतीने संपन्न झाला, कोरोनाचे नियम पाळून कसे कामकाज झाले याची माहिती दिली... प्रांताधिकारी श्री. खाडे साहेबांचे आभार मानले. त्यांची उपस्थिती लक्षणीय ठरली. पूर्णाहुती झाल्यावर आरती झाली... देवाला नैवेद्य दाखवून यज्ञप्रसादाचे वाटप झाले. सिल्व्हर फॉईल पॅकेटस् मधून यज्ञप्रसादाचे वाटप झाले... 'खिचडी प्रसाद' सर्वांना नियमांचे पालन करून मास्क, दो गज दूरी, हस्तप्रक्षालन करून यज्ञप्रसादाचे वितरण झाले... राजापूरच्या दिपक नाटेकरांचे आचारीपण होते. दुपारच्या दोनच्या ठोक्याला सर्व आवरून निवांत झाले... नरेश कांबळी यांचेसह लिंगायत कारभारी मंडळींनी सर्व कामकाज पार पाडले. ब्राह्मण भोजन सुध्दा सिल्व्हर फॉईल पॅकेटस् मधूनच झाले. पंगत नाही, हे विशेष... सर्वांनी समजूतदारपणा दाखवला म्हणून हे सारे शक्य झाले, आणि म्हणून या सर्वांचा उल्लेख करणे महत्त्वाचे वाटते...

विजयराव भुस्कुटे प्रमुख गुरुजी आणि त्यांचे सोबत श्री. दिपक ताम्हनकर, कुवेशी, श्री. अमित निमकर, मिठगवाणे, उदय देव, भू, अनिरुद्ध दीक्षित, कोतापूर, अनिकेत दीक्षित, कोतापूर, मोरेश्वर पाध्ये, रत्नागिरी, प्रा. जयंत अभ्यंकर, कुर्धे-रत्नागिरी, शैलेश हर्डीकर, आडिवरे, प्रदीप रासकर, नाटे, विश्वास परांजपे, आडिवरे, विनय दाते, आडिवरे हे बारा ब्राह्मण यज्ञकार्याला उपस्थित होते. त्या दिवशी रात्रीला नेहमी प्रमाणे ठीक ९.०० च्या ठोक्याला ईशारत, धुपारत... 'कर्म तैसे फळ लाभते केवळ। आणिकांते बोल लावू नये।' या स्वामी स्वरूपानंदांच्या अभंगाच्या आधाराने तिसऱ्या दिवशीचे प्रास्ताविक... जे काय सांगायचे होते ते त्या अभंगाच्या माध्यमातून सांगितले... आरती झाली... पालखी मंदिर प्रदक्षिणेसाठी निघाली. सर्व भाविक भक्त वर्तुळात स्थिरावलेले होते... भगिनी वर्ग सुध्दा आखून दिलेल्या वर्तुळात उभा होता... पालखी प्रदक्षिणा सोहळा पहाण्यासारखा होता व चिरंतन स्मरणात ठेवण्यासारखा होता... सारें सारें नेमस्त होते. ठीक १० वाजता बडवेबुवांचे कीर्तन... कीर्तनाला उपस्थिती वाढली होती... सर्व खुर्चीवर बसून कीर्तन श्रवण करीत होते... तिसऱ्या दिवशीचे कीर्तनसुध्दा ठीक रात्री साडेबाराला समाप्त. हे सारे लिहून कशाला ठेवायचे? काय उपयोग त्याचा? असे नाना प्रकारचे प्रश्न मनाच्या गाभाऱ्यात? उत्तर 'एकच'... कोण असे लिहून ठेवत नाही म्हणून लिहून ठेवायचे... कधीकाळी ते संदर्भ म्हणून विचारात घेतले जाईल... कोणाच्या तरी लिखाणात हे संदर्भ बनून राहील... 'शब्दसुमने कधीच कोमेजत नाहीत.' शब्द 'आधार' बनतात म्हणून लिहायचे.

<u>कार्तिकी उत्सवातला चौथा दिवस...</u> शनिवार दिनांक २८ नोव्हेंबर २०२०... दिवसभर मुंबईकर मंडळींची वर्दावळ... डेटॉल हँडवॉशने हातपाय धुऊन, ऑक्सिमिटर चेक अप, थर्मल स्कॅनीग, व सॅनिटाइझ करूनच सर्वांना मंदिरात प्रवेश दिला जात होता... सर्वांचे उदंड सहकार्य मिळत होते. कुणाचीही तक्रार नव्हती... दिवसातून तीन वेळा सोडियम हायपोक्लोराईडने सॅनीटायझेशन चालू होते... संदिप लिंगायतने सॅनिटायझेशनचे काम अगदी मनापासून केले होते... हँडसनिटायझेनसाठी लिंगायतांमधील चार-पाच मुलांची टिम होती... सर्व भाविक भक्तांचे हात फिरून फिरून सॅनिटाइझ करायचे हे त्यांचे काम होते... लहान लहान मुले अगदी मनापासून नेमून दिलेले काम करीत होती... रात्री ठीक ९.०० इशारतीचे तासे ढोल बडवले गेले... धुपारत झाली... दहावी शालांत परीक्षेत पहिल्या तीन क्रमांकानी उत्तीर्ण झालेल्या साने गुरुजी विद्या मंदिर जानशी शाळेतील मुलांचा कौतुक समारंभ आयोजित केला होता. त्यामुळे त्या दिवशीचे प्रास्ताविक काहीसे त्या कार्यक्रमाला अनुरूप होईल असे होते. स्वामी स्वरूपानंदांच्या 'स्वरूप प्रश्न मंजूषा' या ६५ ओवीबद्ध पत्रांमधील ५७वे पत्राचा आधार घेऊन. 'दाविते ज्ञान भानुते, अज्ञान तम नाशिते।' हे ते

ओवीबद्ध पत्र... याचा आधार घेऊन विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ सरू झाला. प्रत्येक विद्यार्थ्याला ड्रेस सेट, रु. १००० चे रोख बक्षीस, श्री देव अंजनेश्वरचा फोटो, श्रीफळ, पुष्पगुच्छ... उपस्थित भाविक भक्तांचा उत्स्फूर्तपणे टाळ्यांचा कडकडाट... कु. यशश्री संदिप मांजरेकर, कु.श्रावणी पुरूषोत्तम शिर्सेकर, कु.कौस्तुभ संतोष जैतापकर व कु.अभिषेक बळीराम पडवळ या चौघांचा कौतुक कार्यक्रम... बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखेचे मॅनेजर श्री. विजय सखाराम गवाणकर व मिठगवाणे ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच श्री.भालचंद्र चेऊलकर यांच्या हस्ते हा कौतुक कार्यक्रम पार पडला... त्यानंतर नामजप, आरती, पालखी प्रदक्षिणा... सारे सारे वेळेवर पार पडले...

श्री. बडवे बुवांचे संगीत कीर्तन... कधी नव्हे इतका श्रोता वर्ग... खुर्चीवर बसून कीर्तन श्रवणाचे पुण्य घेत होता. साडेबारा वाजता कीर्तन समाप्ती... चौथ्या दिवशी 'विचारा तुम्ही सांगतो आम्ही' असा एक कार्यक्रम नियोजित होता... भाविक भक्तांच्या, देणगीदारांच्या सूचना, मिळाव्या अशी अपेक्षा होती... कुणालाही काही लेखी निवेदने द्यायची असतील तर सोय केली होती... एक ड्रॉप बॉक्स त्यासाठी ठेवला होता. सूचना, तक्रार, हरकती, अभिप्राय आदी कुणाही व्यक्तीला लेखी स्वरूपात करता यावे, लेखी कागद ड्रॉपबॉक्स मध्ये टाकता यावेत, अशी ती सोय... परंतु त्या ड्रॉपबॉक्स मध्ये कोणीच काही पाठवले नसल्याने तो कार्यक्रम करण्याचे औचित्य राहिले नाही... थोडक्यात जे आपण कामकाज करीत आहोत ते योग्य आहे, योग्य दिशेने सुरू आहे, असाच 'निष्कर्ष' त्यातून निघाला होता... दरवर्षी असा कार्यक्रम असावा की जेणेकरून कुणाही व्यक्तीला आपले काही मत मांडायचे असेल तर मांडता येईल... यंदा तशी सुरूवात झाली...

<u>'कार्तिकी उत्सवातला शेवटचा दिवस'... 'त्रिपुरारी पौर्णिमा'...</u> कोरोनाच्या सावटाखाली साजरा झालेला कार्तिकी उत्सव कुणीही जन्मात विसरणार नाही. कोरोनाने काही बाबतीत अडचण आणली असली तरी काही बाबतीत अनेक सुधारणा, अनेक नवीन नवीन प्रयोग करण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्रिपुरारी पौर्णिमेचा दिवस... रविवार २९ नोव्हेंबर २०२०. सकाळ पासूनच मंदिरात भाविक भक्तांची वर्दळ चालू झाली होती... सकाळी बलीपूजनाचा कार्यक्रम सुरू झाला होता... या वर्षी बलीपूजनासाठी श्री.पंकज लक्ष्मण देसाई, पिंपरी गाव, पुणे हे यजमान म्हणून लाभले होते... बलीपूजनाला सकाळी ठीक १०.३० वा. सुरुवात झाली... भुस्कुटे गुरूजी (विजयराव भुस्कुटे) च्या उपस्थितीत 'बलीपूजन' चालू झाले. प्रतिवर्षीचा हा महत्त्वाचा 'धार्मिक कार्यक्रम'. कोरोनाची सर्व पथ्य पाळून मंदिराच्या बाहेर मिठाई प्रसादाची दुकाने, खेळण्यांची दुकाने, भाजीपाल्याचे स्टॉल, हॉटेल, आइस्क्रिमवाले, भेलपुरीवाले हळूहळू येऊन थाटू लागले होते... लाईट व्यवस्थेसाठी देवस्थान मार्फतच जनरेटरची सोय केली होतीच... बाहेर श्री देवाचे कॅश काऊंटर थाटून सज्ज झाले होते. यावर्षी थोडी सिस्टीम बदलली होती...'ड्रॉपबॉक्स सिस्टीम'... देणगीदारांनी देणगीची रक्कम पूर्ण पत्ता, फोन नंबर लिहून, पाकीट बंद करून ड्रॉपबॉक्स मध्ये टाकायची अशी संकल्पना... देणगीची पावती, प्रसाद, अंगारा पोस्टाने पाठवायचे, असे पुढचे नियोजन सर्वांना सांगितलेलेच होते.... एक नवीन पायंडा पडला होता... प्रत्येक देणगीदाराला लाडू प्रसाद बेलपानासह, प्लास्टीक पिशवीतून पॅकींग करून देण्यात येत होता. श्री. विजय गवाणकर व श्री. विलास चेऊलकर यांचे देखरेखीखाली सर्व सुरळीत चालू होते... गर्दी, गडबड काही नाही... सर्व काही विश्वासाने चालले होते... सर्वांनी हा बदल मनापासून अंगीकारला...

दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम... ठिक १२.३० वाजता. श्री देवाला नैवेद्य दाखवण्यात आला... सोबतच्या सर्व देवदेवतांना नैवेद्य दाखवून झाला...त्यानंतर भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप सुरू झाले... या वर्षी महाप्रसादासाठी पंगत नव्हती...सौ. अर्चना अरुण मांजरेकर, माडबन यांचेकडून रु. ७५ हजाराची देणगी महाप्रसादासाठी मिळाली होती व श्रीम. पूनम महादेव उन्हाळेकर, मिठगवाणे बौद्ध वाडी यांचेकडून रु. १५ हजार महाप्रसादासाठी देणगी मिळाली होती... दोघींचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.... डॉ. सौ. मंजिरी देसाई यांचे हस्ते सत्कार झाला... त्यानंतर लगेचच महाप्रसादाचे वाटप सुरू झाले... सिल्व्हर फॉईल मधून पॅकींग केलेला महाप्रसाद. 'साखरभाताचा महाप्रसाद'... सर्व भाविक भक्तांना 'दो गज दूरी' मध्ये राहून महाप्रसादाचे वाटप

झाले... अजिबात गडबड गोंधळ नाही... तीन साडेतीन हजार पॅकेटस् मधून प्रसादाचे वाटप झाले... प्रसाद घेऊन सर्व भक्त आपापल्या घरी परतले. महाप्रसादाचा कार्यक्रम दुपारी दोन वाजता आटोपला... काहींनी हा महाप्रसाद थेट मुंबईपर्यंत नेला... रात्री ठीक ८.०० वाजता 'त्रिपुर पूजनाचा' कार्यक्रम होता. अगदी नेमस्त कार्यक्रम. रात्रीचा पालखी सोहळा अगदी विलक्षण व तितकाच संस्मरणीय. लोटांगण घालण्यासाठी आलेल्या सर्व भक्तांना आयडेंटिटी कार्ड दिले होते...त्यांचे थर्मल स्कॅनिंग, ऑक्सिमिटर चेक अप, सॅनीटायझेशन केले होते... दरबार झाडणाऱ्या स्त्रियांना आयडेंटिटी कार्ड दिले होते. त्यांचेही थर्मल स्कॅनिंग, ऑक्सिमिटर चेक अप, सॅनिटायझेशन केले होते... पालखीला खांदा मारणाऱ्या भाविकांना सुध्दा आयडेंटिटी कार्ड दिले होते...त्यांचेही चेकअप झाले होते. उपस्थित सर्व भाविक भक्तांच्या हातांचे सॅनिटायझेशन दोन तीन वेळा केले होते... ठीक बाराच्या ठोक्याला ईशारतीचे ढोल वाजले गेले... 'घुपारती'... आभाराचे दोन शब्द झाले... चार दिवसाचे समालोचन करण्यात आले... सर्व वर्षभराचा धावता आढावा घेण्यात आला...दिवंगतांना श्रध्दांजली झाली. कामकाजात सहभागी झालेल्या सर्वांचे आभार मानले गेले...

'तू बुद्धी दे, तू तेज दे' या प्रार्थनेचा पुन्हा संदर्भ घेण्यात आला. त्यानंतर आरती... पालखी प्रदक्षिणा... अगदी सारे शिस्तबद्ध. जराही गडबड गोंधळ नाही. लोटांगण घालण्याचा नवस पूर्ण झाला... दरबार झाडणाऱ्या महिलांचा नवस पूर्णत्वास गेला... पालखीला खांदा मारण्याचा भाविक भक्तांचा नवस सुद्धा पूर्ण झाला... पालखी प्रदक्षिणा अगदी नियोजित वेळेत पार पडली. देव सभास्थानी बसवणे झाले. श्री. बडवेबुवांचे लळीताचे कीर्तन सुरू झाले. 'तीर्थ चरणीचे शीतल' हे लळीताचे पद झाले... समारोपाला सकाळी पाच वाजता सुमारे तीन साडेतीनशे भाविक भक्तांची उपस्थिती होती... सर्वांना प्लास्टीक पिशवीतून पॅकींग केलेला लाडू प्रसाद देण्यात आला. सोबत बेलाचे पान देण्यात आले... मानकरी सेवेकरी मंडळींना मानाचे श्रीफळ देण्यात आले... उत्सव निर्विघ्नपणे पार पडल्या बद्दलचे लिंगायत गुरवांचे गाऱ्हाणे झाले... 'अनंत कोटी ब्रम्हांडनायकाचा जयजयकार'... इथे उत्सवाची समाप्ती. हे सर्व लिहून ठेवायचे अशासाठी की कधी काळी हे लिखाण संदर्भ म्हणून उपयोगाचे होईल... कोरोनाचे सावट असताना सुद्धा सर्वांच्या उदंड सहकार्याने उत्सव निर्विघ्नपणे पार पडला होता, हे स्मरणात राहावे म्हणून हे लिखाण करून ठेवायचे... सामाजिक स्मरणशक्ती अगदी अल्प असते असे म्हणतात... म्हणून हे असे सारे शब्दबद्ध करून ठेवायचे... 'ट्रस्टीपण हे मिरवायचे पद नसते'..., 'पुढाकार घेऊन खपायचे पद असते'..., हे कधी काळी ठोकून सांगता आले पाहिजे म्हणून लिहून ठेवायचे...'सत्य अंधारात चाचपडत रहाता नये' म्हणून सारे सारे उजेडी ठेवण्यासाठी लिखाण करून करायचे...

● <u>'जनरल मिटिंग... महाशिवरात्री उत्सव पूर्वीची जनरल मिटिंग'...</u> सोमवार दिनांक ०१.०३.२०२१ रोजी संध्याकाळी ठीक ७.०० वाजता श्री देव अंजनेश्वर देवस्थानच्या सर्व विश्वस्त, खोत मंडळी, सेवेकरी, मानकरी, देणगीदार, व सर्व हितसंबंधी आसामींची जनरल मिटिंग बोलवण्यात आली होती.. सभेची नोटीस सोमवार दि. २२ फेब्रुवारी २०२१ रोजी श्री देव अंजनेश्वरच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली... बारा गांवच्या खोतांना सभेची नोटीस बजावण्यात आली... सर्व विश्वस्त, सेवेकरी, मानकरी यांना सुद्धा वैयक्तिकरीत्या सभेची नोटीस बजावण्यात आली... व्हॉटसप व फेसबुकच्या माध्यमातून सभेच्या नोटीशीला प्रसिद्धी देण्यात आली होती... सभेला 'एकूण ६३' उपस्थिती संख्या होती... सभेचे व्हिडीओ शूटींग करण्यासाठी श्री. प्रशांत भडेकर उपस्थित होते... कोरोनाच्या अटीशर्तीमुळे मंदिराच्या बाहेर सभा सुरू करण्यात आली.... सभेसाठी आसन व्यवस्था म्हणून खुर्च्यांची मांडणी केलेली होती... सर्वांना नीटपणे समजावे, ऐकू यावे म्हणून स्पीकर व्यवस्था होती... सभेमध्ये महाशिवरात्री उत्सवाचे संपूर्ण नियोजन सांगण्यात आले... कोरोना प्रादुर्भावामुळे उत्सवाची वेळ संध्याकाळी ७.०० ते रात्री १०.०० पर्यंत मर्यादित करण्यात आली होती... ही बाब राजापूरचे मे. उपविभागीय अधिकारी श्री. प्रविण खाडे साहेब यांची ऑर्डरसविस्तरपणे स्पष्टीकरण देऊन वाचून दाखविण्यात आली... उत्सवातील बारीक सारीक नियोजन सांगण्यात

आले... दि.२८ मार्च २०२१ रोजीच्या होळी उत्सवाबाबतचे नियोजन सांगण्यात आले... होळी उत्सवाला सुद्धा संध्याकाळी ४.०० ते रात्री १०.०० असे वेळेचे बंधन असल्याचे विस्ताराने सांगितले... मर्यादित उपस्थितीत होळी उत्सव पार पाडला पाहिजे, ह्या बाबत अनेक गोष्टी सांगितल्या... त्यानंतर तिसरा महत्त्वाचा विषय दानपेटी बसवण्या बाबतचा होता... दानपेटी बसविण्याचा विषय सर्वांना सुस्पष्ट करून सांगितला... दानपेटी आवश्यक का आहे, त्यामधील कायदेशीर व व्यवहार्य बाबी सर्वांना समजावून सांगितल्या... दानपेटी देवाच्या गाभाऱ्यातील जागेत न बसवता त्या दानपेट्या मूकशाळेच्या भागात बसवणे सोयीचे होईल व कुणाचीही तक्रार रहाणार नाही, ही बाब सुस्पष्ट करून सांगितली. पूर्वापार चालत आलेल्या प्रथेला, परंपरेला धक्का न देता दानपेटी बसवण्याबाबतचा विचार विस्ताराने सांगितलेला... दानपेटी बाबत सुरक्षेसाठीचे उपाय विशद करून सांगितले... सी.सी.टि.व्ही.सेफ्टी अलार्म, मोशन सेंसर, आदी केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली... दानपेटी बाबत धर्मादाय कार्यालयाकडील परिपत्रके, सुप्रीम कोर्टाकडील जजमेंटचा संदर्भ वाचून दाखवला... दानपेटी बाबत जवळपास ४०/४५ मंदिरांचा जो सर्व्हे केलेला होता तो सविस्तरपणे सांगितला... दानपेटीबाबतचे काही मंदिरामधील अनुभव ऐकायला मिळाले ते सर्वांना सांगितले....दानपेटीबाबत आयकर कायद्याचा दृष्टिकोन काय आहे, हे समजेल अशा भाषेत सोप्या भाषेत सांगण्याचा प्रयत्न केला... मोठ्या रक्कमेची निनावी देणगी, गुप्तदान, Anonymous donation देत असताना ती देणगीची रक्कम सुरक्षित रहाण्यासाठी बंदिस्त दानपेटी शिवाय अन्य पर्याय नाही, ही बाब सर्वांच्या लक्षात आणून दिली... २०१६ मधील नोटाबंदी पासून दर्शनासाठी येणाऱ्या बाहेर गांवच्या भक्त मंडळींकडून दानपेटी बाबत नेहमी विचारणा होत आहे... दोन-तीन देणगीदार भक्तांची रोख रकमेची मोठी देणगी केवळ दानपेटी नाही म्हणून घेता आली नाही ही बाब आयकर कायद्याच्या आधारावर स्पष्ट करून सांगितली.....ऑडिट अकाऊंटींगचे वेळी व धर्मादाय कार्यालयात ऑडीट दाखल करताना दानपेटी बाबत नेहमीच विचारणा व्हायचीच व्हायची... ही बाब सर्वांच्या नजरेस आणून दिली... धर्मादाय खात्याकडील परिपत्रकामध्ये देणगीच्या पावत्यांचे (Donation) व देवापुढील दानाचे (Offerings) ऑडिट अकाऊंटींग झाले पाहिजे व ते दोन्ही मिळून एकत्रित एकूण उत्पन्न म्हणून नोंदले गेले पाहिजे, ही बाब सर्वांना समजावून सांगितली... मिटिंगमध्ये ट्रस्टमधील विश्वस्त मंडळींचे अधिकार व त्यांच्या त्यांच्या कार्यकक्षा समजावून सांगितल्या... मिटिंगमधील उत्सवाचे नियोजन व दानपेटी बाबतचा विषय विस्ताराने सांगितल्यामुळे कोणतीही शंका उरली नाही... कोणी विरोध नोंदवण्याचा प्रश्न आला नाही... श्री.भिकाजी लिंगायत यांनी दशावतार करण्याबाबत आपले मनोगत मांडले... परंतु उत्सवाची परवानगी फक्त धार्मिक कार्यक्रमाकरिता होती त्यामुळे करमणुकीचे कार्यक्रम करता येणार नाहीत... पुढील उत्सवात दशावतार करता येईल, असे समजावून सांगितले... उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त करून मिटिंग ठीक पावणे नऊला संपली... या महत्त्वाच्या मिटिंगचे लेखी प्रोसीडींग व या संपूर्ण मिटिंगचे व्हीडीयो चित्रीकरण भविष्यासाठी 'एक महत्त्वाचा दस्त' बनून राहिले आहे... महत्त्वाचे निर्णय घेत असताना ते सर्वांसमोर घेतले गेले की निर्णयाची बळकटी काही पटीने वाढते... दानपेटी बसविण्यासारखे निर्णय नाराजी ओढवून घेणारे असले तरी त्याची गरज, कारणमीमांसा, हेतू, उद्देश सर्वांसमोर ठेवली गेली की अकारण विरोध करणे तितकेसे सोपे रहात नाही... मित्रांनो... श्री देव अंजनेश्वरचे काम करत असताना वैयक्तिक हितसंबंधांना फारसे महत्त्व दिले जात नाही... सार्वजनिक कामकाजात '१००% यश' आणि 'सर्वांचा होकार' कधीच अपेक्षित धरू नये... निस्पृहतेने कामकाज करणे इतकेच त्यामध्ये जास्त महत्वाचे आहे...

- <u>'महाशिवरात्री उत्सव' सन २०२१'...</u>

हा महाशिवरात्री उत्सव चिरंतन स्मरणात राहील असा पार पडला... चिरंतन स्मरण अशासाठी ठेवायचा की असा उत्सव ह्या पूर्वी अशा पद्धतीने कधीही झालेला साजरा झालेला नाही म्हणून स्मरणात ठेवायचा व भविष्यात सुद्धा अशा पद्धतीने उत्सव साजरा करण्याची वेळ येऊ नये म्हणूनही स्मरणात ठेवला पाहिजे... रोज संध्याकाळी 'ठीक ७.००' वाजता उत्सवाची सुरुवात झाली व रात्री ठीक १०.०० वाजण्याच्या पूर्वी रोजच्या कार्यक्रमाची समाप्ती झाली...

घड्याळाच्या काट्यावर सारे काही करायचे होते. मे. उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी अशाच पद्धतीने उत्सव साजरा करण्याची परवानगी दिल्यामुळे हे सर्व बंधनकारक झाले होते... रात्री १० नंतर संचारबंदीचे नियम लागू करण्यात आले होते. ठीक संध्याकाळी ६.१५ वा. लाऊडस्पीकर वरून सनई लागायची...ठीक ७.०० वाजता सनई बंद होऊन नगारा लागायचा... धुपारतीची घंटा खणखणायची...मोजकीच मंडळी सभामंडपात उपस्थित रहायची... बाकी सारे सारे मर्यादेच्या वर्तुळात उभे रहायचे... ॐ नम: शिवाय चा ४/५ मिनिटांचा जप... 'आवडी गंगाजळ'... फक्त एकच आरती... 'हरहर महादेव' चा जयघोष... 'मेहरबान सलाम'ची देवाच्या महालकरी मसूरकराची ललकारी... ढोलताशांच्या गजरात पालखी प्रदक्षिणेसाठी श्रीदेव सज्ज... पालखीचे भोई नेमस्त... पुढचे भोई काजवे... फक्त तीन काजवे व पाठचे भोई फक्त तीन कांबळी... मशालीचे मानकरी मोहीते... हिलालबीडी लिंगायताचे हाती... पंचारतीची ओवाळणी घेतलेला किल्लेकर सुधाकर लिंगायत... दोन पेट्रोमॅक्स मानाच्या म्हणून पाजळलेल्या... मोरपिसाने वारा घालणारे सोनार पाटणकर... चांदीच्या चवरीने वारा घालणारे देसाई... अब्दागीर घेतलेला कांबळी (मटकरी)... सारे सारे नेमस्त... गडगेकर, गवाणकर, राऊतांची भोवतीची गाणी... सोमसूत्री प्रदक्षिणा... बाकी सारी सारी भक्त मंडळी वर्तुळात उभे... तिथेच पालखीतल्यादेवाचे दर्शन...

'तू आहेस तिथेच थांब... मी तुझ्यापाशी येतो' असा तो भगवंती आदेश होता... सारी प्रदक्षिणा अर्ध्या तासात आटोपायची. साडे सात वाजता प्रदक्षिणा मारून देव पुन्हा सभामंडपात. पुन्हा 'लवथवती विक्राळा'... पुन्हा 'अनंत कोटी ब्रम्हांडनायक...चा जयघोष'. 'हर हर महादेव' पुन्हा एकदा... ढोल ताशांचा पुन्हा एकदा झंकार... असे हे रोजचे... त्यानंतर लगेचच कीर्तन सुरू. सभामंडपात मोजकेच बुजुर्ग... दो गज दूरी मध्ये बसून. बाकी मंडळी सभामंडपाच्या दोन्ही बाजूला खुर्चीवर बसून... डोंबिवलीच्या ह.भ.प. सौ. स्नेहल पित्रे यांचे कीर्तन... साथीला नाणारचे श्री. उदयबुवा गोखले ऑर्गन साठी व कशेळीचे श्री. आनंदा ओळकर तबल्यासाठी. दोन तासांचे कीर्तन 'हेचि दान देगा देवा' ठीक १० वाजण्याच्या पूर्वी. अगदी कटाक्षाने... रात्री १० च्या पूर्वी सर्व 'पूर्ण'... तीन दिवसांची किर्तन सेवा.. .कधी नव्हे इतकी उपस्थिती. शेवटच्या दिवशीच्या लळीताच्या कीर्तनाला सुद्धा सुमारे तीन-साडेतीनशे भाविक भक्तांची उपस्थिती असायची.... समारोपाच्या दिवशी प्लास्टीक पिशवी मध्ये पॅकिंग केलेला 'बुंदी लाडू' आणि 'बेलाचे पान' सर्व उपस्थित भाविकांना वाटण्यात आले... तीन दिवसांत कुठेही 'भाषणबाजी' नाही...'सूचनाबाजी' नाही...'स्वागतबाजी' नाही... 'आभारबाजी' नाही... स्पीकरचा आवाज मंदिराच्या बाहेर पडला नाही... तासेढोल नगारखान्यावरच वाजले... सारे सारे नेमस्त अन् मर्यादेत... कोरोनासुराने सारे सारे शिकवले... शिकण्यास भाग पाडले.... 'देव करतो ते भल्या साठीच', असेच काहीसे म्हणायचे... असाच उत्सव पुढील वर्षी करूया, असा सर्वांचा अभिप्राय...

- <u>'होळी पौर्णिमा २०२१ मधली'... 'अनोखी अनोखी'...</u>

'अस्माभिर्भयसन्त्रस्तैः। कृता त्वं होलिके यतः।।
अतस्त्वां पूजयिष्यामि। भूते भूतिप्रदा भव।।
प्रवृत्ते मधुमासे तु। प्रतिपत्सु विभूतये।।
कृत्वा चावश्यकार्याणि। सन्तर्प्य पितृदेवताः।।
वंदितासि सुरेन्द्रेण। ब्रह्मणा शंकरेणच।।
अतस्त्वं पाहि माम् देवी। भूते भूतिप्रदा भव।।'

-स्मृति कौस्तुभ ग्रंथ.

मित्रांनो... हे सारे होळीच्या पूजा विधीतले. यातले 'भूते भूतिप्रदा भव' हे महत्त्वाचे... यावर्षीचा होळी पौर्णिमेचा उत्सव काहीसा अनोखा साजरा झाला... शासनाच्या कडेकोट निर्बंधामुळे व दिवसागणिक बदलत्या सूचनांचे पालन

करून झालेला उत्सव म्हणून 'अनोखा'.... 'अनोखा'... रविवार दि.२८ मार्च २०२१... कधी नव्हे ते संध्याकाळी ठीक ६.०० वा. होळी साठी सर्व गावकरी निघाले. होळीला पायी चालत जायचे नाही, ट्रकातून जायचे अथवा अन्य वाहनातून होळी आणायची हे अगोदरच सर्वांनी मिळून ठरवलेले होते. ढोल वाजंत्री ट्रकात, निशाणाचे मानकरी मोहीते, प्रिंदावणकर निशाणांसह ट्रकात...होळीचा शेंडा बांधणारा गवाणकर ट्रकामध्ये आणि देवीचा गांवकर सोबत. अंजनेश्वर मंदिरामधून गावकर मसूरकराचे आणि लिंगायत गुरवाचे संयुक्त गाऱ्हाणे घालून ट्रकातले खेळगडी निघाले. 'होळी हाणूक...!!!'.... ट्रकातून वाजतगाजत... पाठीमागे बघता बघता दुचाकी घेऊन बाकीचे खेळगडी निघाले..... गाड्यांची मोठी लाईन लागली. दळ्यावरच्या गोखल्यांच्या घरी ठीक ७.०० वाजता सर्व पोहोचले... गोखले घराण्यातील श्री. मिलिंद गोखले यांनी सर्व खेळगड्यांचे स्वागत केले.... 'दळेगांवचा खोत'..... 'गोखले खोत'.. निशाण पूजन झाले. सर्व खेळगड्यांना प्लास्टीक पिशवीतील पॅकबंद केलेला बुंदी लाडू अन् चिवडा मिळाला... सोबत कडकडीत चहा मिळाला... ढोलकऱ्यांना खेळेपणाचे 'पाकीट' मिळाले... निशाणधारी मोहीत्याला खेळेपण मिळाले... ते खुष झाले... होळीची पोफळ निशाणी लावून तुटली... होळीला स्त्रियांची आरती ओवाळणी झाली... होळीची पोफळ ट्रकात... खेळगडी परतीच्या वाटेवर... ठीक साडेसात वाजता.... होळीचा ट्रक पुढे व सर्व दुचाकीवरचे खेळगडी पाठोपाठ... सारेच रम्य व तितकेच 'मनोहर'... गावातील होळी सदाभाऊ भुस्कुटे यांचे घरी होती... तिथेही निशाण पूजन झाले. खेळगड्यांना प्लास्टीक पिशवीतील पॅकबंद लाडू मिळाले... पाटणकरांकडे होळीची पोफळ होती... तिथे मोहीत्याने निशाणी केली... होळीची पोफळ तुटली... दोन्ही होळ्या मंदिराच्या नगारखान्यापाशी आल्या... गवाणकर पावसकर कुटुंबातील वारसवंशांनी होळीचा शेंडा बांधला. हो... हा त्यांचा 'मोठा मान'... दरवर्षाला समस्त गवाणकर पावसकर मोठ्या संख्येने हजर रहातात... कोरोनामुळे यंदा स्थानिक वारसवंशजांनी कामकाज उरकले... शेंड्याचे मानकरी म्हणून गवाणकरांना व होळीचा खड्डा काढतो म्हणून गडगेकराला 'मानाचा नारळ' मिळाला... लिंगायत गुरवाची होळीपूजा आटोपल्यावर या वर्षीची होळी न खेळवताच नेमात गेली. होम झाला... भुस्कुटे गुरूजींनी ते 'वंदितासि सुरेन्द्रेण'... म्हटले... गंध फूल अर्पण झाले... पुन्हा तासे ढोलांनी ठेका धरला... शेठकरांनी (शेठकर म्हणजे गावातील तेली समाज) दुसऱ्या होळीला खांदा मारला. होळी मुहूर्ताच्या चरणापाशी आली. गंध अक्षता फुले वाहून झाली... क्षणभर थांबलेले तासे ढोलांना खुणवू लागले... ढोल ताशांच्या गजरात होळी मांडावरच्या नेमात विसावली. 'बोब रे बोब रे होळ देव !!!!'... यंदा होळी उत्सवात मदिरादेवी फिरकलीच नाही... सर्व साडे नऊच्या ठोक्याला पूर्ण झाले. उत्सव परवानगी रात्री १० पर्यंतची होती. कोरोनामुळे अनेक गोष्टी नवीन नवीन शिकता आल्या... अनुभवता आल्या... 'मास्क, सॅनिटायझर, दो गज दूरी'चा मंत्र जपून उत्सव साजरा झाला... 'असे ही होऊ शकते', हे सिद्ध झाले... 'कसे होणार?'.... ' लोक इतक्या लवकर कसे येतील??', 'इतके सर्व भरभर कसे होईल???'... सर्व प्रश्न निरूत्तर झाले. या सर्व कार्यक्रमात एक गोष्ट करता आली. धुलीवंदन तथा धुळवड... मित्रांनो,...काल धुलीवंदनाचा दिवस सरला. 'धुळवड संपली'... शासनाच्या SOP (Standard Operating Procedure) तथा मार्गदर्शक नियमावलीचे कठोर पालन करून कालचा होळी उत्सवातला 'दुसरा दिवस' इथे निर्विघ्नपणे पार पडला. प्रतिवर्षी सामान्यपणे पहाटे पाच साडेपाचला अंजनेश्वरच्या देवळाजवळ एका होळीचा होम करायचा... दुसरी होळी गोलंदशीत आणून ठेवायची... सकाळ पासून गवाणकर पावसकर कुटुंबातील वारसवंशांनी होळीचा शेंडा बांधायचा... रात्रभराचे जागरण असतानाही गायीगुरांपासून त्यांनी होळीची राखण करायची... स्वर्गीय सखाराम गवाणकर, स्वर्गीय आप्पा पावसकर यांना शेंडा बांधताना आम्ही पाहिलेले आहे... गावांतील रोहिदास (चर्मकार) समाजाचा हा 'मोठा मान'... 'होळीचा शेंडा बांधण्याचा मान'... या प्रीत्यर्थ श्रीदेवाच्या मालकीची जमीन वहिवाटीसाठी 'इनाम' म्हणून मिळालेले घराणे 'मिठगवाणे रोहीदास वाडीतील गवाणकर/पावसकर'... अनेक वर्षे हा शेंडा बांधण्याचा मान निरपेक्षपणे केला जात होता,... वर्षानुवर्षे... अलीकडील १२/१३ वर्षांमध्ये गवाणकरांना मानाचा नारळ देण्याची प्रथा रुजवलेली आहे... (त्यापूर्वी कधीही मानाचे श्रीफळ देणे झालेलेच नव्हते म्हणून हे स्पेसिफिक लिहून ठेवले आहे)... अनेक वर्षे होळीचा शेंडा बांधायची

'निरपेक्ष सेवा' केल्याचा तो मान आहे. कै. प्रकाश सखाराम गवाणकर व श्री. विजय सखाराम गवाणकर या दोन्ही बंधूंच्या आग्रही भूमिका यात महत्त्वाची होती, हेही तितकेच सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे...असो... शेंडा बांधायचा तो होळी खेळताना शेंड्याची मोडतोड होऊ नये म्हणून... ट्रक्शन बांधावा इतक्या मजबुतीने तो शेंडा बांधला जातो... तासेढोल वाजले की खेळगडी जमणे, गोलंदशी ते मुहूर्ताई मंदिरा पर्यंत होळी खेळवण्याची ती पध्दत... श्री देवी मुहूर्ताईच्या गाभाऱ्याच्या वहाणीपाशी होळीचा बुंधा टेकवणे आणि पुन्हा समोरून येऊन देवीच्या चरणी होळीचा शेंडा लावणे,... हा तो वर्षोवर्षीचा रिवाज. तिथे पुन्हा देवीच्या गांवकराकडून पूजा केली जाणे. नंतर मुहूतदिवी ते देवीचा मांड येथपर्यंत होळी खेळवत घेऊन जाणे, तासेढोलांच्या गजरात मांडावरच्या नेमात होळी घालणे... होळी उभी करणे... होम करणे...हे वर्षानुवर्षाचे... या सर्व खेळात 'शेठकर' म्हणजे तेली समाजाची उपस्थिती लक्षणीय. त्यानंतर संध्याकाळी मांडावरची गाऱ्हाणी देसायांपासून सुरवात...माडबनचे गवाणकर खोत मंडळी, भंडारसाखरीचे साखरकर खोत मंडळी, बाकाळचे परांजपे खोत, तिवरांबीचे जोशी खोत आदी खोतांची गाऱ्हाणी व त्यानंतर मग सर्व उपस्थितांची गाऱ्हाणी. गाऱ्हाण्याचे एक दोन पोती नारळ, गूळ ढेपीसह निशाणाधारी मोहीत्या पाठोपाठ पुन्हा श्रीदेवी मुहूर्ताच्या मंदिरात जाणे... देवीला, निशाणांना व देवीच्या रखवालदारांना गुळखोबऱ्याची खिरापत... ४०/५० नारळ फोडून नारळाचे पाणी सर्व खेळगड्यांच्या मुखी लावायचे, बचकाभर खिरापत आणि नारळाची एक एक कवटी याचे वाटप... विसावले ढोल ताशांच्या गजरात पुन्हा निशाणांसह खेळगडी अंजनेश्वरच्या नगारखान्या पाशी... उत्सव पूर्ततेचे देवाला सांगणे व पुन्हा मोहीत्याने निशाणे घेऊन श्रीदेवीच्या मंदिरात जाणे... दरवर्षी हा सर्व संस्कार पूर्ण व्हायला रात्रीचे दहा साडे दहा वाजतात... यंदा कोरोनामुळे सारे सारे बदलले... शेंडा बांधण्याचे कामकाज पौर्णिमेच्या दिवशी पार पडले... देवीच्या मांडावरची होळी पौर्णिमेलाच रात्री साडे नऊ वाजता नेमात गेली. सकाळच्या वेळात होळी खेळवणे झाले नाही... कालचा धुळवडीचा दुपारचा होम ११ वाजता झाला...'सारे सारे नेमस्त' खेळगड्यांच्या उपस्थितीत... संध्याकाळी ठीक ७.०० गाऱ्हाणी चालू अन् साडे सात वाजता गाऱ्हाण्यांचा कार्यक्रम संपवण्यात आला. सर्व काही नाकातोंडावरचे 'मास्क' लावून... सामान्यपणे 'दो गज दूरी' च्या आखलेल्या वर्तुळामध्ये... सारे सारे नेमस्त,... अन् मर्यादेत... निशाणे श्री देवीच्या मंदिरापाशी गेल्यावर देवदेवतांना गुळखोबऱ्याचा नैवेद्य... सर्व खेळगड्यांच्या हाती फक्त नाराळाची एक एक कवटी... निशाणे वाजतगाजत ठीक अंजनेश्वर मंदिरामध्ये... शासनाची संचारबंदी लागण्याच्या पूर्वी दोन मिनिटं सारे सारे उरकलेले... सारे सारे नियमात... कुणाला बोलायचे काम नाही. घटनाक्रम लिहून ठेवला की तो 'एक दस्त' बनून रहातो... कधीकाळी त्याचा रेफरंन्स म्हणून उपयोग होतो. समाजस्मृती कमी कालावधीच्या असतात. १०/१२ वर्षानंतर हे असे झाले होते, हे आठवत सुद्धा नाही... अर्थात हे सर्व सर्वांच्या सहकार्यामुळेच, समंजस लोकसहभागातून होत असते... तथापि यासाठी सुद्धा कुणीतरी 'पुढारपण' घेतलेले असते, हे सुद्धा समाजस्मृतीतून विरून जाऊ नये म्हणून हे लिखाण करून ठेवायचे...

- <u>'दानपेटीबाबत'...</u>

'दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ।।'

भगवद्गीता अध्याय १७.२०

प्रत्युप्काराची, प्रसिद्धीची, नावाची अपेक्षा न करता दिलेले दान 'सात्विक दान' समजले जाते. तसेच आपले दान सत्पात्री होईल, सत्कारणी लागेल, योग्य पद्धतीने विनियोगात येईल, अयोग्य पद्धतीने खर्च केले जाणार नाही याची पूर्ण खात्री बाळगून दिलेले दान सात्विक दान होते, असे भगवद्गीता सांगते. असे सात्विक दान पुण्यदायी समजले जाते. देवतेच्या समोर ठेवलेले सर्व दान हे देवतेसाठी भक्तांने अर्पण केलेले असते. ते दान देवतेसाठी खर्च व्हावे व त्याचा हिशोब ठेवला जावा हा कायद्याचा दंडक आहे हे सर्वांनी पुरते लक्षात घेतले पाहिजे... निनावीदान, गुप्तदान,

Anonymous Donation दानपेटीतील दान हे सर्व सात्विक दानाच्या प्रकारात मोडतात व असे दान दानपेटी शिवाय कायदेशीररीत्या स्वीकारताच येत नाही. 'श्रीदेव अंजनेश्वरच्या मंदिरात दोन दानपेट्या मंगळवार दिनांक ०२ मार्च २०२१ माघ कृष्ण चतुर्थी शके १९४२ (अंगारक संकष्ट चतुर्थी) रोजी बसविण्यात आल्या आहेत. ह्या दानपेट्या देवस्थानच्या जनरल मिटिंगमध्ये विस्ताराने सांगून नंतर बसवण्यात आल्या आहेत.सोमवार दि.०१ मार्च २०२१ रोजीच्या जनरल मिटिंगमध्ये या दानपेट्यांबाबतची कायदेशीर माहिती, घडावटीचा तपशील विस्ताराने सांगितलेला आहे. प्रत्येक दानपेटीला रक्कम रु. २२ हजाराचा खर्च आलेला आहे. ३ फूट लांब २ फूट रुंद व १ फूट उंच अश्या आकारमानाच्या दानपेट्या सुमारे ३५ किलो वजनाच्या असून प्युअर स्टेनलेसस्टील मध्ये घडवलेल्या आहेत. दानपेट्यांच्या घडावटीचे कामकाज मे. गोखले ब्रदर्स, कोल्हापूर (गोखले भांडीव्यापारी) यांनी विशेष लक्ष देऊन केलेले आहे. सुमारे ४०/४२ मंदिरातील दानपेट्यांचा सर्व्हेकरून झाल्यानंतर व अनेक ठिकाणचे दानपेटी बाबतचे अनुभव लक्षात घेऊन घडावटीचे काम केलेले आहे. तसेच सी.सी.टी.व्ही. सिस्टीम, सेफ्टी अलार्म सिस्टीम, मोशन सेन्सर, रात्रीची प्रकाश व्यवस्था, दानपेटीला दोन कुलुपांची सोय, दर पंधरा दिवसांनी दानपेटीतील रक्कम पंचसाक्षीने बँक भरणा करणे आदी सुरक्षेचे सर्व उपाय केलेले आहेत.दानपेट्या बसवल्या बाबतची माहिती मे.सहाय्यक पोलिस निरीक्षक, नाटे पोलिस स्टेशन, मे.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रत्नागिरी व मे.उपविभागीय दंडाधिकारी, राजापूर यांना लेखी पत्रव्यवहार करून देण्यात आली आहे. दानपेटीचा मुख्य उद्देश.... श्रीदेवाला हजारो, लाखो रुपयांची मोठी देणगी निनावी पद्धतीने व गुप्तपणे भक्ताला अर्पण करता यावी, देणगी अर्पण केल्यावर देणगीची पावती(Receipt) ज्या भक्ताला आवश्यक वाटत नाही, अशा भक्ताला दान देण्याची सोय व्हावी, या प्रमुख उद्देशाने ह्या दानपेट्या बसवलेल्या आहेत. तसेच ज्या भक्ताला एक रुपया पासूनचे अल्पस्वरूपातील दान द्यायची इच्छा असेल व अशा अल्पस्वरूपातल्या दानाची पावती देणे शक्य होत नसेल, अशावेळी दान देण्याची सोय म्हणून ही दानपेटी आहे. एक रुपयाचे दान देणारा भक्त असो अथवा लाखो रुपयांचे दान देणारा भक्त असो, दानपेटीत अर्पण होणारे दान (Offerings/Anonymous Donations) श्रीदेवाच्या यज्ञयागादी धार्मिक कार्यात, उत्सव कार्यात, वार्षिक समाराधनेमध्ये वापरले जाणार आहे. तसेच दान एक रुपयाचे असो अथवा लाख रुपयांचे असो, दानपेटीत अर्पण होणाऱ्या दानाचे ऑडीट-अकौटिंग होणार आहे. दानपेटीतील सर्व रक्कम वेळोवेळी श्रीदेवाच्या बचत खात्यात भरली जाणार आहे व त्या बाबतचे हिशोब स्वतंत्रपणे ठेवले जाणार आहेत. तसेच वार्षिक अहवालात एक रुपया पासून लाखो रुपये अर्पण झालेल्या एकूण दानाला दानपेटी निधी म्हणून ठळकपणे नोंद घेतली जाणार आहे. थोडक्यात दानपेटीतील पैसांपैसा श्रीदेवाच्या खाती जमा होणार आहे व श्रीदेवाच्या धार्मिक कार्यासाठीच खर्चिला जाणार आहे. दानपेट्या बसवताना त्या मूकशाळेच्या दर्शनी भागात, दोन द्वारपालांच्या पुढ्यात बसविण्यात आल्या आहेत. वर्षानुवर्ष, पिढीजात व पारंपारिक पद्धतीने श्रीदेवाच्या गाभाऱ्यामध्ये, गणपती देवता, नंदी देवता, चंडमुंड, गाभाऱ्याच्या उंबरठ्यावर, श्रीकालभैरव आदी ठिकाणी भाविक भक्त आपली दानाची रक्कम ठेवत असतात, व ते दान पुजारी गुरवमंडळी उचलतात ते दान श्री देवाच्या खात्यात जमा होत नाही. ती प्रथा-परंपरा पूर्वापार आहे तशीच कायम ठेवलेली आहे. त्यात कोणताही बदल केलेला नाही. त्या पूर्वापार चाललेल्या प्रथेला कोणताही धक्का लागू नये या उद्देशापोटी या दोन्ही दानपेट्या गाभाऱ्याच्या उंबरठ्याच्याही बाहेर मूकशाळेच्या भागात बसविल्यामुळे वास्तविक पहाता कोणत्याही तक्रारीचे/हरकतीचे कारण राहिलेले नाही. श्रीदेव अंजनेश्वरचा ट्रस्ट सन १९५२ साली धर्मादाय दप्तरी धार्मिक ट्रस्ट म्हणून नोंदलेला आहे. तसेच श्रीदेव अंजनेश्वरचा ट्रस्ट आयकर दप्तरीही नोंदण्यासाठीची प्रक्रिया चालू आहे. ट्रस्टला १००% आयकर माफी मिळण्यासाठी आयकर कायद्याखालील 12AB सर्टिफिकेट मिळणार आहे. असे झाल्यावर दानपेटीतून मिळणारे संपूर्ण उत्पन्न १००% आयकर माफीस पात्र होणार आहे. हा ट्रस्ट पूर्णत: धार्मिक स्वरूपाचा ट्रस्ट असल्यामुळे १००% आयकर माफी होणार आहे. तसेच दानपेटी मधून रु.२ लाख अथवा त्यावरील केवढीही रोख रक्कम भाविक भक्ताने अर्पण केली तरी कोणत्याही स्वरूपाची पेनल्टी, दंड ट्रस्टला होणार नाही अथवा दानशूर भक्तालाही होणार नाही. दानपेटी शिवाय अशी मोठ्या रक्कमेची 'रोखीची देणगी'(cash donations ) ट्रस्टला स्वीकारता येत नाही. यासाठी दानपेटी हाच सर्वोत्तम पर्याय आहे.. वास्तविक पाहता हा ट्रस्ट सन

१९५२ ला पब्लिक ट्रस्ट रजिस्टर मध्ये धार्मिक ट्रस्ट (Religious Trust) म्हणून नोंदला गेल्या नंतर लगेच तेव्हापासूनच दानपेटीची व्यवस्था करणे आवश्यक होते. दि.२० एप्रिल १९५३ मधील मे.धर्मादाय आयुक्त, मुंबई श्री.डि.आर.प्रधान यांनी काढलेले परिपत्रक क्रमांक ५२चा विचार करता देवाच्या पुढ्यातील दानाची(Offerings) नोंद देवस्थानच्या एकूण उत्पन्नात समाविष्ट होणे आवश्यक व बंधनकारक केले होते. (Donations received by a public trust and offering made to a deity are liable for contribution under the Bombay Public Trus tAct, 1950) तसेच दि.३१ मार्च १९५९ रोजीचे मे. धर्मादाय आयुक्त मुंबई श्री. सुमंत सी. भट यांनी काढलेल्या परिपत्रक क्रमांक १०९ मध्ये ट्रस्ट तपासणीच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक १९ व प्रश्न क्रमांक २० मध्ये दानपेटी बाबतच्या तपासणी बाबतच्या तपशिलाची नोंद केली आहे व त्याबाबत ट्रस्टींनी उत्तर देणे अपेक्षित आहे.थोडक्यात मंदीर तेथे देवता, देवता तेथे दान व दान तेथे दानपेटी अपेक्षित आहेच. जसे देणगीचे ऑडीट अकौंटिंग होते तसे दानाचेही ऑडीट अकौंटिंग झालेच पाहिजे, अशी सदरहू धर्मादाय परिपत्रकाला अपेक्षित आहे. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, इन्कम टॅक्स ॲक्टला सुद्धा देवा पुढील दानाचे ऑडीट अकौंटिंग झाले पाहिजे, अशी अपेक्षा आहे. दानाचे ऑडीट होण्यासाठी दानपेटी मध्ये दानसंचय होणे आवश्यक आहे. देवता जिथे असेल त्याच्या लगेच पुढ्यात, दर्शनी जागेवर (Prominent place/Conspicuous place) दानपेटी बसवली पाहिजे व दानपेटीबाबतचा बोर्ड ठळक जागी लावला पाहिजे, असा दंडक आहे. दानपेटी मधील दान पंचासमक्ष मोजले गेले पाहिजे, दानपेटीच्या स्वतंत्र किर्दीमध्ये दानपेटीतील दानाची नोंदणी झाली पाहिजे व मोजलेले, नोंदलेले दान त्याच दिवशी बँकेत भरले पाहिजे, हा दंडक महत्त्वाचा जेणेकरून देवासमोर दिलेल्या दानाचा सांभाळ नीटपणे व्हावा. देवदानामध्ये अफरातफर होऊ नये. ह्या दानावर संपूर्ण अधिकार देवतेचा रहावा. देवतेचा म्हणजे देवतेचा कारभार सांभाळणाऱ्या ट्रस्टचा अधिकार रहावा, असा कायद्याचा संकेत आहे. देणगीची रोख रक्कम दोन लाख किंवा त्या पेक्षा जास्त रोखीची रक्कम देताना Income Tax Act 1961 Section 269 ST नुसार अडचण येते व अशा रोख देणगी(Cash Donations) रकमेची देणगी पावती बनवली की१००% पेनल्टीस पात्र होते, दंड होतो... मात्र अशी रोख रक्कम धार्मिक ट्रस्टसाठी दानपेटीत अर्पण केली की कोणतेच झंजट रहात नाही. कोणतीही पेनल्टी लागत नाही. दानपेटीच्या दानाला असे कायद्याचे अभय प्राप्त झालेले आहे. असे दानपेटीतील विशुद्ध दान, निनावी दान प्यूअर धार्मिक ट्रस्ट (100% Religious Trust) साठी १००% करमाफीस पात्र आहे. ''दानपेटी का बसवत नाही ? दानपेटी बसवण्यात कोणती अडचण आहे? नित्य दान जमा होत नाही का ? मंदिर वर्षभर उघडे नसते का ?'', असे नानाविध प्रश्नांची सरबती ऑडीट अकौंटिंगच्या बाबतीत, धर्मादाय कार्यालयाकडे अनेक वर्ष चालू होती. गेल्या वर्षीच्या वार्षिक अहवालात पान क्रमांक ९ वर दानपेटी बाबत सर्व सामान्य कल्पना दिलेली होती...सन २०१६ च्या नोटाबंदी नंतर अनेक बाहेरगावच्या भाविकभक्तांकडून दानपेटीची विचारणा वेळोवेळी व्हायची. मे. सुप्रिम कोर्ट ऑफ इंडीया यांचे कोर्टाने १७ सप्टेंबर १९९७ मध्ये ओरीसा राज्यातील पुरीच्या श्रीजगन्नाथ मंदिराच्या बाबतीत एक न्यायनिवाडा केला आहे व तो दानपेटी बाबत कायदेशीर तत्व सांगणारा आहे... (" The installation of the Hundies (दानपेट्या) for collection of offerings did not violate the religious rights of the Sevaks of the Temple." ..." The offerings that are made to the deities are not the properties of the Sevaks.") मंदिर परिसर, देवतांची संख्या, भक्तांची वर्दावळ, अर्पणदानाचे प्रमाण याचा विचार करून मंदिर परिसरात किती दानपेट्या बसवायच्या हा अधिकार कार्यकारी ट्रस्टींना आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. तरी दानपेट्या बसविण्यापूर्वी या सर्व कायदेशीर बाबींचा नीटपणे विचार करण्यात आलेला आहे. दानपेटीचा उपयोग ' ड्रॉप बॉक्स'/ 'कलेक्शन बॉक्स' म्हणून सुद्धा होणार आहे. भाविक भक्ताने आपली देणगीची रक्कम पाकिट बंद करून त्यावर आपला पूर्ण नाव, पूर्ण पत्ता, फोन नंबर व देणगीची रक्कम अक्षरी/अंकी लिहून नोंद केली तर त्या भाविकभक्ताला देणगीची पावती, अंगारा, प्रसाद पोस्टाद्वारे यथावकाश पाठवणे शक्य होणार आहे. ही देणगी गुप्तदान Anonymous Donation न होता नावे देणगी म्हणून नोंदली जाईल...

- **'लिंगायत सेवा मानधन भत्त्याबाबत'...**

मित्रांनो. श्री देव अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टच्या खात्यातून आर्थिक वर्ष २०१९/२० मध्ये एकूण रक्कम रु. १,२०,००० व आर्थिक वर्ष २०२० /२१ मध्ये एकूण रक्कम रु.१,३५,००० लिंगायत सेवा मानधन म्हणून खर्ची पडलेली आहे... सदरचे मानधन संबंधित लिंगायत गुरवांच्या बँक खात्यात प्रत्येकी प्रति महिना रु.२,५०० या प्रमाणे ट्रान्स्फर झाले आहे व या बाबतचे ऑडीट अकाऊंटींग झालेले आहे... या सेवा मानधनाचा लाभ १) सदानंद तुकाराम लिंगायत, २) संतोष वामन लिंगायत ३) जगन्नाथ दत्तात्रय लिंगायत ४) सुधाकर कृष्णा लिंगायत ५) श्रीम.अश्विनी अनंत लिंगायत यांनी घेतला आहे. सेवा मानधन देण्यासाठीची पुरेशी आर्थिक तरतूद श्री देव अंजनेश्वरच्या 'मुदत ठेवीच्या संचित व्याजातून' केलेली आहे...

सन २०२१/२२ वर्षी चे सेवा मानधन पुजारी मंडळींना स्वीकारता यावे म्हणून शुक्रवार दि. १२.०३.२०२१ रोजी (महाशिवरात्री उत्सवाचे समाप्तीचे दिवशी) श्रीदेवाच्या बोर्डावर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. पब्लिक ट्रस्ट मध्ये सर्व काही पब्लिक असावे, प्रायव्हेट असे काही राहू नये म्हणूनचा तो प्रयत्न... सेवा मानधन स्वीकारण्यासाठी उत्सुक असलेल्या लिंगायत पुजारी माणसाने रु. १०० च्या बाँड पेपरवर आपले विहीत नमुन्यातील 'स्वयंघोषणापत्र' दि.३१ मार्च २०२१ पर्यंत द्यायचे होते... प्रत्येक महिना प्रत्येकाला रु. ३००० म्हणजे वर्षाला रु.३६००० श्रीदेवाच्या बँक खात्यातून ट्रान्स्फर होणार असल्यामुळे मानधन स्वीकारण्यासाठी 'स्वयंघोषणापत्र' सादर करणे आवश्यक व बंधनकारक केले होते. हे नित्य सेवा मानधन भत्ता स्वीकारताना काही ठराविक दैनंदिन कामकाज हातून घडावे, फुकट मानधन दिले जाते, असे होऊ नये म्हणून काही ठराविक नेमून दिलेल्या कामाची जबाबदारी त्या त्या मानधन स्वीकारणाऱ्यासाठी बंधनकारक केली आहे. उदा. फुलझाडांना पाणी घालणे, भक्त निवास सफाई आदी. यामागील हेतू शुद्ध व स्वच्छ आहे. प्रतिमहिना निश्चित रक्कम लिंगायत गुरवाच्या घरखर्चाला मिळावी, आजारपणासाठी पैशाची अडचण भासू नये... अशी मानधन व्यवस्था अन्य कोणत्याही मंदिर व्यवस्थापकांनी केल्याचे ऐकिवात नाही.. इतकेच काय या मानधनात वाढ करणे, त्यामध्ये पीपीएफ, अटल पेंशन योजना, अपघात विमा योजना आदीचीही तरतूद करण्याची इच्छा आहे.. परंतु हे सारे ज्यांच्या साठी करायचे त्यांचा पूर्ण विश्वास असणे आवश्यक आहे. यासाठी कमालीचा 'संयम' आणि 'श्रध्दा-सबूरी' बाळगण्याची आवश्यकता आहे. ट्रस्टचा पैसा खर्च करत असताना तो ऑडिट अकाऊंटींगचे सर्व मापदंड पाळून व वार्षिक जनरल सभेमध्ये सर्व सेवेकरी, मानकरी, खोतमंडळी आदींना सांगूनसवरून खर्च होणे अपेक्षित आहे, असे वाटते. 'पब्लिक ट्रस्ट मध्ये सर्व काही पब्लिक झाले पाहिजे', अशी ती धारणा आहे. दडवून लपवून कोणतीच गोष्ट करायची नाही, असा तो दंडक आहे... श्रीदेवावर नितांत श्रद्धा, श्रीदेवाच्या उद्धारात आपला उद्धार होईल हा विचार मनाशी पक्का ठेवून हे मानधन स्वीकारणे आवश्यक आहे. ट्रस्टबाबत कृतज्ञता, त्यामधील प्रत्यक्ष काजकाज करणाऱ्यांबद्दल आदराची भावना असेल तर आणि तरच हे सर्व काही शक्य आहे. लिंगायत सेवा मानधन भत्ता स्वीकारण्यासाठी 'स्वयंघोषणापत्र' बंधनकारक केले आहे व ते देण्यासाठीची मुदत दि.३१ मार्च २०२१ पर्यंत ठेवलेली होती जेणेकरून या मानधन स्वीकारण्यासाठीची आवश्यक पूर्तता करण्यासाठी सर्वांना पुरेसा अवधी मिळेल. अथवा या मानधन अदाईबाबत धर्मादाय खात्याकडे कुणाला काही तक्रार / हरकत करायची असेल तरीही त्यांना पुरेसा वेळ मिळू शकेल... आर्थिक व्यवहाराची बाब असल्यामुळे दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत तीन आठवड्यांचा कालावधी यासाठी पुरेसा व योग्य आहे... धाडसाने निर्णय घेत असताना त्यात कोणताही 'लूपहोल' राहू नये, हा त्यामागचा हेतू आहे. वर्षाला या सेवा मानधनासाठी मोठी रक्कम खर्च करताना भविष्यात रक्कम अदा करणारा सुद्धा अडचणीत येणार नाही, याचीही पूर्ण काळजी घेण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे व आवश्यक सुद्धा आहे. सेवा मानधन भत्ता स्वीकारणे अथवा नाकारणे ही बाब ऐच्छिक आहे... सेवा मानधन भत्ता स्वीकारलाच पाहिजे असे कुणावरही बंधन नाही... हे मानधन एक ठराविक सेवा केल्याबाबतचा 'भत्ता' आहे, 'तनखा' आहे, 'अलाऊंस' आहे... स्वातंत्र्यपूर्व काळापासून अंजनेश्वर देवस्थान मधील लिंगायत गुरवांना वर्षाला एकूण रु. २७/- सरकारी भत्ता (Service allowance) मिळायचा...

'देवाजवळ नंदादीप लावण्याच्या कामासाठी' म्हणून तो सरकारी भत्ता होता. हा सरकारी भत्ता राजापूरच्या मामलेदार कचेरीत जाऊन व्हावचरवर सही करून तत्कालीन लिंगायत गुरव स्वीकारत असत... नंदादीप लावण्यासाठी मिळणारा भत्ता मामलेदार कचेरीत जाऊन सही करून स्वीकारायला त्यावेळच्या लिंगायत गुरवांना कुठेही कमीपणा वाटला नाही, हे विशेष आहे... सरकारी भत्ता स्वीकारणे त्यावेळी त्यांना बहुमानाचे वाटायचे, सन्मानाचे वाटायचे. 'लिंगायत सनद' म्हणून ती सत्तावीस रुपयांची रक्कम स्वीकारली जायची... या रु.२७/- भत्याचा उल्लेख या देवस्थान ट्रस्टच्या इंस्ट्रुमेंट मध्ये केलेला आहे. अर्थात वार्षिक एकूण रु.२७ चा भत्ता सर्व लिंगायत गुरवांसाठी होता. थोडक्यात वरच्या लिंगायत गुरवांच्या सर्व कुटुंबांना एकूण रु. १३.५० व खालच्या लिंगायत गुरवांच्या कुटुंबांना एकूण रु. १३.५० इतकाच मिळायचा... पुन्हा त्यात गुरवखी नुसार हिस्से होऊन प्रत्येक कुटुंबाला वर्षाला दोन अडीच रुपये मिळायचे... असे असले तरी तो तुटपुंजा भत्ता अगदी आनंदाने आणि उत्साहाने स्वीकारला जायचा, हे विशेष आहे... स्तुत्य आहे... प्रशंसनीय आहे... अलीकडे हा सर्व्हिस भत्ता येथील लिंगायत गुरवांना मिळत नाही, कुणी त्यासाठी प्रयत्न केल्याचे ऐकिवात नाही. अनेक देवस्थान मधील लिंगायत गुरवांना अजूनही अशा स्वरूपाचा सरकारी भत्ता मिळत आहे, ही बाब विशेष उल्लेख करून सांगावीशी वाटते... सध्या देवस्थानकडून मिळणारे सेवा मानधन या पूर्वीच्या सरकारी भत्त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे... पूर्वी एका कुटुंबाला वर्षाला फक्त रु.दोन अडीच रुपयेच मिळायचे... आज देवस्थान कडून वर्षाला एका कुटुंबाला रु. ३६ हजार देण्यासाठीची तरतूद केली आहे... ही रक्कम निश्चितच कमी नाही, व त्या बदल्यात नेमून दिलेली कामे अगदी अल्प स्वल्प आहेत, खूप अंगमेहनतीची नाहीत. मित्रांनो... मुंगी बनून साखर खाणे कधीही हिताचे आहे... हे मूलभूत तत्व ज्याला समजते व उमजते तो व्यवहारीक विचार करतो... हक्कांसाठी लढणारे लढत रहातात, वर्षानुवर्षेनिघून जातात... वेळ निघून गेली की संधी सुद्धा निघून जाते.... अशी 'वेळ' पुन्हा पुन्हा येत नाही... 'संधी तर नाहीच नाही'... 'देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी' असे व्हायला नको असेल तर अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे... उपऱ्यांचे सल्ले कामाचे नाहीत...

- <u>राज्यस्तरीय मन्दिर व्यवस्थापन समितीची मिटिंग...</u> मंगळवार दिनांक ०३.११.२०२० रोजी राज्यस्तरीय गठीत झालेल्या 'मंदिर व्यवस्थापन समितीने' ऑनलाईन मिटिंगचे आयोजन केले होते... महत्त्वाच्या ट्रस्टमध्ये 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' ट्रस्टला कळविण्यात आले होते म्हणून त्यामध्ये उपस्थिती लावली होती...

संयोजक श्री. राजेंद्रकुमार सराफ यांनी त्याचे आयोजन केले होते 'कोविड', 'लॉकडाउन', 'अनलॉक-६', 'अनलॉक नंतरचे मंदिर व्यवस्थापन', त्याबाबतचे 'SOP' मंदिर बंदी उठल्यानंतर कोण-कोणत्या नियमनियमावलींचे पालन केले पाहिजे. भाविक भक्तांना कोणते नियम असले पाहिजेत.... मंदिरातील पुजारी लोकांसाठी कोणते नियम बंधनकारक असतील याची समग्र चर्चा झाली... मंदिराच्या ट्रस्टींनी काय काय खबरदारीचे उपाय केले पाहिजेत आदीची चर्चा झाली... मंदिर परिसर, त्यानुसार भाविक संख्या, परिसर व भाविक भक्तांची संख्या याचे प्रपोर्शन आदीची चर्चा झाली... या चर्चेत ह.भ.प.श्री.शिवाजीराव मोरे तथा मोरे महाराज,..... पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचे विश्वस्त, सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिराचे विश्वस्त, लक्ष्मीनरसिंह मंदिराचे विश्वस्त श्री. डॉ. प्रशांत सुरू, अष्टविनायक मंदिरापैकी मोरगाव, सिद्धटेक, थेवूरचे विश्वस्त श्री. विश्राम देव, जैन मंदिराचे विश्वस्त श्री. वैभव बोकलीवाल, रेनावीचे विश्वस्त व ग्रामीण देवस्थान मंदिराचे प्रतिनिधी श्री.बालाजी गुरव, स्वरूपानंद पावसचे श्री. जयंत देसाई यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये पुण्याचे धर्मादाय आयुक्त मे. राहूल चव्हाण साहेब यांनी विशेष मार्गदर्शन केले होते. ही ऑनलाईन मिटिंग दुपारी तीन ते सव्वा पाच पर्यंत चालली. मिटिंगमध्ये मंदिर व्यवस्थापनासाठी छापलेल्या पुस्तिकेची माहीती सर्वांना देण्यात आली... त्यातील जवळपास सर्व मान्यवरांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले ... शासन 'मंदिर-बंदी' उठवण्यासाठी प्रयत्नशील आहे, असेही मे. धर्मादाय आयुक्त पुणे यांचे वतीने सांगण्यात आले... राज्य स्तरीय मंदिर समितीच्या मिटिंगमध्ये भाग घेण्याचा व आपले विचार मांडण्याचा अनुभव मिळाला..

- **गेल्या १४/१५ वर्षातील अंजनेश्वर दरबारीची कीर्तन सेवा...**

मित्रांनो... तेरा वर्षातील सर्व काही तुम्हाला सांगायचे असे ठरवलेच आहे... गेल्या तेरा वर्षांमध्ये कोण कोण किर्तनकार येऊन गेले, हे स्मृती पटलावर रहावे म्हणून हा केलेला 'लेखनप्रपंच'. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।' ही ती 'नवविधा भक्ती'...कीर्तन ही नवविधा भक्तीतील 'दुसरी' म्हणून महत्त्वाची... म्हणून अंजनेश्वर दरबारी झालेली सर्व कीर्तनकारांची कीर्तन भक्ती शब्दबद्ध करून ठेवायची म्हणूनचे 'संदर्भाचे लिखाण'... सन २००८ ते सन २०२० पर्यंतची 'नामसंकीर्तन सेवा' मित्रांनो...सन २००८ मधील महाशिवरात्री उत्सव आम्ही सर्वांनी अगदी आयत्यावेळी, कोणतेही पूर्वनियोजन नसताना पार पाडला होता म्हणून जरा 'जास्त स्मरणात'... 'त्या उत्सवामध्ये आमचे मित्रबंधु, राजापूरचे श्री. दिलीप गोखले यांनी कीर्तन केले होते ते पक्के स्मृतीपटलावर कोरलेच आहे. म्हणून सांगायचे... उत्सवाला फक्त दोन दिवस असताना केवळ फोनवरचे निमंत्रण स्वीकारून दिलीपजी कीर्तनाला आले होते म्हणून 'जास्त स्मरणात' राहिले. नारदी पगडी न घालता संघाची टोपी घालून त्यांचे ते 'कीर्तन' झाले होते म्हणून 'स्मरणात'... श्री. दिलीप गोखले यांचेमुळे कीर्तन सेवा खंडित झाली नाही म्हणून त्यांची सदैव ओळख, सदैव स्मरणात... अंजनेश्वर मंदिरातील अखंडीत कीर्तनसेवा केवळ आणि केवळ श्री. दिलीपजी गोखले यांनी खंडीत होऊ दिली नाही म्हणून कायमची 'आठवण'...

**सन २००८** - श्री. दिलीप गोखले

**सन २००८** च्या कार्तिकोत्सवामध्ये ह.भ.प.सौ. युगंधरा प्रकाश विरकर, मुंबई यांनी कीर्तने केली होती.

**सन २००९** च्या महाशिवरात्रीला श्री.ह.भ.प.सूर्यकांत जोग, गोवा यांची कीर्तने होती... त्याला ऑर्गनसाथ प्रसाद काटधरे, चिपळूण व तबला साथ उन्मेष जाधव, चिपळूण यांनी केली...

**सन २००९** च्या कार्तिकोत्सवामध्ये ह.भ.प. श्री. महेशबुवा काणे, चिपळूण यांची कीर्तने होती, त्याला ऑर्गन साथ प्रसाद काटधरे, चिपळूण व तबला साथ उन्मेष जाधव चिपळूण यांची होती...

**सन २०१०** च्या महाशिवरात्रीला ह.भ.प. सौ. डबीर, नागपूर, यांची कीर्तने होती त्याला ऑर्गन साथ श्री. प्रसाद काटधरे यांची होती..

**सन २०१०** च्या कार्तिकी उत्सवासाठी ह.भ.प. श्री. मंदारबुवा जोशी यांची कीर्तने होती. त्याला ऑर्गन साथ प्रसाद काटधरे व तबला साथ श्री. नाखरे यांची होती...

**सन २०११** च्या महाशिवरात्रीला ह.भ.प.श्री. पुरुषोत्तम दत्तात्रय तथा बंडू पोखरणकर, सिंधुदुर्ग यांची कीर्तन होती. त्यांना ऑर्गन साथ उदय भालचंद्र करंबेळकर व तबला साथ श्रीपाद दामोदर भागवत यांची होती...

**सन २०११** मधील कार्तिकोत्सवामध्ये ह.भ.प.श्री.विश्वासराव कुळकर्णी पुणे यांची कीर्तने होती... त्याला ऑर्गन साथ श्री. प्रसाद काटधरे, चिपळूण व तबला साथ श्री. आनंद ओळकर, कशेळी यांची होती...

**सन २०१२** च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये ह.भ.प. श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय तथा बंडू पोखरणकर कुडाळ सिंधुदुर्ग यांची कीर्तने होती, त्यांना ऑर्गन साथ प्रसाद काटधरे, चिपळूण व आनंद ओळकर, कशेळी यांची होती...

**सन २०१२** च्या कार्तिकी उत्सवामध्ये ह.भ.प. श्री. श्रीपादबुवा अभ्यंकर, पुणे यांची कीर्तने होती, त्यांना ऑर्गन साथ पद्मनाभ जोशी, बदलापूर व तबला साथ प्रथमेश शहाणे, रत्नागिरी यांची होती...

**सन २०१३** च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये ह.भ.प. श्री. भरतबुवा खोंड, नागपूर याची कीर्तने होती त्याला ऑर्गन साथ प्रसाद काटधरे, चिपळूण व तबला साथ आनंद ओळकर, कशेळी यांची होती...

**सन २०१३** च्या कार्तिकी उत्सवामध्ये ह.भ.प. श्री. मकरंदबुवा देवरस, नागपूर यांची कीर्तने होती त्याला ऑर्गन साथ प्रसाद काटधरे व तबला साथ आनंद ओळकर यांची होती...

**सन २०१४ च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये** ह.भ.प. श्री. गंगाधर बुवा व्यास, डोंबिवली यांची कीर्तने होती. त्याला ऑर्गन साथ विजय पाटकर, मुंबई व तबला साथ भूपाल अडसूळ, डोंबिवली यांची होती...

**सन २०१४ च्या कार्तिकी उत्सवामध्ये** ह.भ.प. श्री. श्रीधरबुवा खोंड, नागपूर यांची कीर्तने होती... त्याला ऑर्गन साथ प्रसाद काटधरे व तबला साथ उत्तम करंबेळकर राजापूर यांनी दिली होती...

**सन २०१५ च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये** ह.भ.प. श्री.मकरंदबुवा व्यास डोंबिवली यांची कीर्तने होती... त्याला ऑर्गन साथ श्री. विजय पाटकर, मुंबई व तबला साथ भूपाल अडसूळ डोंबिवली यांनी दिली होती...

**सन २०१५ च्या कार्तिक उत्सवासाठी** ह.भ.प.श्री.उध्दवबुवा जावडेकर, पुणे यांची कीर्तने होती त्यांना ऑर्गन साथ प्रसाद काटधरे, चिपळूण व उत्तम करंबेळकर रत्नागिरी यांनी दिली होती...

**सन २०१६ च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये** ह.भ.प.श्री. संदीपबुवा केळकर, रेवदंडा अलिबाग यांची कीर्तने होती... त्याला ऑर्गन साथ श्री विजय पाटकर व तबला साथ भूपाल अडसूळ डोंबिवली यांनी दिली.

**सन २०१६ चा कार्तिकी उत्सवामध्ये** श्री. चारूदत्त आफळे, पुणे यांची कीर्तने होती त्यानी साथीदारांसह कीर्तन सेवा केली होती...

**सन २०१७ च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये** ह.भ.प.श्री.हरिहर नातू, कुडाळ सिंधुदुर्ग यांची कीर्तने होती...त्यांनी स्वत:चे साथीदार आणले होते...

**सन २०१७ च्या कार्तिकी उत्सवामध्ये** ह.भ.प.श्री.अनंत केशव कर्वे, पनवेल यांची कीर्तने होती त्यांना ऑर्गन साथ केदार भागवत, मुंबई व तबला साथ गणेश घाणेकर, पनवेल यांनी दिली...

**सन २०१८ च्या महाशिवरात्रीला** ह.भ.प. श्री. वासुदेवबुवा बुरसे, पुणे यांची कीर्तने होती... त्याला ऑर्गन साथ उदय गोखले, नाणार व तबला साथ आनंद ओळकर, कशेळी यांनी दिली...

**सन २०१८ च्या कार्तिकी उत्सवामध्ये** ह.भ.प.श्री.दत्तात्रय श्रीकृष्ण रानडे राजापूर यांची कीर्तने होती.. त्यांना ऑर्गन साथ तबला साथ लेले बंधू कोंड्ये – राजापूर यांनी दिली...

**सन २०१९ च्या महाशिवरात्री उत्सवामध्ये** ह.भ.प.श्री. श्रेयस बडवे, पुणे यांची होती... त्यांना ऑर्गन साथ उदय गोखले, नाणार व तबला साथ आनंद ओळकर, कशेळी यांनी दिली...

**सन २०१९ कार्तिक उत्सवामध्ये** ह.भ.प.श्री. श्रीधरबुवा खोंड, नागपूर यांची कीर्तने होती... त्यांना ऑर्गन साथ उदय गोखले, नाणार व तबला साथ भालचंद्र बाळ, दापोली यांनी दिली...

**सन २०२० महाशिवरात्री उत्सवामध्ये** ह.भ.प.सौ.वेदश्री ओक, डोंबिवली यांची कीर्तने होती त्यांना ऑर्गन साथ उदय गोखले नाणार व तबला साथ आनंद ओळकर कशेळी यांनी दिली...

**सन २०२० च्या कार्तिकी उत्सवासाठी** ह.भ.प.श्री. श्रेयस बडवे, पुणे यांना निमंत्रित केले आहे तर ऑर्गन साथीला उदय गोखले नाणार व तबला साथीला श्री. अमेय हर्डीकर, राजापूर यांना निमंत्रित केले आहे...

**सन २०२१ च्या महाशिवरात्री उत्सवाला** ह.भ.प.सौ.स्नेहल पित्रे, डोंबिवली होत्या. या कीर्तनाला ऑर्गन साथ श्री.उदय गोखले बुवांनी केली तर तबला साथ श्री.आनंद ओळकर यांनी केली.

मित्रांनो, गेल्या चौदा वर्षांमधील 'कीर्तन सेवा'... चौदा वर्षातले रेकॉर्ड अंजनेश्वर मंदिरात नीटपणे जतन करून ठेवले आहे म्हणून हे शक्य झाले, आणि म्हणून तो कीर्तनसेवेबाबतचा तपशील तुमच्या पर्यंत पोहोचवता आला..

- <u>गेल्या १४ वर्षातील घेतलेल्या 'जनरल मिटिंग'...</u>

मित्रांनो. अंजनेश्वर ट्रस्टमध्ये मिटिंग घेण्याची प्रोव्हीजन ठेवलेली नाही, हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे मिटिंग घेणे, प्रोसिडिंग लिहिणे, कोरम ने ठराव मंजूर करणे आदी गोष्टी या ट्रस्टच्या इंस्ट्रुमेंट मध्ये नोंदलेल्याच नाहीत... 'देसाई कुटुंबातील विश्वस्तांनी जनरल अफेअर्सचे कामकाज साभाळावे'...'Family of Desais look to the General Affairs of Temple' इतकाच उल्लेख ट्रस्ट इन्स्ट्रुमेंट मध्ये आहे... परंतु देवस्थानचा कारभार सर्व सामावेशक व सर्वस्पर्शी व्हावा हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन अगदी प्रत्येक उत्सवापूर्वी जनरल मिटिंग घेण्याचे धोरण मी सन २००८ पासूनच ठेवले आहे... यापूर्वी अश्या जनरल मिटिंग बोलवण्याची कुणालाच सवय नव्हती... अश्या प्रोसिडिंगच्या जनरल मिटिंग ना कुणी बोलावल्या होत्या ना कुणी आले होते.... जनरल मिटिंग बोलविण्याची पद्धत सन २००८ पासूनची... आणि म्हणूनच ही विशेष बाब आपल्यालाही शेअर करीत आहे....तेव्हा पासून कार्तिकोत्सवापूर्वी एक जनरल मिटिंग व महाशिवरात्री उत्सवापूर्वी दुसरी जनरल मिटिंग घेण्याची पद्धत चालू झाली... सर्व विश्वस्त, खोत मंडळी, मानकरी, सेवेकरी, यांना मिटिंगची नोटीस फिरवली जाते... खोतांना लिंगायतांमार्फत, काही खोत मंडळींना पोस्टाने मिटिंगची नोटीस पाठवली जाते... गावांतील मानकरी सेवेकरी व विश्वस्तांना नरेश प्रिंदवणकर नोटीस बजावणीचे कामकाज करतात. उत्सवाचे नियोजन, आर्थिक आढावा, नवीन उपक्रम आदीची सविस्तर चर्चा होते...मिटिंगच्या प्रोसीडींगवर उपस्थितांच्या सह्या होतात... प्रोसिडिंग तपशीलवार लिहिले जाते... प्रत्येक मिटिंग नंतर उपस्थित मंडळींना चहा दिला जातो. मित्रांनो सन २००८ ते फेब्रुवारी २०२० पर्यंतच्या जनरल मिटिंगच्या तारखा इथे तपशीलवार देत आहे...

३ मार्च २००८ रोजी महाशिवरात्री उत्सवासाठी तातडीची जनरल मिटिंग घेण्यात आली होती. तो महाशिवरात्रीचा उत्सव ५ मार्च ते ७ मार्च २००८ असा होता... नोटीस बजावणी न करता ही मिटिंग झालेली होती... महाशिवरात्रीचा उत्सव कोणत्याही परिस्थितीत बंद पडू नये म्हणून मी स्वत: पुढाकाराने बोलवलेली 'ती जनरल मिटिंग'...

तर ३ नोव्हेंबर २००८ रोजी कार्तिक उत्सवासाठीची जनरल मिटिंग बोलविली होती... त्यावेळचा कार्तिकोत्सव ८ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २००८ असा होता. या उत्सवाला निमंत्रण पत्रिका सुद्धा छापलेली नव्हती...देणगीची पावती पुस्तके ताब्यात नव्हती. आलेल्या मनीऑर्डर स्वीकारल्या. लोकांनी दिलेल्या देणग्या एका वहीत नोंद करून स्वीकारल्या. झालेली सर्व जमा रक्कम श्री देव अंजनेश्वरच्या बँकखात्याला भरणा केली होती... उत्सवांसाठी झालेला खर्च हिशोब यथावकाश मला मिळाला होता... धर्मादाय कोर्टात अंजनेश्वर प्रकरण गेलेले होते... नंदीदेवते जवळ लोखंडी ग्रील बसवण्यात आले होते व त्या एकमेव कारणावरून सन २००७ मध्ये प्रकरण धर्मादाय कोर्टात गेलेले होते. न्यायप्रविष्ट होते... कोणत्याही परिस्थितीत उत्सवाचे कामकाज बंद पडू द्यायचे नाही, असे मी मनाशी पक्के ठरवले होते... ट्रस्टीपणाचा कोणतेही अधिकार नसताना केवळ 'धिटाई व पुढाकाराने'... हे दोन्ही उत्सव सर्व सेवेकरी, मानकरी, खोत मंडळी व सर्व देणगीदार यांच्या उदंड सहकार्यामुळे ते शक्य झाले, म्हणूनचे हे 'स्मरण'... सर्वांनी त्यावेळी दाखविलेला विश्वास व दिलेली दमदार साथ मी कधीही विसरणार नाही. त्यानंतर.१६ ०२.२००९ रोजी महाशिवरात्री उत्सव नियोजन मिटिंग तर १९.१०.२००९ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...०१.०२.२०१० रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर ०८.११.२०१० रोजी कार्तिकोत्सव मिटिंग... २१.०२.२०११ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर३१.१०.२०११ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...१३.०२.२०१२ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर १९.११.२०१२ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...०४.०३.२०१३ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर ०४.११.२०१३ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...२३.०२.२०१४ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर २०.१०.२०१४. रोजी कार्तिकोत्सव मिटिंग.

(***३०.०१.२०१५ स्पेशल विश्वस्त मिटिंग... अणुऊर्जा प्रकल्प जमीन मोबदल्याबाबत)

१३.०२.२०१५ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग (****२८.०३.२०१५ रोजी स्पेशल जनरल मिटिंग.अणुऊर्जा प्रकल्प जमीन मोबदल्याबाबत)

०९.११.२०१५ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...२९.०२.२०१६ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर २४.१०.२०१६ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...१३.०२.२०१७ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर २३.१०.२०१७ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...०५ ०२.२०१८ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर १२.११.२०१८ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग ०४.०२.२०१९ रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग तर २८.१०.२०१९ रोजी कार्तिकोत्सव मिटिंग...१७.०२.२०२० रोजी महाशिवरात्री उत्सव मिटिंग अशा पद्धतीने प्रतिवर्षी दोन जनरल मिटिंग घेऊन सर्व अंजनेश्वरचा कारभार चालवलेला आहे... मित्रांनो. अहवालामध्येही ह्या जनरल मिटिंगचा तपशील सामान्यपणे आलेला आहे... या सर्व जनरल मिटिंग 'सोमवारीच' झालेल्या आहेत... सर्व मिटिंग 'संध्याकाळी ७.०० वाजताच' ठेवलेल्या आहेत(स्पेशल मिटिंगचा अपवाद वगळता...) हेतू हा की सर्व सेवेकरी मानकरी, खोत मंडळी व विश्वस्त लोकांना मिटिंगला उपस्थित रहाणे सोपे व्हावे... अकारण दिवसांमधील कामाचा वेळ फुकट जाऊ नये. म्हणून संध्याकाळी मिटिंगचे प्रयोजन. मिटिंग सामान्य पणे 'एक तासाचीच'... मित्रहो... या जनरल मिटिंगमध्ये सामान्यपणे ४५/४६ ची अॅव्हरेज उपस्थिती असते. वाजंत्री चौकशी, त्यामधील फुटतूट, बत्त्या दुरुस्ती, ध्वनी व्यवस्था, प्रकाश व्यवस्था नियोजन, समाराधनेचे महाप्रसादाचे नियोजन, यज्ञसमारंभाचे नियोजन, भजनांचे नियोजन, उत्सवातील चहापानाचे नियोजन आदी जवळपास २५/३० अनेकविध कामकाजाचे नियोजन होते. जे मिटिंगमध्ये उपस्थित असतात त्यांना सर्व काही समजावून सांगितले जाते जे बोलावणे करूनही मिटिंगमध्ये येत नाहीत, त्यांना आपण काय सांगणार? असो... मित्रांनो...आज तुम्हाला या सर्व जनरल मिटींग बाबत माहिती दिली आहे. तुमच्याही दप्तरी 'या मिटिंग' पोहोचत्या करण्याचा हा माझा प्रयत्न आहे... सांगितले नाही तर तुम्हाला कळणार कसे. म्हणून हे विस्ताराने सांगणे... गेल्या तेरा वर्षांच्या कालावधीतले सर्व सर्व तुम्हाला सांगून ठेवायचे ... हे माझे सांगणे फुकट नक्कीच जाणार नाही... मित्रांनो...समर्थांचा दासबोध माझेसाठी आदर्श आहे... मिटिंगमध्ये कामकाज चालवताना त्यातील 'गाईडलाईन' अनुसरून निर्णय झाले की ते 'सावधपण' तयार होते. मिटिंग घेऊन प्रोसिडिंग लिहिले की 'संदर्भ' तयार होतात...

कधीकाळी हे 'कागदी संदर्भ' खूप उपयोगी ठरतात. कामकाज मनमानी पद्धतीने, मनमर्जीने होऊ नये हा त्यामागील हेतू. सर्वांना सांगून कामकाज करायचे. सर्वांची मते जाणून घेतली की निर्णय घेताना अडचण येत नाही...

मिटिंगमुळे अभ्यास होतो... अनेकांच्या सूचना कळतात... मिटिंगमुळे नकळत आपल्या कामकाजाचे 'सोशल ऑडिट' होऊन जाते... असे झाले की मग पाठीमागून बोलण्याला फारशी किंमत रहात नाही... 'मिटिंग म्हणजे सावधपण'... समर्थ सांगतात ते अगदी बरोबर आहे...

थोरपणें चुकों नये। न्याये नीति सांडूं नये। अप्रमाण वर्तों नये। कांहीं केल्या ॥

कळल्यावीण बोलों नये। अनुमानें निश्चये करूं नये। सांगतां दुःख धरूं नये। मूर्खपणें ॥

सावधपण सोडुं नये। व्यापकपण सांडुं नये। कदा सुख मानूं नये। निसुगपणाचें ॥

यातले 'सावधपण सोडुं नये' हे सर्वात महत्त्वाचे... सर्व जनरल मिटिंगच्या बजावणी नोटीसा व मिटिंगची प्रोसिडिंग सुरक्षित ठेवलेली आहेत... कधीकाळी या नक्की उपयोगी ठरतील...'सावध तो सुखी' म्हणून हे सर्व जपून ठेवले पाहिजे....व जे जपून ठेवले आहे ते तुम्हा सर्वांना सांगून ठेवले आहे....कधीकाळी या लिखाणाचाही उपयोग होईल.... केलेले 'लिखाण' फुकट नक्कीच जाणार नाही...

- **'लेखन दोष दुरुस्ती'...**

लेखन दोष दुरुस्ती, सातबारा मधील श्री देव अंजनेश्वर वहिवाटीच्या जमिनींमधील 'लेखन दोष दुरुस्ती'... शासन स्तरावरून झालेली कार्यवाही... मे. मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार झालेली कारवाई... सन २०१० च्या शासन निर्णयानुसार झालेली कारवाई... अशी कारवाई अनेक देवस्थान जमिनींमध्ये चालू आहे... शासनाचा हेतू स्पष्ट की देवस्थानच्या जमिनींवर देवस्थानचे 'मालकी हक्क' अबाधित रहावेत... देवस्थान जमिनींमधील वहिवाटदारांचे 'वहिवाटीचे हक्क' अबाधित रहावेत... देवस्थान मालकीच्या सर्व जमिनींच्या नोंदी देवस्थान इनाम वर्ग रजिस्टरला नोंदल्या जाव्यात... देवस्थान जमिनींमध्ये अतिक्रमण होऊ नये, देवस्थान जमिनींची विक्री अथवा हस्तांतरण शासनाच्या पूर्वपरवानगीने व्हावे, आपत्कालीन परिस्थितीत देवस्थान जमिनीची विक्री झाल्यास किंवा हस्तांतरण अथवा शासकीय संपादन अपरिहार्य झाल्यास त्यामधून येणारी 'संपूर्ण विक्री रक्कम' त्या देवतेला मिळावी, देवतेचा कारभार चालविणाऱ्या ट्रस्टला मिळावी, हा त्यामधील शासन दृष्टिकोन आहे. देवस्थान इनाम जमिनीबाबतचा दृष्टिकोन पूर्वीच्या 'इनाम जमीन कायद्याला' सुद्धा असाच अपेक्षित आहे.

जमिनींची वहिवाट करून, मशागत करून वहिवाटदारांनी त्यामधील शेती उत्पन्न मिळवावे, आपला चरितार्थ चालवावा व त्या बदल्यात देवतेची पूजा, झाडलोट, नैवेद्य आदी चाकरी करावी... काही ठिकाणी देवाची जमीन वहिवाटीखाली ठेवून वार्षिक खंड देण्याची व्यवस्था केलेली दिसून येते... उद्देश स्पष्ट की देवाच्या जमिनीतून मिळालेल्या उत्पन्नातील हिस्सा वहिवाटदार आसामींनी देवाच्या उत्सव कार्यासाठी, वार्षिक खर्चासाठी उपलब्ध करून द्यावा... वार्षिक खंडाची व्यवस्था असते तिथे पूजा, झाडलोट, नैवेद्य ही बंधने त्या वहिवाटदार आसामींवर ठेवलेली नसतात.. जमीन सांभाळून मशागत करावी व मशागतीतून मिळालेल्या एकूण उत्पन्नाच्या काही हिस्सा देवतेच्या उत्सवाचे वेळी नियमितपणे देत जावा, देवतेच्या वार्षिक खर्चासाठी ते जमिनीतील उत्पन्न, त्यातील काही उत्पन्नाचा भाग मिळावा, हा हेतू आहे... देवस्थानच्या वार्षिक कार्यासाठी मदतगार व्हावा, हा हेतू आहे. देवस्थान इनाम जमिनीबाबत सर्व ठिकाणी अशीच ठेवण करून ठेवलेली आहे. देवतेचे नाव असल्यामुळे अशा जमिनी राजरोस विकता येत नाहीत... अगदी विकल्या गेल्या तरी त्या जमिनीच्या विक्री व्यवसायातून मिळालेली 'संपूर्ण रक्कम त्या देवतेलाच' मिळावी हा या इनाम जमीन कायद्याचा सर्व सामान्य हेतू आहे. लेखन दोष दुरुस्ती करण्याचा हेतू हाच की या जमिनींवर 'कुणीही मस्ती' करू नये... 'मालकी हक्क' सांगू नये... जमीन म्हणजे त्यामधील माती, दगड, रानटी झाडे, पाणवठे, ओढे, ओहोळ आदी सर्व काही...'मालकी देवतेची'... देवतेबाबत ट्रस्ट नोंदणी झालेली असेल तर पर्यायाने त्या ट्रस्टची मालकी प्रस्थापित होते... ट्रस्टची मालकी म्हणजे ट्रस्टींना मालकी हक्क मिळतात असा चुकीचा अर्थही कुणी काढू नये. ट्रस्टी सुद्धा मालक नाहीत. धर्मादाय आयुक्त कार्यालयाला सुद्धा मालकी अधिकार नाहीत. गुंतागुंत अश्यासाठी केलेली आहे की या देवस्थान जमिनी वहिवाटदारांकडे वहिवाटीसाठी वंशपरंपरागत रहाव्यात. देवाचा दैनंदिन कारभार नीटपणे चालावा. जमीन ही देवाचा कारोबार चालवण्याची हमी आहे. जोपर्यंत जमिनीचा मालक देव अथवा ट्रस्ट आहे तो पर्यंत देवाचा दैनंदिन कारभार अखंडितपणे सुरू रहाणार. कधीच खंड पडू नये म्हणून केलेली व्यवस्था. 'कायदेशीर जुगाड' म्हटले पाहिजे. अश्या जमिनीवर कर्जबोजे करणे, बँकबोजे करणे, बक्षीसपत्र करणे, आणेवारी करणे, मृत्युपत्र करणे, परस्पर उत्तराधिकारी नेमणे, नामसाधर्म्याने वहिवाटदार म्हणून नेमणे योग्य ठरत नाही, कायदेशीर चौकटीत बसवता येत नाही. जगन्नाथ कुसाजी सावंत वि महाराष्ट्र शासन या प्रकरणात मे.मुंबई हायकोर्टाने आदेश पारित करून दि.३० जुलै २०१०चा शासन निर्णय व त्यामधील दि.२९ जून २०११ चे शुद्धिपत्रक याची अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व महसुली अधिकारी यंत्रणेला दिलेले आहेत...२० जानेवारी २०२० चा मे. हायकोर्ट मुंबई यांचा अंतिम आदेश मुख्य न्यायमूर्ती श्री. प्रदिप नांद्रजोग व न्यायमूर्ती श्री. भारती डांग्रे यांच्या जॉईंट बेंचने केलेला आहे. वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे ते आदेश आहेत...ते 'अंतिम व निर्णायक आदेश' आहेत... श्री देव अंजनेश्वर देवस्थानचे बाबतीत असे लेखन दोष दुरुस्तीचे आदेश दि.२४.०८.२०२० रोजी

मे.तहसीलदार राजापूर यांनी एक आदेश पारित करून केले आहेत... हे आदेश दवंडीची नोटीस, सुनावणी तारखा ठेवून, लेखी म्हणणे मांडण्याची संधी देऊन केले आहेत... हेतू स्पष्ट की देवाच्या मालकीच्या जमिनी शाबूत रहाव्यात तसेच वहिवाटदारांचे वहिवाटीचे अधिकार कायम रहावेत..

सुमारे ३२७ सर्व्हेनंबर च्या अंजनेश्वर जमिनींवर या आदेशाचा अंमल झाला आहे. थेटपणे झालेला आहे.

खाते क्रमांक २१५६ श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या नावाने तलाठी दप्तरात नोंदला गेला आहे....थोडक्यात ८-अचा उतारा श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे अशा नावाने महसूल दप्तरी नव्याने तयार झाला आहे. तालुक्यातील सर्वात मोठा आठ अ उतारा... 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' नावाचा आहे... कदाचित हा संपूर्ण जिल्ह्यातील सुद्धा सर्वात मोठा आठ अ उतारा असावा, असे अधिकारी लोकांचे म्हणणे आहे... तलाठी दप्तरामधील वर्ग तीन रजिस्टर मध्ये देवस्थान इनाम जमिनीचे रजिस्टर मध्ये या सर्व सातबारा जमिनींच्या नोंदी झाल्या आहेत. दि.६ सप्टेंबर २०२१ रोजी स्टेट ऑफ मध्यप्रदेश वि पूजारी उथ्थान आवाम कल्याण समिति या केसच्या न्यायनिवाड्यात मे. सुप्रीम कोर्टाने जमीन मालमत्तेबाबत स्पष्ट शब्दांत आदेश केले आहेत. देवस्थान जमिनीवर मालकी फक्त आणि फक्त देवतेची आहे. देवताच जमिनीची मालक आहे. देवतेचा मालकी हक्क कुणी हिरावून घेण्याचा प्रयत्न केला तर 'बाहेरचा रस्ता' हे देशातील सर्वोच्च न्याय संस्थेचे म्हणणे आहे... त्यामुळे श्री देव अंजनेश्वर जमीन जागेबाबत झालेले लेखन दोष दुरुस्ती कायम झाली आहे. घट्ट झाली आहे. मित्रहो... चुकीचा समज करून घेणे, चुकीचा समज पसरवणे, चुकीच्या समजांना खतमाती घालणे, असंतोष तयार करणे, असंतोष जिवंत ठेवणे आदी कामे हिताची नाहीत. ना देवस्थान हिताची ना वहिवाटदार हिताची. वृथा गैरसमज करून घेणे चुकीचे आहे. येथे कुणाची मर्जी खुशी सांभाळण्याचा प्रश्न येत नाही. तसा प्रयत्न कुणीही करू नये... शासनाच्या प्रतिनिधी कडून जेव्हा अशी दुरुस्ती होते तेव्हा ती धोरण निश्चित करून, कायद्याचा संदर्भ घेऊन, वरिष्ठ न्यायालयाचे आदेश लक्षात घेऊन, शासन निर्णय पडताळणी करून झालेली असते. असंतोषाचे घासलेट कितीही जरी ओतले की क्षणिक गैरसमज पसरवणे शक्य होते, कदाचित त्यामधून अश्यांना असुरी आनंद मिळतो परंतु ते सर्व क्षणिक ठरते. उपयोग होत नाही. मित्रानो... सांगितले नाही तर समजणार नाही... नीटपणे समजले नाही तर कळणार नाही... सत्य तुमचे पर्यंत पोहोचले पाहिजे... गैरसमज असतील तर दूर झाले पाहिजे. माझे काम इतक्याच मर्यादे पर्यंत. निंदकाला निंदा करायला मोकळीक कायमची असते. असंतोषाचे घासलेट स्वस्तातले. सहज उपलब्ध व जळतेही चांगले. तेथे आगपेटीच्या काडीचीही गरज लागत नाही. ते 'असंतोषाचे घासलेट' आपोआप पेटते. त्यात आनंद घेणारे काठावर बसून आसुरी आनंद घेत बसतात. शुक्रवार दि.२३ जुलै २०२१ गुरुपौर्णिमेच्या दिवशी मिठगवाणे गावचे तलाठी श्री. युवराज कुंडलिक पोवार यांनी ३२७ सातबारा उतारे, देवस्थान इनाम जमीन रजिस्टर वर्ग ३ मधील सर्व जमिनी नोंदणी केल्याचा उतारा, ८अ उतारा व झालेल्या सर्व फेरफारांचे उतारे शिक्का सही करून फाईलींग करून मंदिरात आणून दिले.. त्यांच्या कामाबद्दल त्यांचा भेट वस्तू देऊन छोटासा सत्कार केला आहे...

- <u>अद्ययावत दप्तर सुरक्षा...</u> चालू वर्षी दप्तर तपासणी असल्याने सन २००७ ते २०२१ पर्यंतचे ऑडीट रिपोर्ट, कीर्दखतावण्या, बँक पासबुके, व्हावचर फाइल्स, देणगी पावत्या, मुदत ठेव पावत्या, जनरल सभांची प्रोसिडिंग बुक्स आदी सर्व दप्तर देवस्थानच्या धर्मशाळेच्या खोलीत कपाटबंद ठेवून सुरक्षित ठेवलेले आहे. धर्मादाय विभागाकडून दप्तर तपासणी झाल्यास कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून सदरचे दप्तर क्रमवारीने लावून त्याचे एक रजिस्टर करण्यात आले आहे. देणगीदार तथा हितसंबंधी व्यक्तीलाही दप्तराची पडताळणी करता येईल. अर्थात त्यासाठी देवस्थानला अल्प देणगी फी द्यावी लागेल. सन २००७/०८ ते सन २०२०/२१ पर्यंतचे सर्व ऑडीट रिपोर्ट फेसबुक पेजला पोस्ट लिहून लिंक केले आहेत...

- <u>ऑडीट रिपोर्ट...</u> देवस्थानचे ऑडीट अकाऊंटिंगचे काम मा. श्री. निलेश पाटणकर सी.ए. राजापूर

यांच्या कडून केले जात आहे. सन २०२०/२१ या आर्थिक वर्षाचे अकौंटींग व ऑडीटींग करून तयार झालेला ऑडीट रिपोर्ट धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटला पाठविण्यात आलेला आहे. देवस्थानच्या हिशोब-लिखाणाचे काम लेखनिक श्री. दत्तात्रय श्रीकृष्ण रानडे, राजापूर यांनी केले आहे... ऑडिटच्या कामकाजामध्ये सी.ए. श्री. निलेश नंदकुमार पाटणकर, राजापूर यांचे योगदान मोलाचे आहे.

- <u>राजापूर अर्बन बँकेचा धर्मादाय निधी...</u> अर्बन बँक राजापूर यांचेकडून यावर्षीही धर्मादाय निधी रु. १०००० देवस्थानला प्राप्त झालेला आहे. देवस्थानकडून बँकेचे आभार मानण्यात आले आहेत. प्रतिवर्षीच्या कार्तिकोत्सवाला बँकेकडून धर्मादाय निधी दिला जात आहे.

- <u>सुसज्ज निवास व्यवस्था...</u> भक्त निवासामध्ये लाकडी पार्टिशन करून सहा नवीन खोल्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या खोल्यांचे रंगकाम करून घेण्यात आले. प्रत्येक खोलीला पंखा, कॉट, कपडे वाळत घालण्यासाठीच्या दोऱ्या, बेसीन, आदी सोई करण्यात आलेल्या आहेत. एकूण ८/९ स्नानगृहे, ८/९ शौचालय, कमोडची सुविधा, युरीन्ल्स, गरमपाण्यासाठी स्टील बंबाची व्यवस्था, इलेक्ट्रिक गिझर, जनरेटरची सोय सतरंज्या, बेडशीट, उश्या, भोजनासाठी डायनिंग टेबल, प्रत्येक खोलीत डस्टबिन, मुबलक पाणीपुरवठा आदी सोयींनी सज्ज अशी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. अनेक भक्तांनी लेखी अभिप्राय नोंदवून समाधान व्यक्त केले आहे... उत्सवकालावधीत दोन्ही वेळचे भोजन, चहापान, अल्पोपहार आदी निःशुल्क पुरविण्यात येते... ही सर्व व्यवस्था श्री. सदानंद तुकाराम लिंगायत व त्यांच्या पत्नी सौ. स्मिता सदानंद लिंगायत अत्यंत परिश्रमपूर्वक पार पाडतात.

- <u>पणत्यांची रोषणाई...दीपोत्सव...</u> कार्तिक उत्सवामध्ये सुमारे पणत्यांची आरास मंदिर परिसरात करण्यात आली होती. त्या साठी लागणारे शेंगदाणा तेल अनेक भाविकांनी स्वयंस्फूर्तीने आणलेले होते. ३/४ दिवस मंदिरातील परिसर, त्रिपुर या पणत्यांच्या प्रकाशात उजळून दिसत होते. विजेच्या दिव्यांच्या लखलखत्या प्रकाशात पणत्यांचा प्रकाश आपले अस्तित्व जाणीव करून देत होता. श्री. अभि कुलकर्णी यांचा या उपक्रमात विशेष सहभाग असतो.

- <u>सूचनावही-</u> भाविक भक्तांच्या सूचना, तक्रारी किंवा अन्य बाबी आमच्या पर्यंत पोहोचाव्यात म्हणून मंदिरामध्ये सूचनावही ठेवण्यात आली आहे. कुणीही भाविक अथवा देवस्थान हितसंबंधी व्यक्ती त्यामध्ये आपल्या सूचना, तक्रारी, अभिप्राय लिहू शकतात. सुचविलेल्या सूचनांचा आदर केला जातो. अनेक भाविक भक्तांनी आपले फोन नंबर, सूचना, अभिप्राय या सूचनावहीत नोंदविले आहेत.

- <u>उत्सवकाळात ब्राह्मण व्यवस्था...</u> श्री.प्रकाश परांजपे यांनी उत्सव काळात उपस्थित राहून भाविक भक्तांची आवर्तने, अभिषेकादी धार्मिक कामे केली. यावर्षीही श्रावण महिन्यामध्ये सर्व सोमवारी उपस्थित राहून त्यांनी भाविकांची धार्मिक कामे पार पाडली. अनेकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.....

- <u>इमारत मालमत्ता...</u> शासकीय निधीतून बांधलेल्या शौचालयांच्या इमारती, भक्तनिवास इमारत, सांस्कृतिक कला केंद्राची इमारत, मंदिरासमोरील पत्राशेड या सर्व इमारत मालमत्ता श्रीदेवाच्या मालकीच्या जमीन जागेवर उभ्या असून या जमीन जागा बक्षीस पत्राने अथवा दानपत्राने हस्तांतरित केलेल्या नाहीत. देवाच्या जमिनी देवस्थान इनामाच्या असल्यामुळे या जमिनीचे हस्तान्तरण शासनाकडे अथवा ग्रामपंचायतीकडे केलेले नाही. देवस्थानच्या सातबारा उताऱ्यावर या इमारतींच्या नोंदी कलेक्टर आदेशाने स्थळ पहाणी करून फेरफार मंजूर करून लांबी रुंदी नोंदवून झालेल्या आहेत. ग्रामपंचायत दप्तराला या सर्व इमारतींचे असेसमेंट श्रीदेव अंजनेश्वर नावाने होणेसाठी वारंवार पाठपुरावा केलेला आहे. दि.२९.१०.२०२० रोजी ग्रामपंचायत मिठगवाणेच्या कार्यालयात संयुक्त सभेचे आयोजन करून देवस्थान जमीन जागेवर उभ्या असलेल्या इमारती मालमत्ता देवस्थानचे नावे करण्याबाबत उपस्थित सर्वांचे एकमत झालेले आहे. या इमारती पैकी सांस्कृतिक कला केंद्राच्या इमारतीसाठी रु. दीड लाखाची लोकवर्गणी रक्कम देवस्थान तिजोरीतून दिलेली आहे. भक्त निवास इमारतीचे शासनाकडून निधी अभावी अर्धवट राहिलेले काम देवस्थान तिजोरीतून पूर्ण केलेले आहे. देवस्थान इनाम जमिनीबाबत व त्यावरील मालमत्तेबाबत शासनाने दि. ३० जुलै

२०१० ला शासन आदेश केलेला आहे व या शासन आदेशाची अंमलबजावणी त्वरेने व्हावी म्हणून दि. २२ जानेवारी २०२० रोजी मे. हायकोर्ट मुंबई यांच्या कोर्टाने आदेश पारित केलेले आहेत. जमिनीचे बक्षीसपत्र अथवा दानपत्र झालेले नसल्यामुळे या जमिनीवरील इमारत वास्तू देवस्थान ट्रस्टच्या मालमत्ता रजिस्टरला नोंदणे संयुक्तिक होणारे आहे. देवस्थान जमिनीवरील उभ्या इमारतींचे असेसमेंट देवस्थान ट्रस्टच्या नावाने व्हावेत, अशी आमची पुन्हा पुन्हा आग्रही मागणी आहे.

- <u>विहिरी कडील पाखाडी बांधकाम व बांधघाटी बांधकाम...</u> नवीन विहिरीकडे जाण्यासाठी जांभ्या चिऱ्यांची पाखाडी कॉंक्रेट फौंडेशन घालून सुमारे ३०/३५ फूट लांब व ५ फूट रुंद बांधण्यात आली. तसेच दगडी पुलाच्या पुढील बाजूची बांधघाटी कॉंक्रेट फौंडेशन घालून सुमारे ७०/८० फूट लांब व ५ फूट रुंद बांधघाटीचे बांधकाम जांभ्या चिऱ्यांनी करण्यात आले आहे. श्री. नरेश कांबळी व संतोष शिंदे यांच्या बांधकाम टिमने हे देखणे काम केले आहे.

- <u>मुहूर्ताई मंदिरासाठीचे महिला प्रसाधनगृह...</u> श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरात एक शौचालय व एक स्नानगृह बांधण्यात आले आहे. ही इमारत स्लॅबची आहे. शौचालय व स्नानगृहाला सिरॅमिक टाईल्स बसविण्यात आल्या आहेत. ५०० लिटरची पाण्याची टाकी बसवून पाणी व्यवस्था केली आहे. याचे काम श्री. संतोष मसुरकर, श्री. नरेश कांबळी, श्री. संतोष शिंदे यांनी पुढाकार घेऊन केले आहे.

- <u>मंदिरा बाहेरील पाय धुण्याची व्यवस्था...</u> कोरोना प्रतिबंधक इलाज म्हणून दोनवेळा हातपाय धुण्याची सोय व्हावी म्हणून मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ हातपाय धुण्याची सोय करण्यात आली.

- <u>लोखंडी ग्रील दरवाजे...</u> धर्मशाळेतील दास्तानाच्या खोलीला व गाभाऱ्याच्या आडाकडील दरवाज्याला बाहेरून सरते लोखंडी ग्रील दरवाजे बसविण्यात आले आहेत. सुरक्षेसाठी या दोन्ही दरवाज्यांना सेफ्टी अलार्म सिस्टीम जोडण्यात आली आहे.

- <u>लोखंडी मार्गिका...</u> कोरोना रोगाचे संक्रमण लक्षात घेऊन यात्रा कालावधीत, उत्सव कालावधीत भाविकांचा प्रवेश एकाच मार्गे व्हावा म्हणून ही मार्गिका करण्यात आली. श्री. सय्यद हसोळकर यांनी या मार्गिकेचे वेल्डिंग वर्क केले. उत्सवाच्या वेळी ही मार्गिका भाविकांसाठी सोयीची झाली.

- <u>हँडवॉश डिस्पेंसर...</u> कोरोना प्रतिबंधक म्हणून दोन हँडवाश डिस्पेंसर मंदिरात हातपाय धुण्याच्या ठिकाणी बसवण्यात आले आहेत.

- <u>सॅनीटायझेशन डिस्पेंसर...</u> मंदिरात सभामंडपात दर्शनी भागात सॅनिटायझर डिस्पेंसर मशीन बसविण्यात आले आहे. यामुळे मंदिरात आलेल्या प्रत्येक भाविकाला हाताला सॅनिटायझर वापर करणे सुलभ झाले आहे...

- <u>हँडस्प्रे पंप...</u> संपूर्ण मंदिर परिसराचे सॅनीटायझेशन करण्यासाठी हँडस्प्रे पंप घेण्यात आला आहे. उत्सवात दररोज तीनचार वेळा संपूर्ण मंदिर परिसर सॅनीटाईझ करण्यात आले.

- <u>मोशन सेंसर... सेफ्टी अलार्म सिस्टीम.. सि.सि.टि.व्ही.कॅमेरे... वाढ...</u> दानपेट्या बसवल्यामुळे सि.सि.टी.व्ही.कॅमेरा संख्येत वाढ करावी लागली. मोशन सेन्सर, सेफ्टी अलार्म सिस्टीम आदी यंत्रणा बसविण्यात आल्या. हे काम मे. विनीत इंटरप्रायझेस, रत्नागिरी यांचे कडून केलेले आहे. या सर्व सिस्टीममुळे धर्मशाळेतील दास्तान खोली, सोन्याचा कळस व मंदिर यांना जादाची सुरक्षा मिळाली आहे.

- <u>आदेश मिळवून उत्सव...</u> श्रीदेवीचा नवरात्री उत्सव, दसरा उत्सव, काकडारती, कार्तिकी उत्सव, शिवरात्री उत्सव व होळी उत्सव या सर्वांसाठी पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांची वेळोवेळी लेखी परवानगी घेण्यात आली. कोरोनाचे सर्व नियम, नियमावलीचे बंधन पाळण्याची हमी वेळोवेळी देऊन उत्सव परवानगीचे आदेश मिळवावे लागले.

- **<u>दगडीपुलावरचा लोखंडी कठडा...</u>** दगडी पुलावरून जाताना हात धरण्यासाठी आधार असला पाहिजे, अशी सूचना अनेकांनी केली होती. उत्सवाचे वेळी रात्रीचे जाता-येताना तसा कठडा आवश्यकच होता. वयोवृद्ध व्यक्तींसाठी कठडा गरजेचा वाटू लागला. श्री. सय्यद हसोळकर यांनी त्या कठड्याचे वेल्डिंग काम केले आहे. यावेळी धर्मशाळेजवळच्या लोखंडी कठड्याचे काम करून घेण्यात आले.
- **<u>कडाप्पा कुंड्या... श्रीदेवाची फुलबाग...</u>** नित्य पूजेला विपुल फुले मिळवीत, त्यामध्ये विविधता असावी, परिसराची शोभा वाढावी या हेतूने कडाप्पा कुंड्या करण्यात आल्या. वेगवेगळ्या जातीची फुलझाडे येथे लावण्यात आली आहेत. मंदिराच्या तटबंदीच्या कडेला असल्यामुळे या कुंड्यांची कोणतीही अडचण होत नाही. पूर्वीच्या दगडी कामाला कोणताही धक्का न लावता, कोणतीही मोडतोड न करता हे काम केलेले आहे.
- **<u>प्लास्टिक कुंड्या...</u>** प्लास्टिक कुंड्या व मोठे प्लास्टिक टब खरेदी करून वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे, लाल-पांढरी कमळे लावली आहेत. मंदिर परिसराची शोभा वाढावी... नित्य पूजेसाठी फुलांची कमतरता राहू नये हा हेतू आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूला १/२ माड, २/४ सुपारीची झाडे, ५/६ केळीची रोपे लावली आहेत, जेणेकरून नारळ, सुपारी, केळीची पाने सहज उपलब्ध होतील.
- **<u>मिठगवाणे गावचा नकाशा...</u>** गावाचा नकाशा गावामध्ये ठळक जागी असावा की, जेणे करून गावातल्या कुणाही ग्रामस्थाला त्या नकाशाचा फोटो सहज काढता येईल. अंजनेश्वरच्या नगारखान्यात काचेची फ्रेम करून हा गाव नकाशा बसविलेला आहे. आमच्या गावातील श्री. विकास कल्याण मेस्त्री याने आपल्या खर्चाने नकाशा व फ्रेम आणून बसविली आहे.
- **<u>'एक तरी ओवी अनुभववावी'...</u>** हा उपक्रम यंदाच्या गोकुळाष्टमीला सुरू करण्यात आला आहे. सध्या ज्ञानेश्वरी व गोंदवलेकर महाजांची प्रवचने मूकशाले मध्ये नियमित वाचनासाठी ठेवली आहेत. श्री. विजय गवाणकर यांनी सटिक ज्ञानेश्वरी ग्रंथ व वाचनासाठीचे लाकडी व्यास देणगी स्वरूपात दिल्यामुळे हा ग्रंथ वाचनाचा उपक्रम सुरू केला आहे... भक्तांना मंदिरात आल्यावर ज्ञानेश्वरांची एक तरी ओवी सहजपणे वाचता यावी, हा हेतू आहे... याला प्रतिसाद लाभला तर दासबोध, अभंगगाथा हे ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करता येतील...
- **<u>सुवर्ण कलश देणगीदार पाटी...</u>** सुवर्ण कलशाच्या देणगीदारांपैकी रु. २५ हजार व त्या वरील देणगीदारांची यादी ग्रॅनाईट दगडात सोनेरी रंगात कोरून घेतलेली आहे. सुवर्ण कलशाची देणगी स्वीकारताना पंचवीस हजाराच्या पुढील देणगीदारांच्या नावाची पाटी सोनेरी अक्षरात करायची असे ठरलेलेच होते.
- **<u>व्हिडिओ शुटिंग...</u>** श्री.प्रशांत भडेकर, जैतापूर यांनी आमच्याकडून मिळेल तो अल्प मोबदला स्वीकारून दसरा उत्सव, काकडारती, दोन्ही जनरल मिटिंग, कार्तिकी उत्सव, महाशिवरात्री उत्सव या सर्व कार्यक्रमाचे व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. गेली दोन-तीन वर्षे सर्व उत्सवांचे व्हिडीओ चित्रीकरण त्यांनी केलेले आहे. हे सर्व व्हिडीओ चित्रीकरण पेन ड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवण्यात आले आहे.
- **<u>स्पीकर टायमर...</u>** नवीन लाउड स्पीकर संच श्री.धनलक्ष्मी चेऊलकर यांनी दिलेला होता. तो स्पीकर नियमित लागावा, स्पीकर वरील सनई ठीक वेळेवर लागावी या हेतूने त्याला टायमर बसविण्यात आला. यामुळे सकाळ-संध्याकाळी ठीक सव्वासहा वाजता स्पीकरवरील सनई वाजते व ठीक सात वाजता बंद होते. या टायमर मुळे देवाची सकाळची नित्यपूजा व संध्याकाळची धुपारती ठीक सात वाजता होते.
- **<u>सोन्याची रुद्राक्ष माळा...</u>** सोन्याची रुद्राक्ष माळा घडविण्यासाठी मे. गोखले सराफ, कोल्हापूर यांच्या सराफी पेढीवरून २२० ग्रॅम, रक्कम रु. ११ लाख ४६ हजार २०० किमतीच्या शुद्ध सोन्याची खरेदी करण्यात आली. गावचे देवाचे सोनार श्री. दत्ताराम जगन्नाथ तथा बाळूशेठ पाटणकर यांनी स्वत: रुद्राक्षमणी आणून सोन्याची रुद्राक्ष माळा घडविली. सोन्याची रुद्राक्ष माळा सुरक्षित रहावी म्हणून छोट्या आकाराची लाकडी तिजोरी त्यांनीच तयार करून घेतली. या कामासाठी मजुरी खर्च सुमारे ६६ हजार ३०० अपेक्षित होता. परंतु ''या कामाची मजुरी मी घेणार

नाही अन् रुद्राक्ष मण्यांची खरेदी किंमत रु. १००० सुद्धा मला नको, देवाची सेवा करण्याची संधी मला मिळाली, अजून काही नको...'', असे श्री. दत्ताराम जगन्नाथांनी सांगितल्यामुळे सराफी-मजुरीचा चेक रद्द करून फाईलला लावून ठेवला. या सोन्याच्या रुद्राक्ष माळेबाबत गिरीजा हॉलमार्क सेंटर, रत्नागिरी यांचेकडून प्रमाणपत्र घेतलेले आहे.

- <u>फुलबागेला ठिबक सिंचन...</u> फुलबागेला नियमित पाणी मिळावे म्हणून संपूर्ण फुलबागेला ठिबक सिंचन करण्यात आले. आमचे मित्र श्री. उमर नाईक यांनी हे ठिबक सिंचनाच्या पाईपिंगचे काम अतिशय आपुलकीने, मनापासून व अल्प मोबदला घेऊन केले.

- <u>देणगीदार रजिस्टरचे नूतनीकरण/संगणकीकरण-</u> देवस्थानच्या देणगीदारांच्या पत्त्यात बदल होतात. झालेले बदल देणगीदारांकडून कळविले जात नाहीत. परिणामी पाठविलेली निमंत्रणे पोहोचत नाहीत. गेल्या १० वर्षातील देणगी पावत्यांचा मागोवा घेऊन नव्याने पत्ता रजिस्टर तयार करण्याचे काम अत्यंत मेहनतीने केलेले आहे. संगणकीय रजिस्टर यादी करण्याचे काम चालू आहे. तरी देणगीदारांनी आपले बदललेले पत्ते पत्रव्यवहार करून देवस्थानला कळवावेत. संपर्क क्र.९८२३२७७३२६ ह्या whatsapp नंबर वर मेसेज करून आपले बदलेले पत्ते कळवता येतील..

- <u>सर्व खर्च चेकद्वारे-</u> देवस्थानचा सर्व खर्च क्रॉसचेकद्वारे करण्यात आलेला आहे. काही किरकोळ धार्मिक खर्चाचे अपवाद वगळता कोणताही खर्च रोख रक्कमेने केला जात नाही. यामुळे आर्थिक व्यवहारात शंका घेण्यास कुठेही जागा शिल्लक ठेवलेली नाही. एका सहीने सर्व आर्थिक व्यवहार होत असल्यामुळे क्रॉसचेकने अदाई करण्याचे बंधन घालून घेतलेले आहे.

- <u>देवस्थानची आर्थिक स्थिती...</u> देवस्थानचा रु. १ कोटी ६० लाखाचा निधी राजापूर अर्बन बँक, जानशी पठार शाखा यामध्ये मासिक प्राप्ती ठेव योजने मध्ये ठेवून त्याचे मासिक व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला मिळविले जात आहे. कै. गौरी हरी देसाई यांचे स्मरणार्थ रु. २५०००.०० ची मुदत ठेव श्री. नारायण हरी देसाई यांनी ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. कै.गोपाळ विष्णू देवधर यांचे स्मरणार्थ रु. २००००.०० ची मुदत ठेव श्री. प्रदीप गोपाळ देवधर यांनी ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. श्री. अतुल सदाशिव भोगले रु. १००००.०० ची मुदत ठेव ठेवून त्याचे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केलेले आहे. श्री. ओंकार महेश नेने यांच्या मुदत ठेवीतील व्याज श्रीदेवाचे बचत खात्याला ट्रान्स्फर झालेले आहे. श्री.यशवंत वासुदेव बावकर, मिठगवाणे-बावकरवाडी यांच्या रु. १०००० च्या मुदतठेवीचे व्याज श्रीदेवाच्या बचत खात्याला जमा होत आहे. कै. गो. बा. देसाई यांच्या ठिकाणामधील सागवान विक्रीतून मिळालेली रक्कम रु. दोन लाख श्री. नंदकुमार मधुसूदन परांजपे यांनी मुदत ठेवीमध्ये गुंतवून त्याचे मिळणारे संपूर्ण व्याज श्रीदेवाच्या बचत खात्यात ट्रान्स्फर केले आहे. तर देवस्थानच्या बचत खात्यात रु. दीड लाखाच्या वर रक्कम शिल्लक आहे. देवस्थानची आर्थिक स्थिती अतिशय भक्कम झाली आहे. याच आर्थिक वर्षात रु. ११ लाख ४६ हजार २०० किमतीचे २२० ग्रॅम सोने खरेदी करून सोन्याची रुद्राक्ष माळा श्रीदेवासाठी घडविण्यात आली.

(सन एप्रिल २०२० ते मार्च २०२१ व त्यानंतरच्या कालावधीत झालेल्या कामांचा/घडामोडींचा आढावा ढोबळपणे घेतलेला आहे.)

# श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
## सन २०२० – २०२१ चा जमाखर्च तेरीज पत्रक

### जमा

| | | |
|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक |
| रु. | ११,०७२.०० | हाती रोख |
| रु. | ३,१८,४५०.७४ | बँक ऑफ इंडिया खाते |
| रु. | ३,७४,७२०.०० | देणगी |
| रु. | ६७,६८३.०० | उत्सव देणगी |
| रु. | ३७०.०० | उत्सव आरती जमा |
| रु. | १०,३१५.०० | बँक व्याज |
| रु. | १४,२८,५१०.०० | स्थिर निधी व्याज |
| रु. | ५००.०० | भक्त निवास भाडे |
| रु. | १,४००.०० | खुर्ची भाडे |
| रु. | ६,८१०.०० | इतर जमा |
| रु. | ७८०.०० | प्रसाद साहित्य देणगी |
| रु. | ६,४५०.०० | उत्सव साहित्य देणगी |
| रु. | ३,९००.०० | भांडी सामान देणगी |
| रु. | ४७,१११.०० | डेडस्टॉक फंड |
| रु. | १०,००,०००.०० | स्थिर निधी जमा |
| रु. | ३२,७८,०७१.७४ | एकूण |

### खर्च

| | | |
|---|---|---|
| रु. | ४,४७,४४०.०० | उत्सव खर्च |
| रु. | १,०००.०० | प्रवास खर्च |
| रु. | १,९६९.०० | ग्रामपंचायत कर खर्च |
| रु. | २६२.०० | बँक कमिशन |
| रु. | २६,७०५.०० | मंदिर रंगकाम खर्च |
| रु. | ५,०००.०० | पोस्टेज |
| रु. | ६५०.०० | किरकोळ खर्च |
| रु. | ४,५००.०० | देखभाल दुरुस्ती खर्च |
| रु. | ४८,९८३.०० | दानपेटी सुरक्षा खर्च |
| रु. | २२,४१०.०० | छपाई खर्च |
| रु. | १०,०००.०० | वेबसाईट खर्च |
| रु. | १०,०००.०० | कंपाउंड गेट खर्च |
| रु. | ५८५.०० | झेरॉक्स खर्च |
| रु. | १,३७,५००.०० | नित्यसेवा मानधन |
| रु. | ३०,०००.०० | पुजारी मानधन |
| रु. | १५,०००.०० | लेखनिक मानधन |
| रु. | १०,५१०.०० | विद्युत बिले |
| रु. | २२,०४५.०० | विद्युत खर्च |
| रु. | १,८३,६००.०० | विहीर खर्च |
| रु. | ११,०००.०० | मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| रु. | ११,०००.०० | पंतप्रधान सहाय्यता निधी |
| रु. | १,१६,४९८.०० | पाखाडी खर्च |
| रु. | ६,३८२.०० | स्वच्छता खर्च |
| रु. | ४४,०००.०० | इनकम टॅक्स |
| रु. | ७८,७२०.०० | कायम सामान |
| रु. | ११,४६,२००.०० | सोने खरेदी |
| रु. | १,४०,३४०.०० | मंडप खर्च |
| रु. | १,२८,५९४.०० | स्वच्छतागृह बांधकाम खर्च |
| रु. | १,९८५.०० | श्री.परांजपेटीडीएस२०-२१ |
| रु. | ५,००,०००.०० | स्थिरनिधी |
| | | अखेर शिल्लक |
| रु. | १,०४,६१५.७४ | बँक ऑफ इंडिया खाते |
| रु. | १०,५७८.०० | हाती रोख |
| रु. | ३२,७८,०७१.७४ | एकूण |

**विश्वस्त,**
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

# उत्सव देणगीदार यादी सन २०२०-२१

(रु.५००/-च्या वरील देणगीदारांची नावे या यादीत समाविष्ट आहेत.त्याखालील देणगीदारांची नावे छापणे शक्य झाले नाही.)

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १ | सविता राजीव ढमढेरे | १००००/- |
| २ | मोरेश्वर अनंत भुस्कुटे | ५००/- |
| ३ | योगेश्वर वसंत देसाई | १०००/- |
| ४ | अमित विजय कुळकर्णी | १०००/- |
| ७ | मकरंद वामन गोखले (कै. वामन द. गोखले व कै. कुसुमावती गोखले यांचे स्मरणार्थ) | ५०१/- |
| ८ | ओंकार नेने | ६८७/- |
| ११ | सुनिल गोपाळ देवधर | ५०००/- |
| २४ | नंदकुमार मधुसूदन परांजपे | १५००/- |
| २५ | नंदकुमार मधुसूदन परांजपे | १६६३/- |
| २७ | सतीश गोपाळ पदुसकर | १००१/- |
| २८ | नंदकुमार मधुसूदन परांजपे | ६७२/- |
| २९ | - | ५००/- |
| ३० | - | ५०१/- |
| ३३ | कै. भालचंद्र सोनू मांजरेकर स्मरणार्थ ग. भा. शिला विद्याधर पडवळ | ४०००/- |
| ३४ | अमित विजय कुळकर्णी | ११००/- |
| ३६ | भाग्यश्री अजित अंगडी | ५०१/- |
| ४१ | कै. त्रिंबक केशव देसाई स्मरणार्थ गजानन त्रिंबक देसाई | २००००/- |
| ४२ | अविनाश दत्तात्रय देसाई | २५०१/- |
| ४३ | विवेक गोपाळ देसाई | २५०१/- |
| ४४ | अंजली गजानन दीक्षित | ५००/- |
| ४५ | सुनिल गोपाळ देवधर | ३०००/- |
| ४६ | प्रशांत वैद्य | १००१/- |
| ४७ | अभिजित अशोक भुस्कुटे | ५०१/- |
| ४८ | राजेश शंकर फडके (सोलर सिस्टिमसाठी) | ११११११/- |
| ४९ | नंदकुमार मधुसूदन परांजपे | १००६/- |
| ५६ | मेघ:शाम नेने | १०५१/- |
| ५७ | ॲड्. धनंजय दिनकर देसाई | १५०००/- |
| ५८ | - | १००१/- |
| ५९ | शिवानी विवेक साने | ५०१/- |
| ६० | दीपक माधव मराठे | ५०१/- |
| ६१ | कुणाल चारुदत्त ढमढेरे | १०००/- |
| ६४ | शाम बलवंत गोगटे | ५०१/- |
| ६३ | कै. शुभदा देसाई व कै. दिगंबर वा. देसाई स्मरणार्थ भाग्यश्री अंगडी, कीर्ती भट व मृण्मयी फडके | ५१००/- |
| ६५ | नित्यानंद जयंत भोगले | १००००/- |
| ६६ | कै. सुहासिनी चेऊलकर स्मरणार्थ निलेश चेऊलकर | १०००/- |
| ६९ | विजयानंद केशव भुस्कुटे | ५०००/- |
| ७१ | प्रकाश परशुराम गोखले | १०००/- |
| ७२ | वैभव विश्वास गोखले | १०००/- |
| ७३ | अमोल पणशीकर | ३००१/- |
| ७५ | धनंजय कुवेसकर | १००१/- |
| ८१ | गजानन राजाराम भुस्कुटे | ५००/- |
| ८३ | ओंकार प्रकाश पावसकर | ५०१/- |
| ८४ | कै. धोंडू बापू पावसकर स्मरणार्थ प्रकाश धोंडू पावसकर | ५७१/- |
| ८५ | राहुल प्रकाश पावसकर | ५५१/- |
| ८६ | योगेश्वर देसाई | १०००/- |
| ८७ | शितल महादेव उन्हाळेकर | १५०००/- |
| ८८ | सुरेश शंकर हिंदळेकर | ५००/- |
| ८९ | शिवराम के. जैतापकर | ५५१/- |
| ९० | नंदकुमार विद्याधर मांजरेकर | २१००/- |
| ९१ | उदय अनंत देसाई | ५०००/- |
| ९२ | सुनिल गोपाळ देवधर | २००१/- |
| ९३ | कुणाल सिताराम चेऊलकर | २५००/- |
| ९६ | - | १०००/- |
| ९७ | - | ५००/- |
| ९८ | - | २१००/- |
| ९९ | रविकिरण रघुनाथ देसाई | १२००/- |
| १०१ | दिवाकर गोविंद भोगले | ५०१/- |
| १०२ | महादेव गोपाळ चव्हाण | ५११/- |
| १०३ | काशिनाथ वासुदेव सागवेकर | ५०००/- |
| १०४ | अशोक काळे | १००१/- |
| १०६ | गौरी दीक्षित | ५०१/- |
| १०९ | उल्हास अ. मांजरेकर | ५००/- |
| ११० | प्रमोद प्रकाश हिंदळेकर | १००१/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| १११ | श्रद्धा श्रीधर गवाणकर | ५००/- |
| ११२ | प्रिती नार्वेकर, संतोष नार्वेकर, प्रतिक नार्वेकर, स्नेहा राऊत | ३००३/- |
| ११३ | सुधाकर बामा पाटील | ५००/- |
| ११४ | चैतन्य विलास देसाई | ५००/- |
| ११५ | विजया प्रसाद | १०००/- |
| ११६ | अनिल काळे | १०००/- |
| ११७ | शोभा राजाराम भागवत | १०००/- |
| ११८ | अर्चना अरुण मांजरेकर व अरुणभाई मांजरेकर (महाप्रसादासाठी देणगी) | ७५०००/- |
| १२० | रविंद्र शंकर कुळकर्णी | ६०१/- |
| १२४ | निलीमा काशिनाथ परांजपे | ५०१/- |
| १२५ | प्रथमेश प्रफुल्ल कोंडेकर | ५०१/- |
| १२६ | विलास जैतापकर | ५००/- |
| १२७ | विजय कुळकर्णी | ५००/- |
| १२८ | नेहा अनिल वाघधरे कै. केरोजी वाघधरे स्मरणार्थ | २१००/- |
| १२९ | अनिल केरोजी वाघधरे | ५००/- |
| १३० | जगदीश दयाळ नार्वेकर | ५०१/- |
| १३१ | सुनिता चंद्रकांत मोहिते | ७०१/- |
| १३५ | सुहास चेऊलकर | ५०१/- |
| १३६ | रोहीत हेमकांत ढमढेरे | ५०००/- |
| १३९ | अर्णवी प्रशांत मोहिते | ११११/- |
| १४२ | गिरीधर पांडुरंग मांजरेकर | ११११/- |
| १४३ | गणेश जयराम भांबे | २०००/- |
| १४४ | कै. सौ. कांचन नार्वेकर स्मरणार्थ अशोक दयाळ नार्वेकर व मंगेश अशोक नार्वेकर | १०००१/- |
| १४५ | विश्वनाथ यशवंत गवाणकर | १००१/- |
| १४७ | समीर बी. गवाणकर | २००१/- |
| १४८ | आकाश अनिल गवाणकर | १००१/- |
| १४९ | वसंत चिंतामण गोखले | ५००/- |
| १५१ | अरविंद देसाई | ५००/- |
| १५२ | प्रियदर्शनी प्रकाश काजवे | १००१/- |
| १५३ | दयाघन संभाजी शिंदे | १०००/- |
| १५६ | शशिकांत विष्णू कुळकर्णी | ५००/- |
| १५७ | शामसुंदर पाटणकर | ५००/- |
| १५८ | मिहीर ए. नेवरेकर | ५००/- |
| १५९ | कै. मुकुंद देसाई स्मरणार्थ विमल मुकुंदराव देसाई | ११११/- |
| १६२ | शरद मुकुंदराव देसाई | ५००/- |
| १६८ | सिमा सुधाकर भुस्कुटे | १००१/- |
| १७९ | रविंद्र पांडुरंग बांधकर | ५०१/- |
| १८६ | गणेश विनोद गडकर | ५००/- |
| १८७ | उमेश दशरथ शिरवडकर | १००२/- |
| १८९ | ओंकार प्रकाश गवाणकर | ५०१/- |
| १९१ | शामसुंदर दामोदर गवाणकर | ५०१/- |
| १९४ | विश्वनाथ बाळकृष्ण काजवे | ५०१/- |
| १९५ | देवदत्त गुरुदास मांजरेकर | १००१/- |
| १९६ | प्रकाश गंगाराम कांबळी | ५२१/- |
| २०२ | हरेश ज्ञानेश्वर कांबळी | ५०१/- |
| २०३ | प्रशांत कैलास कांबळी | ५००/- |
| २०६ | सुर्यकांत किसन राऊत | ५०१/- |
| २०८ | विलास लक्ष्मण हळदणकर | ५००/- |
| २०९ | बाळाराम धोंडू कांबळी | ५०१/- |
| २१० | निळकंठ वामन देसाई | ५०००/- |
| २१२ | कै. आत्माराम राऊत, कै. राधाबाई राऊत, कै. कालिदास राऊत स्मरणार्थ वसंत राऊत | ५५५/- |
| २१३ | प्रथमेश उपळकर | ५०५/- |
| २१७ | प्रकाश खाडीलकर | ५००/- |
| २२१ | गितेश अनिल बोटले | ५००/- |
| २२४ | रणजित रामदेव देसाई | ५०१/- |
| २२५ | अभय पद्माकर भुस्कुटे | १०००/- |
| २२६ | नितिन माधवराव खरे | ५००/- |
| २२७ | श्रीधर शशिकांत भुस्कुटे | ५००/- |
| २२८ | सिमा सुधाकर भुस्कुटे | ५०१/- |
| २३१ | अशोक आनंद गिरकर | ५००/- |
| २३३ | शिल्पा मंदार परांजपे | ५०१/- |
| २३५ | विलास कृष्णा राजापकर | ५००/- |
| २३६ | विजय सखाराम गवाणकर | ५००/- |
| २४० | जगदीश मोहन चेऊलकर | ५००/- |
| २४७ | वासुदेव रामचंद्र भुस्कुटे | ५०१/- |
| २४८ | श्रीपाद गोविंद भुस्कुटे | १०००/- |
| २५० | रविंद्र अनंत भुस्कुटे | ११११/- |
| २५१ | ओंकार हरी राऊत | ५०१/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| २५३ | विवेक वासुदेव जोगळेकर | ५०१/- |
| २५४ | अश्विनी अरुण जुवेकर | ५००/- |
| २५६ | अनिकेत नरेश शिंदे | ५००/- |
| २५८ | विद्या विलास चेऊलकर | ५०१/- |
| २६६ | सुधाकर गोपाळ शिरसेकर | ५०१/- |
| २६७ | अवनी सुधाकर शिरसेकर | ५०१/- |
| २७८ | प्रभाकर आंबेलकर | ५०१/- |
| २९० | राजेश दशरथ शिरवडकर | ५०१/- |
| २९१ | राजेश दशरथ शिरवडकर | ५०१/- |
| २९९ | विजय दत्तात्रय ओगले | ५०१/- |
| ३०४ | अमित सदानंद पावसकर | ५०१/- |
| ३०५ | माधवी महादेव उन्हाळेकर | ५५१/- |
| ३११ | पांडुरंग भिकाजी तांबे | ५०१/- |
| ३२१ | कीर्ति सौरभ विनोद बोटले | १००१/- |
| ३२८ | पद्मजा जिनप्पा देसाई | ५०१/- |
| ३२९ | कमलाकर पुनाजी मुटाटकर | ५०१/- |
| ३४५ | सुहास कल्याण कोंडेकर | ५०१/- |
| ३५२ | सुरेश केशव मिठगवाणकर | ५००/- |
| ३६२ | संध्या विलास जोशी | ५०१/- |
| ३६३ | उदय दत्तात्रय गोखले | ५००/- |
| ३६५ | मधुकर भगवान नार्वेकर | ५००/- |
| ३६६ | राहूल वाघधरे | ५००/- |
| ३७५ | सम्राट प्रवीण गवाणकर | ५०१/- |
| ३७७ | लक्ष्मी शांताराम लिंगायत | ५५१/- |
| ३८६ | कमलाकर बापू रांबाडे | ५०१/- |
| ३८७ | अशोक मनोहर सोमण | ५००/- |
| ३८८ | अश्विनी अरुण जुवेकर | ५००/- |
| ३९० | सत्यवान गोविंद धुरी | १००१/- |
| ३९१ | नंदकुमार मनोहर चितळे | ५०१/- |
| ३९२ | रेयांश निलेश चव्हाण | ५००/- |
| ४०१ | अशोक खेडेकर | ५०१/- |
| ४०४ | तारामती गणपत सुतार | १०००/- |
| ४१२ | रमेश जयराम शिरसेकर | ११११/- |
| ४२२ | अमित दिवाकर पाटणकर | ५००/- |
| ४२४ | संतोष सुरेश कांबळी | १०१०/- |
| ४२५ | संतोष सदाशिव पाटणकर | ५०१/- |
| ४२७ | शैलेश वाघधरे | ५०१/- |
| ४४१ | गणपत लक्ष्मण बावकर | १००१/- |
| ४४२ | रोहीदास हरिश्चंद्र चेऊलकर | ५०१/- |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ४४३ | अरविंद राजाराम चेऊलकर | ५००/- |
| ४४४ | प्रसाद यशवंत बावकर | ५०१/- |
| ४५० | सुनयना सुधीर जावकर | ५०१/- |
| ४५८ | आकाश नंदकुमार राऊत | ५००/- |
| ४७० | अरविंद पांडुरंग जाधव | ५०१/- |
| ४७९ | दत्तप्रसाद वसंत मोहिते | १०५१/- |
| ४८२ | निखिल सतीश राऊत | ६०१/- |
| ४८४ | रमेश भिकाजी पावसकर | ५०१/- |
| ४८८ | पंकज प्रकाश मणचेकर | ५०१/- |
| ४९९ | प्रकाश राठोड | ५००/- |
| ५०० | दिनेश रहाटे | ५००/- |
| ५०१ | अमायरा अमित दांडेकर | ५००/- |
| ५०२ | संदीप रामदास मांजरेकर | १०००/- |
| ५०६ | जोशी बंधू तिवरांबी | ११११/- |
| ५०९ | सुनिल द. नार्वेकर | ५००/- |
| ५१० | संतोष हरिश्चंद्र आडीवरेकर | ५००/- |
| ५१२ | योगेश चंद्रशेखर पाटकर | ५००/- |
| ५१३ | ॲड्. शशिकांत सुतार | १००१/- |
| ५१५ | शांताराम सदाशिव जळगावकर | ५००/- |
| ५१८ | रंजना अजय हळदणकर | ५०१/- |
| ५२० | रझाकखान गवाणकर | ५५०/- |
| ५२५ | चंद्रकांत मयेकर | १००१/- |
| ५३० | निखिल दिलीप कुवेसकर | ५०१/- |
| ५३१ | विनायक रामचंद्र मेढेकर | ५०१/- |
| ५३२ | पूनम विराज नार्वेकर | ५००/- |
| ५३९ | भगवान मेढेकर | ५००/- |
| ५४२ | शामसुंदर यशवंत म्हंकाळ | ५००/- |
| ५४३ | शरद रघुनाथ कांबळी | ५०१/- |
| ५४८ | प्रमोद दत्तात्रय ओक | ५०१/- |
| ५५० | हर्षल राजेंद्र आंबवणे | ५००/- |
| ५५२ | अन्वी निषाद पाटणकर | १००१/- |
| ५५३ | मधुकर सखाराम पडवळ | ५०१/- |
| ५५४ | वैभव विलास क्षीरसागर | ५०२/- |
| ५५५ | दयानंद हरी भुस्कुटे | १०००/- |
| ५५६ | सुमेधा प्र. फडके | ५००/- |
| ५५७ | प्रशांत अ. वेंगुर्लेकर | ५००/- |
| ५६० | प्रारंभी प्रताप चेऊलकर | ५००/- |
| ५६१ | संतोष वसंत उपळकर | ५०१/- |
| ५६३ | चिन्मय पावसकर | ५००/- |
| ५६६ | स्वप्नील विलास काजवे | ५२१/ |

| पा. क्र. | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ५६८ | जयप्रकाश सुर्वे | ५०१/- |
| ५७१ | संजय मधुकर जांबळे | ५०१/- |
| ५७२ | नितीन धुरी | ५०१/- |
| ५७४ | अनघा शेंडे | ५००/- |
| ५७६ | - | १००१/- |
| ५७७ | मैत्रेयी विवेक कामत | १०००/- |
| ५७८ | पद्मावती मिर्लेकर | १०००/- |
| ५८० | अंबरीश गोरे | १०००/- |
| ५८२ | कल्पना शरद गवाणकर | ५०१/- |
| ५८३ | सुनिल मोहिते | १०००/- |
| ५८४ | अभय पद्माकर भुस्कुटे | १०००/- |
| ५८५ | - | १८८१/- |
| ५८६ | - | ५०१/- |
| ५८८ | - | ११११/- |
| ५८९ | - | ५०१/- |
| ५९० | - | १०००/- |
| ५९१ | गवाणकर | २००१/- |
| ५९३ | - | १००१/- |
| ५९४ | आकाश गवाणकर | १००१/- |
| ५९६ | - | २६००/- |
| ५९८ | - | १००१/- |
| ६०१ | वामन नारायण मोहिते | २१०१/- |
| ६०४ | रविंद्र संभाजी कुवेसकर | ६११/- |
| ६०५ | ऋतुराज भुपेंद्र फडके | ५०१/- |
| ६०७ | विजय पुरुषोत्तम भुस्कुटे | ५०१/- |
| ६०९ | वसंत दिनकर नेने | ५०१/- |
| ६१० | योगेश्वर वसंत देसाई | ५००/- |
| ६११ | यशवंत निळकंठ लिंगायत | ३१०१/- |
| ६१२ | राजेश पडवी | ५०१/- |
| ६१३ | अमेय महेश कुळकर्णी | ५०१/- |
| ६१४ | योगेश काळे | ५०१/- |
| ६१५ | सुर्यकांत सोमकांत वैद्य | ५००/- |
| ६१६ | अनघा शेंडे | २१००/- |
| ६१८ | योगेश मंगेश कुळकर्णी | ५००/- |
| ६२० | अनुराधा भुस्कुटे | ५०१/- |
| ६२२ | कै. सिताराम बाळकृष्ण दसाई (पणजोबा) यांचे स्मरणार्थ सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ११००/- |
| ६२३ | कै. वामन सिताराम देसाई (आजोबा) यांचे स्मरणार्थ सौ. भाग्यश्री अजित अंगडी | ११००/- |
| ६२५ | गजानन त्रिंबक देसाई | १०००/- |
| ६२६ | पूजा गौरव वाघधरे | ५०१/- |
| ६२९ | गुरुदास वासुदेव भुस्कुटे | ५००/- |
| ६३० | समिधा प्रबोधन देसाई | १०००/- |
| ६३१ | राजापूर अर्बन को ऑप. बँक लि. राजापूर | १००००/- |
| ६३२ | रविंद्र पांडुरंग बांधकर | ५०१/- |
| ६३३ | चारुशीला धर | १०००/- |
| ६३४ | कविता नायर | ५०१/- |
| ६३६ | कौस्तुभ बापट व स्वाती बापट | १०००/- |

## वस्तुरूप देणगी

| | | |
|---|---|---|
| ३२ | कै. अनंत विद्याधर पडवळ यांचे स्मरणार्थ शिला विद्याधर पडवळ स्टील टाकी व स्टील तांबे २ | ३९००/- |
| ३५ | कै. सिताराम लाडकाजी चेऊलकर स्मरणार्थ श्रीम. धनलक्ष्मी सिताराम चेऊलकर लाऊडस्पीकरसाठी देणगी | २५०००/- |
| ३८ | अमोघ दिनकर भुस्कुटे (भक्तनिवास सोलर सिस्टिमसाठी) | ११०००/- |
| १२२ | नित्यानंद भोगले सॅनिटायझर १५ लिटर | १०००/- |
| १२३ | राजाराम वारीक (सॅनिटायझर) | ३००/- |
| १५५ | जयंत शंकर जोशी व कुटुंबीय (खडीसाखर ८ कि.) | ४८०/- |
| १६० | सौ. सुवर्णा जगदीश काळे (पणत्यांसाठी शेंगतेल कॅन) | ११५०/- |

- **<u>दिवंगत व्यक्तींबद्दल सहवेदना...</u>**

कोरोना महामारीमुळे अनेकांचे अचानक निघून जाणे कष्टदायक झाले... 'वासांसि जीर्णानि...' या न्यायाने निघून जाणे स्वाभाविक असते. परंतु कोरोना महामारी मध्ये देवाज्ञा झालेल्यांची पार्थिव शरीरे सुध्दा अंत्यदर्शनासाठी, अंत्यसंस्कारासाठी मिळाली नाहीत. या अहवाल वर्षामध्ये दिवंगत झालेल्या सर्वांना चिरशांती लाभो, सद्गती लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना आहे...

- **<u>आभार...</u>** देवस्थान कामकाजामध्ये भाग घेणाऱ्या सर्व सेवेकरी मानकरी खोत मंडळींचे... आभार देवस्थानला सढळ हस्ते देणगी देणाऱ्या देणगीदारांचे... आभार देवस्थानच्या वार्षिक कामकाजात, बांधकामात भाग घेणारे... सर्वश्री श्री. दत्ताराम जगन्नाथ ऊर्फ बाळू पाटणकर, श्री. नरेश कांबळी, श्री. रमेश काजवे, श्री. विलास मेस्त्री, श्री. नंदकुमार मेस्त्री, श्री. बापू मेस्त्री, श्री. बाळू मेस्त्री, श्री. सुनील काजवे, श्री.सय्यद हसोळकर, श्री. प्रशांत भडेकर, श्री. गिरिश धनावडे, श्रीम. विमल धनावडे, श्री.संजय मेस्त्री यांचा उल्लेख करावाच लागेल... वर्षभरात रंग साहित्य आदी पुरवणारे श्री. वैभव कुवेसकर, कै. श्री. शिवाजी जैतापकर, श्री. सचिन मेस्त्री, श्री. राजन कुवेसकर श्री. रमेशशेठ लांजेकर, नाटे यांचे आभार मानलेच पाहिजेत. उत्सवात ध्वनी प्रकाश व्यवस्था करणारे गिरिश धनावडे, सविता इव्हेंट मॅनेजमेंट, श्री.अभि कुळकर्णी यांचे सुध्दा आभार. श्री. दिपक नाटेकर व त्यांचे सर्व साथीदार यांचे आभार... 'भोजन प्रसादासाठी'... निरपेक्ष भावनेने आरतीला पेटीच्या साथीची सेवा बजावणारे श्री. भागवत राऊत यांचे आभार. राजापूर अर्बन बँकेचे आभार... तसेच बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखेचे आभार... सर्व किराणा सामान पुरवणारे श्री. महेश पटवर्धन व श्री.मन्सूरखान गवाणकर यांचे आभार... विद्युत पुरवठा करणाऱ्या वीज मंडळाचे आभार. भक्त निवास व्यवस्था पहाणारे सौ. स्मिता सदानंद लिंगायत व कीर्तनकारांची निवासभोजन व्यवस्था करणारे श्री. सदूभाऊ ताम्हनकर यांचे आभार... श्री. संतोष लिंगायत, श्री. विजय लिंगायत या बंधूंचे आभार मानलेच पाहिजेत... श्री. विजय गवाणकर, श्री. विलास चेऊलकर यांनी कॅश काऊंटर नियोजन/नियंत्रण केले त्याबद्दल आभार... सीए श्री. निलेश पाटणकर व त्यांच्या ऑफिसमधील सर्व स्टाफ, श्री. दत्ताभाऊ रानडे ही सर्व मंडळी आभार मानण्यास पात्र आहेत... अनेक लहान लहान मुले छोट्याछोट्या हातांनी नकळतपणे अनेक कामे करत असतात... ती मुलं लहान असली तरीही आभार मानण्यास पात्र आहेत... निंदकांचे आभार सुद्धा मानलेच पाहिजेत... कामामधील उणीवा, चुका, दोष निंदकांमुळेच कमी कमी होत जातात... त्यामुळे त्यांचे आभार साष्टांग दंडवत घालून मानले पाहिजेत...

•




कोरोनाचे नियम पाळून संध्याकाळी ७ वाजता सुरु झालेला महाशिवरात्री उत्सव...



अर्पणदानासाठी बसविलेल्या दोन दानपेट्या...



उत्सवातील नेत्रदीपक रोषणाई



महाशिवरात्री उत्सवामधील ह.भ.प. सौ. स्नेहल पित्रे यांचे ललीताचे कीर्तन व त्यामधील महत्त्वाचा क्षण...



कोरोना कालावधीतील होळी उत्सवातील एक क्षण...





## बुक पोस्ट

प्रति,

श्री./ श्रीम. ______________________

______________________

______________________

If undelivered
please return to-


प्रेषक : विश्वस्त, श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे,
मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी-४१६७०२
9823277326 (WhatsApp) 7038785001